CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | रविवार, २४ ऑगस्ट २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २८५ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## ▶▶ महत्त्वाचे...

### अनिल अंबानींच्या घरांवर CBI चे छापे

**नवी दिल्ली** : २३ ऑगस्ट रोजी सीबीआयने अनिल अंबानी यांच्या रिलायन्स ग्रुपच्या अनेक ठिकाणी छापे टाकले आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, ही छापेमारी मुंबईत करण्यात आली. येस बँकेच्या ३००० कोटी रुपयांच्या कर्ज घोटाळ्याच्या संदर्भात हा छापा टाकण्यात आला आहे. यापूर्वी २३ जुलै रोजी ईडीने अनिल अंबानींच्या रिलायन्स ग्रुपशी संबंधित ३५ ठिकाणी छापे टाकले होते.

### भारताकडून अमेरिकेची टपाल सेवा स्थगित

**नवी दिल्ली** : ट्रम्पच्या शुल्काला प्रतिसाद म्हणून, भारतीय टपाल विभाग २५ ऑगस्टपासून अमेरिकेला सर्व प्रकारच्या टपाल वस्तूंचे बुकिंग स्थगित करणार आहे. सध्या हा निर्णय तात्पुरता लागू केला जाईल. अमेरिकेकडून नवीन टॅरिफ लागू झाल्यामुळे विभाग त्यांच्या सेवांमध्ये बदल करत आहे. अमेरिकन प्रशासनाने ३० जुलै २०२५ रोजी एक आदेश जारी केला होता, ज्या अंतर्गत ८०० पर्यंतच्या वस्तूंवरील शुल्कमुक्त सूट २९ ऑगस्ट २०२५ पासून संपेल. आता अमेरिकेत जाणाऱ्या सर्व टपाल वस्तूंना, त्यांची किंमत काहीही असो, कस्टम ड्युटी भरावी लागेल. ही ड्युटी आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक शक्ती कायदा अंतर्गत देश-विशिष्ट टॅरिफ नियमांवर आधारित आकारली जाईल. तथापि, १०० पर्यंतच्या भेटवस्तूंना या ड्युटीतून सूट असेल.



### ईडीची छापेमारी, १२ कोटी कॅश मिळाली

**कर्नाटक** : कर्नाटकातील काँग्रेस आमदार केसी वीरेंद्र यांना सिक्कीममधून अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) अटक केली. वीरेंद्र यांना मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर बेकायदेशीर ऑनलाइन आणि ऑफलाइन सट्टेबाजीचा आरोप आहे. शुक्रवारी ईडीने वीरेंद्र यांच्या लपण्याच्या ठिकाणांवर छापे टाकले. छापेमारी दरम्यान, तपास यंत्रणेला १२ कोटी रुपये रोख आणि ६ कोटी रुपयांचे सोन्याचे दागिने सापडले. एक कोटी रुपयांचे परकीय चलन देखील जप्त करण्यात आले. चार वाहने देखील जप्त करण्यात आली आहेत.

### रजनीकांतच्या 'कुली' सिनेमाचा धमाका

**मुंबई** : यंदाच्या वर्षांत १४ ऑगस्ट रोजी दोन मोठे सिनेमे रिलीज झाले. त्यादिवशी ऋतिक रोशनचा 'वॉर २' आणि रजनीकांतचा 'कुली' प्रदर्शित झाला. त्यामुळे बॉक्स ऑफिसवर यंदाचा सर्वात मोठा क्लॅश १४ ऑगस्टला झाला असं बोललं जाऊ लागलं. दोन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर दमदार ओपनिंग केली. 'वॉर २' हा २०२५ सालचा सर्वात मोठी ओपनिंग करणारा बॉलिवूड चित्रपट ठरला (५२ कोटी), पण'कुली'ने त्याला मागे टाकत ६५ कोटींच्या ओपनिंगसह यंदा प्रदर्शित झालेल्या सर्व भारतीय चित्रपटांमधील सर्वात मोठी ओपनिंग मिळवली. मात्र, आठवड्याभराच्या कालावधीनंतर दोन्ही चित्रपटांच्या कमाईत घसरण झाली. तरीदेखील, रजनीकांतचा 'कुली' दररोजच्या कमाईत 'वॉर २'वर सरस ठरला. आज जेव्हा हा चित्रपट आपल्या दुसऱ्या शनिवारीची कमाई करत आहे, तेव्हा रजनीकांतच्या स्टाइलमध्ये पुन्हा एकदा बॉक्स ऑफिसवर चमक दाखवली आहे आणि कमाई मागील दिवसांपेक्षा जास्त झाली आहे.

# पाच वर्षे एकही योजना बंद होऊ देणार नाही!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लाडक्या बहिणींना ग्वाही

## आमच्या भगिनी थांबणार नाहीत

**मुंबई, २३ ऑगस्ट** : अनेकजण निवडणूक संपल्यावर योजना बंद होतील असे म्हणत होते. परंतू, पाच वर्षे आपली एकही योजना आम्ही बंद होऊ देणार नाही. पाच वर्षाने तुमच्या आशीर्वादाने पुन्हा सरकार आले तर पुढची पाच वर्षे या योजना असतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवार, २३ ऑगस्ट रोजी लाडक्या बहिणींना दिली.

मुंबई येथे आयोजित राखी प्रदान कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंत्री ॲड. आशिष शेलार, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार चित्रा वाघ, आमदार विद्या ठाकुर, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''आजचा कार्यक्रम हा अतिशय सुंदर आणि भावनिक आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर रक्षाबंधनाचा कार्यक्रम राबवण्यात आला असून आतापर्यंत ३६ लाख ७८ हजार बहिणींची राखी माझ्यापर्यंत पोहोचली आहे. काहींनी पत्राद्वारे त्यांच्या भावना पोहोचवल्या आहेत. या तमाम बहिणींची राखी आणि त्यांचे प्रेम मी स्विकारतो. जन्मभर मला या प्रेमातच राहायचे आहे. या प्रत्येक राखीमध्ये केवळ प्रेम आहे. आपल्या संस्कृतीमध्ये प्रत्येक नाते महत्वाचे असून प्रत्येक नात्याचा उत्सव आहे. आम्ही नाती निभावणारी लोकं आहोत. आम्ही परिवार, कुटुंब माननारी लोकं आहोत. खूप लोकांनी खूप प्रयत्न करून बघितले पण कुठल्याशी शस्त्रापेक्षा आणि अस्त्रापेक्षा प्रेमाचे आशीर्वाद हे अधिक ताकदवर असतात. त्यामुळे आज सर्वांच्या आशीर्वादाने पुन्हा एकदा महाराष्ट्रात आपली सेवा करण्यासाठी मला मुख्यमंत्रीपदाची जागा मिळाली. आमच्या लाडक्या बहिणी याच्या शिल्पकार आहेत.''

**नारी शक्तीला कुणीही थांबवू शकत नाही**

''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशाच्या विकासाचे स्वप्न बघितले. हे विकासाचे स्वप्न पूर्ण करायचे असेल तर, जोपर्यंत लोकसंख्येचा ५० टक्के हिस्सा या स्वप्नाचा भाग होत नाही तोपर्यंत हे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे महिला लक्षित योजनांच्या माध्यमातून मोदीजींनी विकास सुरु केला. महिलाकेंद्रित विकास हे मॉडेल त्यांनी देशात सुरु केले. बेटी बचाव, बेटी पढाओपासून सुरु झालेला हा प्रवास आता लखपती दीदीपर्यंत पोहोचला आहे. ऑपरेशन सिंदूर सुरु असताना आमच्या दोन भगिनी टीव्हीवर आपल्या सैन्याचा पराक्रम आणि भारताची दैदिप्यमान कामगिरी आमच्यापुढे मांडायच्या. हा मोदीजींनी तयार केलेला नवा भारत आहे. या भारतात आमची भगिनी घरात बसणार नसून समान भागिदारीने देशाच्या विकासात सहभागी होणार आहे, हे आपल्या लक्षात आले. २०२९ साली मोदीजींनी देशाच्या संसदेत आणि विधानसभेत आमच्या भगिनींना भागिदारी दिलेली आहे. त्यामुळे आता आमच्या भगिनी थांबणार नाही. आमच्या नारी शक्तीला देशात कुणीही थांबवू शकत नाही,'' असे ते म्हणाले.

''लाडकी बहिणसारखी योजना आम्ही सुरु केली. आपल्याला महिलांना सक्षम करायचे आहे. एक महिला कमावती झाली तर ती संपूर्ण परिवाराचे कल्याण करते. महिला सहकारी संस्थांना समर्पित काम मिळालेच पाहिजे यादृष्टीने आम्ही निर्णय घेणार आहोत. महाराष्ट्रात निघणाऱ्या कामांमध्ये महिला संस्थांची हिस्सेदारी आणि हक्क प्रस्थापित करण्याचा निर्णय येत्या काळात घेऊ. त्यातून महिलांना उद्योग, व्यापार आणि व्यवसायात मोठे करण्याचे काम होणार आहे. अनेकजण निवडणूक संपल्यावर योजना बंद होतील, असे म्हणत होते. परंतू, पाच वर्षं आपली एकही योजना आम्ही बंद होऊ देणार नाही. पाच वर्षाने तुमच्या आशीर्वादाने पुन्हा सरकार आले तर पुढची पाच वर्षे या योजना असतील. २०२९ मध्ये तर तुम्हीच सत्तेत येणार आहात. त्यामुळे आमचे काहीही चालणार नाही. आतापर्यंत तुम्ही घरच्या गृहमंत्री म्हणून हुकूम चालवत होत्या. २०२९ नंतर मोदीजींनी तुम्हाला राज्याच्या मंत्री म्हणून हुकूम चालवण्याची संधी दिली आहे. यामुळे राज्यात गुणात्मक परिवर्तन होणार आहे,''




### बिहारमध्येही महाराष्ट्रासारखीच अवस्था होणार

''तुमच्या आशीर्वादाने आम्हाला अभूतपूर्व यश मिळाले. या यशाने तुम्ही आनंदी आहात, पण काही लोकांचे अजूनही समाधान झालेले नाही. ते तोंडावर पडले, मातीत मिळाले तरी सुधारण्यास तयार नाहीत. रोज वोटचोरी झाली असे म्हणतात. पण, यांचे डोके चोरी झाले आहे. त्यांना सुबुद्धी, अक्कल येवो असा २५ टक्के आशीर्वाद त्यांच्यासाठीही मागा. लाडक्या बहिणींच्या मताला ते चोरी म्हणत असतील तर त्यांच्यापेक्षा मोठे चोर कुणीच नाही. कालपर्यंत ते परदेशात जाऊन भारताची बदनामी करत होते. आता बिहारमध्ये जाऊन महाराष्ट्राची बदनामी करत आहेत. पण त्यांची महाराष्ट्रात जी परिस्थिती झाली तीच अवस्था बिहारमध्येसुद्धा होणार आहे. देशाचा आणि आत्मनिर्भर भारताचा विचार करणाऱ्या मोदींसारख्या नेत्याच्या पाठीशी सर्व मातृशक्ती उभी आहे. मोदीजीच येणाऱ्या पिढीचे कल्याण करणार, असा सर्वांना विश्वास आहे. आम्ही नेहमी तुमची मान अभिमानाने उंच राहील असेच काम करु. आम्ही आमच्या स्वार्थासाठी नाही तर समाजाच्या, महाराष्ट्राच्या स्वार्थासाठी काम करू. तुमचा आशीर्वाद मिळाला की सुसाट सुटतो आणि महाराष्ट्राला परिवर्तित करुन दाखवतो,'' असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# शेती पध्दती अन् देशी गोवंश पालनातून आत्मनिर्भरता साध्य होईल

**● सरसंघचालक डॉ. भागवत यांचे प्रतिपादन**

**मुंबई (विशेष प्रतिनिधी)** : ''देशी गोवंश आणि पारंपरिक शेती पद्धतीबद्दल लोकांचा विश्वास वाढत आहे. भारतीय शेतीचे आधुनिक रूप विकसित करूनच आपण कृषी आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करू शकतो'', असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले. छत्रपती संभाजीनगर येथील तापडिया नाट्य मंदिरात आयोजित ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानच्या २८ व्या स्थापना दिन कार्यक्रमात बोलत होते.

उपस्थितांना संबोधित करतांना सरसंघचालक पुढे म्हणाले, ''जो बोलू शकत नाही, उपचाराच्या वेळी विरोध करतो, त्याच्या दुःखालाही समजून त्यावर उपचार करण्याची कला आपल्या परंपरेत आहे. प्राचीन पशुवैद्य शालिहोत्र यांनी घोड्याचे आयुष्य आणि गुणधर्मांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून सांगितले होते. ती परंपरा आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. शेतीत पाश्चात्य तंत्रज्ञान आणि आधुनिकता जिथे आवश्यक आहे तिथे स्वीकारून, भारतीय पद्धतीनुसार शेती आणि पशुपालनाचा समन्वय साधला तर शेतकऱ्यांना फायदा होईल. भारतीय शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग करून पशुपालनासह मिश्र शेती स्वीकारल्यास शेतकऱ्यांना अधिक लाभ होईल. जागतिक स्तरावर असलेल्या अनिश्चितता आणि आव्हानांच्या पार्श्वभूमीवर कृषी क्षेत्रात आत्मनिर्भर होणे अत्यावश्यक आहे.''

कार्यक्रमात पशुपालन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पशुपालकांना आणि पशुवैद्यकीय स्नातकांना आदर्श पशुपालक, आदर्श गोपालक, उत्कृष्ट पशुवैद्य, आदर्श प्राध्यापक अशा पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. संस्थेची सुरुवात प्रतिकूल परिस्थितीत झाली होती. अनेक सहकाऱ्यांच्या योगदानामुळे आज तिची क्षमता वाढली असून काम काज इतके विस्तारले आहे की विविध पुरस्कार देण्यापर्यंत तिचा विकास झाला आहे.




### उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा गौरव

या प्रसंगी पशुवैद्यक शास्त्रात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा गौरव करण्यात आला. प्रतिष्ठानच्या स्मरणीकेचे प्रकाशनही करण्यात आले. कार्यक्रमाला ज्येष्ठ पशुवैद्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अशोक दिवाण देखील व्यासपीठावर उपस्थित होते.

# अवकाश क्षेत्रात भारताची झेप

## जगासाठी प्रेरणादायी : पंतप्रधान

**नवी दिल्ली, दि. २३ : विशेष प्रतिनिधी**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी राष्ट्रीय अंतरिक्ष दिवस २०२५ निमित्त आयोजित कार्यक्रमाला व्हिडिओ संदेशाद्वारे संबोधित केले. यावेळी त्यांनी देशवासियांना शुभेच्छा देत सांगितले की, या वर्षीची संकल्पना 'आर्यभट्ट ते गगनयान' ही भारताच्या आत्मविश्वासपूर्ण भूतकाळाचे तसेच दृढ भविष्यातील संकल्पाचे प्रतीक आहे. अल्पावधीतच राष्ट्रीय अंतरिक्ष दिवस हा देशातील युवकांसाठी प्रेरणा व आकर्षणाचा उत्सव ठरला असल्याचे त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, भारत सध्या खगोलशास्त्र व खगोलभौतिकीवरील आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाडचे यजमानपद भूषवत आहे, ज्यात ६० हून अधिक देशांतील ३०० हून अधिक युवा सहभागी झाले आहेत. भारतीय विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत पदक जिंकून देशाचा गौरव वाढविला असल्याचे ते म्हणाले. इस्त्रोच्या 'इंडियन स्पेस हॅकाथॉन' व 'रोबोटिक्स चॅलेंज' सारख्या उपक्रमांचा उल्लेख करताना पंतप्रधानांनी युवकांमध्ये अवकाशाविषयीची आवड वाढत असल्याचे समाधान व्यक्त केले व सर्व सहभागी व विजेत्यांचे अभिनंदन केले.

भारताने दोन वर्षांपूर्वी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचून इतिहास घडविला तसेच अंतराळात डॉकिंग-अनडॉकिंग क्षमता प्राप्त करणारा जगातील चौथा देश झाल्याचे मोदी यांनी नमूद केले. नुकतेच भारतीय वायुसेनेचे ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर तिरंगा फडकावला, ही घटना प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद असल्याचे ते म्हणाले. अवकाश क्षेत्रात युवकांसाठी संधी वाढविण्यासाठी भारत 'अंतराळवीर पूल' निर्माण करीत असल्याची घोषणा पंतप्रधानांनी केली. त्यांनी तरुणांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले.

भारतीय अवकाश क्षेत्र पुढील पाच वर्षांत पाच 'युनिकॉर्न' निर्माण करू शकते का, असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी युवकांना प्रोत्साहन दिले. सध्या भारतातून वर्षाला ५-६ प्रक्षेपण होत असले तरी खासगी क्षेत्राच्या सहभागामुळे पाच वर्षांत दरवर्षी ५० रॉकेट्स प्रक्षेपित करण्याचे लक्ष्य गाठता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अवकाश-तंत्रज्ञान हे फक्त वैज्ञानिक शोधापुरते मर्यादित नसून नागरिकांचे जीवन सुलभ करण्याचे साधन आहे, असे स्पष्ट केले.

### लवकरच गगनयान मिशन राबविणार

भारत सेमी-क्रायोजेनिक इंजिन व इलेक्ट्रिक प्रपल्शन सारख्या महत्त्वाच्या तंत्रज्ञानात वेगाने प्रगती करत असून लवकरच गगनयान मिशन राबविणार असल्याचे मोदी यांनी सांगितले. पुढील काळात भारत स्वतःचे अवकाश स्थानक उभारेल, तसेच अवकाशातील आणखी गहन क्षेत्रांचा शोध घेईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अवकाश क्षेत्रातील धोरणात्मक प्रगती अखंड सुरू राहिली पाहिजे, यावर भर देत पंतप्रधान म्हणाले की, मागील अकरा वर्षांत अवकाश क्षेत्रातील अनेक निर्बंध दूर करण्यात आले व खासगी क्षेत्राला मोठ्या प्रमाणात प्रवेश देण्यात आला. सध्या देशात ३५० हून अधिक स्टार्टअप्स अवकाश-तंत्रज्ञानात कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. लवकरच खासगी क्षेत्र निर्मित पहिला पीएसएलवी रॉकेट प्रक्षेपित होणार असून, भारताचा पहिला खासगी दूरसंचार उपग्रह विकसित होतो आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

# पवार-ठाकरेंची भूमिका राष्ट्रहितविरोधी

**● उपराष्ट्रपदी निवडणुकीच्या भूमिकेवर केशव उपाध्ये यांची टीका**

**मुंबई** : उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीबाबत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांची भूमिका ही केवळ विरोधाभासी नाही, तर थेट राष्ट्रहिताविरोधी आहे, अशी टीका भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केली आहे. त्यांनी 'एक्स' अकाऊंटवर पोस्ट करत शरद पवार यांनी केलेल्या विधानावर प्रतिक्रिया दिली.

केशव उपाध्ये म्हणाले की, ''प्रखर राष्ट्रवाद, संविधानावर श्रद्धा आणि सर्वसमावेशक राजकारण असा इतिहास असलेली व्यक्ती आमच्या विचाराची नाही असे शरद पवार उघडपणे सांगतात, मग त्यांची नेमकी विचारसरणी कोणती? असा सवाल महाराष्ट्राने त्यांना विचारला पाहिजे. पक्षाचे राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि राष्ट्रवादी विचारास विरोध हा त्यांच्या कथनी आणि करणीतून उघड झाला आहे. त्यामुळे उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीबाबत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांची भूमिका ही केवळ विरोधाभासी नाही, तर थेट राष्ट्रहिताविरोधी आहे,''

**ही फक्त राजकीय स्वार्थाची नौटंकी**

''संविधाननिष्ठ, स्पष्टवक्ते आणि राष्ट्रभक्तीचा विचार जोपासणारे राधाकृष्णन यांना आमच्या विचारांचे नाहीत म्हणून नाकारणे हा विचारांचा संकुचितपणा आणि राजकीय द्वेषाचा कळस आहे. नक्षलवाद्यांप्रती सौम्य भूमिका ठेवणाऱ्या उमेदवाराला पाठिंबा देणे, हे तर थेट देशाच्या सुरक्षेशी खेळणे आहे. नक्षलवाद हा भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी गंभीर धोका असून अशा विचारसरणीला पाठबळ देणाऱ्या व्यक्तीला उपराष्ट्रपतीपदासाठी योग्य मानणे म्हणजे जनतेशी विश्वासघातच आहे. ज्या आंध्र प्रदेशातून इंडिया आघाडीचा उमेदवार उभा आहे, त्याच राज्यातील प्रमुख नेत्यांनी राधाकृष्णन यांना पाठिंबा दिला आहे. यावरून एकच स्पष्ट होते की, पवार-ठाकरे यांच्या भूमिकेला वैचारिक बैठकच नाही. ही तर फक्त राजकीय स्वार्थाची नौटंकी आहे,'' असेही केशव उपाध्ये म्हणाले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### तालुका पोलीस स्टेशनकडून गणपती मंडळाना नोंदणीबाबत आवाहन

**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट-**

सोलापूर तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व गणेश मंडळांना जाहीर आवाहन करण्यात येते की,या वर्षी आपले गावात आपल्या गणेश उत्सव मंडळाकडून श्री गणेशाची मुर्ती स्थापना करून गणेश उत्सव मोठ्या उत्साहात व थाटामाटात साजरा करीत असताना आपण पोलीस स्टेशन कडून रितसर परवानगी घेऊन कायद्याचे व नियम अटींचे पालन करून साजरा करावा. गणेश उत्सव २०२५करीता परवानगी साठी ऑनलाईन अर्ज भरणे संबंधी खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करावीत..

ऑनलाईन अर्ज भरणेची लिंक : I citizen portal. services for citizen वर click केले वर रु मुख पृष्ठ वर गणेश फेस्टिवल परमिशन अप्लिकेशन क्लिक केले वर नवीन पेज ओपन होईल. श त्या मध्ये अध्यक्ष किंवा सदस्य नावे login id बनवून ओटीपी टाकून रजिस्ट्रेशन करावे. अकाऊंट तयार झालेवर = login करा. त्या वेळी भाषा मराठी किंवा इंग्रजी निवडा ciitizen service निवडून गणेश उत्सव परवानगी निवडा. त्यानंतर फार्म ओपन होईल. फॉर्म मध्ये नमूद संपूर्ण माहिती भरावी.

मंडळ अध्यक्ष व सदस्यांची पूर्ण नावे भरावीत, किमान ५ किंवा जास्तीत जास्त १० सदस्यांची नावे व मोबाईल नंबर भरावीत, गणेश उत्सव स्थापना तारीख व वेळ... मिरवणूक असल्यास तारीख व वेळ नमूद करावी, विसर्जन मिरवणूक असल्यास होय नमूद करून तारीख व वेळ नमूद करावी अन्यथा विसर्जन दिवशीचे मिरवणूकीस परवाना मिळणार नाही, मंडप मालकाची माहिती, मंडप ठिकाणाची जागेचे माहिती मध्ये गल्ली,नगर भागाचे नाव, मंडपाची लांबी, रूंदी माहिती, गणेश मुर्ती लांबी रूंदी माहिती, देखावा माहिती, गणेश उत्सव काळात मुर्ती सुरक्षा व देखभाल संबंधित नेमलेल्या कार्यकर्ते व सी सी टी व्ही कॅमेरे माहिती, कागदपत्रे जोडणी, मंडळ किंवा संस्था रजिस्ट्रेशन केलेले धर्मादाय आयुक्त यांचे नोंदणी पत्र, गेल्या वर्षी पोलीस स्टेशन कडून परवानगी घेतलेली परवानगी प्रत, सार्वजनिक जागेत गणेश मुर्ती स्थापना करीत असलेस ग्रामपंचायत नाहरकत दाखला व खाजगी जागेत असल्यास जागा मालकीचे नाहरकत, तात्पुरत्या स्वरूपात विजेचे कनेक्शन घेत असल्यास वीज कनेक्शन पावती इत्यादी. अशी कागदपत्रे अपलोड/जोडून.... शेवटी ... भरलेली माहिती बाबत पुष्टी किंवा खात्री करून फार्म सबमिट करावा. पोलीस स्टेशनकडून परवाना मंजूर बाबत वैध परवाना वर सही शिक्का व सूचना पत्र असले शिवाय परवाना ग्राहय मानला जाणार नाही. याची सर्व गणेश मंडळांनी नोंद घ्यावी, असे आवाहन तालुका पोलीस स्टेशनच्या वतीने गणपती मंडळांना करण्यात आले आहे.



### ग्रामविकास अधिकारी फुलारी यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट-**

ग्रामविकास अधिकारी विश्वनाथ उर्फ इसप्पा फुलारी यांचा आज अक्कलकोट तालुका गुरव समाज सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजीत गुणीजन गौरव या कार्यक्रमात अक्कलकोट तालुक्याचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते तथा माजी खासदार जयसिद्धेश्वर महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात सन्मानचिन्ह तथा सन्मानपत्र देऊन सपत्नीक गौरव करण्यात आला.

# यंदा अकरा दिवसांचा गणेशोत्सव; गणेशाची स्थापना करा दोनपर्यंत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट-**

यंदा बुधवारी दि.२७ ऑगस्टला बुधवारी भाद्रपद शु. चतुर्थीच्या दिवशी घरोघरी व सार्वजनिक मंडळांकडून पार्थीव गणेशमूर्तीची स्थापना करण्यात येते. यंदा ब्राह्ममुहूर्तापासून म्हणजे पहाटे ४.५० ते दुपारी १.५३ पर्यंत आपल्या आणि पुरोहीताच्या सोयीने घरातील पार्थिव गणेशाची स्थापना आणि पूजन करावे. त्यासाठी भद्रा(विष्टि) किंवा कोणतेही कुयोग वर्ज्य करण्याची किंवा विशिष्ट मुहूर्त वेळेची आवश्यकता नाही. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना मध्यान्हानंतर देखील करता येईल. प्रातःकाळपासून मध्याह्यापर्यंत कोणत्याही वेळी स्थापना व पूजा करता येईल.



श्रीगणेश चतुर्थीच्या आधी एक दिवस किंवा त्याच दिवशी सकाळी मूर्ती आणावी, असे नाही तर दुकानातून गणपतीची मूर्ती ८ ते १० दिवस आधी सुद्धा आणून घरामध्ये ठेवता येईल. त्यादिवशी घरोघरी तसेच सार्वजनिक मंडळाच्या गणेश मूर्तींचे आगमन होणार आहे. शनिवारी (ता. ६ सप्टेंबर) अनंत चतुर्दशी आहे. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव दहाऐवजी अकरा दिवसांचा असणार आहे. पुढील वर्षी ज्येष्ठ अधिकमास असल्याने श्रीगणेशाचे आगमन उशिरा होणार आहे. पुढील वर्षी सोमवारी १४ सप्टेंबर २०२६ रोजी श्रीगणेश चतुर्थी आहे अशी माहिती पंचांगकर्ते मोहन दाते यांनी दिली.

गणेशोत्सवाबद्दल माहिती देताना ते म्हणाले, काही जणांकडे दीड दिवस, तीन दिवस, पाच दिवस व सात दिवसाचे तसेच बहुतेकांकडे अनंत चतुर्दशीपर्यंत उत्सव साजरा केला जातो. तसेच काहीजणांकडे घरामध्ये गर्भवती असताना गणपती विसर्जन न करण्याची पद्धती आहे. पण ती बरोबर नाही, घरामध्ये गर्भवती स्त्री असताना गणपती विसर्जन करता येते. अशा वेळेस विसर्जन न करण्याची प्रथा चुकीची आहे. गणेश चतुर्थीच्या दिवशी प्रतिष्ठापना केलेल्या पार्थिव गणेश मूर्तीचे विसर्जन होणे आवश्यक आहे. ते पाण्यामध्ये करावे, असे धर्मशास्त्र सांगते. मात्र, वाहत्या पाण्यामध्ये विसर्जन करावे, असे नसून पाण्यात विसर्जन करावे, असे आहे. त्यामुळे तलावात किंवा स्वतंत्र टँकमध्ये, तसेच घरी मोठ्या बादलीमधील पाण्यातसुद्धा विसर्जन करता येते. विसर्जनानंतर ती मूर्ती पाण्यात विरघळणे आवश्यक असल्याने शाडूची किंवा मातीची मूर्ती असावी. प्लॅस्टर ऑफ पॅरिस किंवा तत्सम पाण्यात न विरघळणाऱ्या पदार्थांची मूर्ती नसावी, असेही दाते यांनी सांगितले.

## पंचांगकर्ते दाते : पुढील वर्षी अधिकमास असल्याने गणरायाचे आगमन उशीरा



घरातील गणेशमूर्ती एक वीतभर उंचीची आणि आसनस्थ असावी. उजव्या सोंडेचा गणपती कडक आणि डाव्या सोंडेचा सौम्य, अशी समजूत आहे, ती चुकीचीच आहे. समर्थ रामदासांनी गणेशाचे वर्णन करताना आरतीमध्ये 'सरळ सोंड वक्रतुण्ड त्रिनयना' असे म्हटले आहे.

**- मोहन दाते, पंचागकर्ते**

### गणेशोत्सवातील महत्त्वाचे दिवस

- बुधवार दि. २७ ऑगस्टला श्रीगणेश चतुर्थी आहे. या दिवशी पहाटे ४.५० ते दुपारी १.५३ पर्यंत कधीही घरगुती गणेशाची स्थापना करता येईल.
- रविवार दि. ३१ ऑगस्टला गौरी आवाहन : अनुराधा नक्षत्रावर सूर्योदयापासून सायंकाळी ५.२७ पर्यंत आपल्या परंपरेप्रमाणे गौरी आवाहन करावे
- सोमवार दि. १ सप्टेंबर रोजी : गौरी पूजन आहे. यादिवशी गौरींना महानैवेद्य महारतीसह आपापल्या रितीरिवाजानुसार कुलधर्म कुलाचार करावा.
- मंगळवार दि.२ सप्टेंबर रोजी : गौरी विसर्जन मूळ नक्षत्रावर सूर्योदयापासून रात्री ९.५१ पर्यंत गौरी विसर्जन करावे
- शनिवार दि. ६ सप्टेंबर रोजी : अनंत चतुर्दशी आहे. यादिवशी आपापल्या सोयीनुसार पार्थीव गणेशाचे विसर्जन करावे.



# बालाजी सरोवर प्रीमियरला हॉटेल ऑफ द इयर पुरस्कार

### सोलापूरचे महांतेश तोळणुरे यांना 'चीफ इंजिनिअर ऑफ द इयर' पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट-**

बालाजी सरोवर प्रीमियर या पंचतारांकित हॉटेलने पुन्हा एकदा आपली छाप पाडत प्रतिष्ठेचा 'हॉटेल ऑफ द इयर २०२४' हा मानाचा पुरस्कार पटकावला आहे. श्रीपेरंबदूर येथे झालेल्या भव्य २०२५ या समारंभात हा पुरस्कार देण्यात आला तसेच हॉटेलचे चीफ इंजिनिअर महांतेश तोळणुरे यांना 'चीफ इंजिनिअर ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार सरोवर हॉटेल्सचे चेअरमन अजय बकाया, सीईओ जतिन खन्ना, तसेच लूव्हर हॉटेल्स ग्रुपचे बोर्ड डायरेक्टर फेडेरिको जे. गॉन्झालेझ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. 'हॉटेल ऑफ द इयर २०२४' पुरस्कार हॉटेलचे महाव्यवस्थापक विवेक जोशी यांनी स्वीकारला, तर 'चीफ इंजिनिअर ऑफ द इयर' पुरस्कार स्वतः महांतेश तोळणुरे यांनी स्वीकारला. भारतातील तब्बल १५० हून अधिक हॉटेल्समधून आलेल्या नामांकनांमध्ये बालाजी सरोवर प्रीमियरची निवड करण्यात आली. उत्कृष्ट सेवा, ग्राहक समाधान आणि जागतिक दर्जाच्या सुविधा यामुळे या हॉटेलने सोलापूरच्या आदरातिथ्य क्षेत्रात अल्पावधीतच वेगळी ओळख निर्माण केली आहे.या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी हॉटेलमध्ये विशेष सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी सोलापूरचे नामवंत वास्तुविशारद मनोज मर्दा यांच्या प्रमुख उपस्थितीत बालाजी अमाईन्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांनी महाव्यवस्थापक विवेक जोशी आणि चीफ इंजिनिअर महांतेश तोळणुरे यांचा विशेष सत्कार केला.

### पुरस्कारामुळे आमच्या टीममध्ये उत्साह

''हा सन्मान म्हणजे व्यवस्थापन आणि संपूर्ण टीमच्या कठोर परिश्रमांचे प्रतीक आहे. आमचे ध्येय नेहमीच अतिथींना सर्वोत्तम सेवा देणे हेच राहिले असून, या पुरस्कारामुळे आमच्या टीमचा उत्साह अधिक वाढला आहे.''

**- डी. राम रेड्डी, बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक**

# धमन्यातील गरम सिंदूरचे आता कोल्ड्रिंक झाले का? : उद्धव ठाकरे

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २३ ऑगस्ट-**

माझ्या धमन्यामध्ये रक्त नाही तर गरम सिंदूर वाहत आहे म्हणाऱ्यांचे आता कोल्ड्रिंक झाले आहे का?, याचे पहिले उत्तर द्यावे, अशा शब्दात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर कडाडून हल्ला केला.



राज्य शिक्षक सेनेच्यावतीने दादर येथे झालेल्या कार्यक्रमात त्यांनी देशातील आणि राज्यातील विविध विषयांवर भाष्य करीत पंतप्रधान मोदी, अमित शहा व भाजपावर कडाडून टीका केली.

एकावेळी रक्त व पाणी वाहू शकत नाही, असे म्हणणाऱ्या पंतप्रधानांनी आता आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा पाकिस्तानबरोबर सामन्याला मान्यता दिली आहे. असे सांगून ठाकरे म्हणाले की, कबुतरे, कुत्रे आणि हत्तीणीसाठी लोक रस्त्यावर उतरतात. मात्र, हीच माणुसकी जेव्हा पहलगाममध्ये लोक मारले गेले तेव्हा कुठे गेली होती?, पाकबरोबर आता भारताची टीम क्रिकेट खेळणार आहे, मग धामन्यात वाहणारे सिंदूर कुठे गेला? गरम सिंदूरचे आता कोल्ड्रिंक्स झालं का?,

''प्रत्येक प्रश्नावेळी डोक्यावर बर्फ आहे, काय करू? तसं थंडपणा आपल्याला परवडणारा नाही. माझी उंची हिमालयाची असली तरी जिगर सह्याद्रीची आहे. आपण सध्या शिक्षणाच्या दर्जावर लक्ष देण्याऐवजी आज हिंदीच्या सक्तीवर लक्ष का देत आहोत? शिक्षणाचा दर्जा आपण का उंचावत नाहीत? आमचा कोणत्याही भाषेला विरोध नाही. मात्र, सक्ती कशासाठी पाहिजे? काही दिवसांपूर्वी मी दिल्लीत गेलो होतो, तेथेही हा प्रश्न मला अपेक्षित होता. तिथेही मी सांगितलं की आम्ही हिंदीला विरोध करत नाहीत, तर फक्त सक्तीला विरोध करत आहोत. आता माझ्यापेक्षा आपले पंतप्रधान चांगलं हिंदी बोलतात. मग ते कोणत्या शाळेत शिकले? त्यांनाही पहिलीपासून हिंदी सक्ती होती का? मग तरीही त्यांना आश्वासनं देण्यापुरती का होईना हिंदी येती ना'', अशी टीका करीत ते म्हणाले की, भाजपा हा भ्रष्टाचार जनता पार्टी झाली आहे. सगळे खोटे बनावट करूनच ते जिंकतात, हे राहुल गांधी यांनी मत चोरीचा प्रकार उघड करून देशासमोर दाखवले आहे. पंतप्रधान मोदी बिहारमध्ये म्हणाले की भ्रष्टाचारासाठी इंडिया आघाडी पुढे आली आहे. ७० कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप तुम्हीच केला, त्यानंतर तुम्हीच आदर्श घोटाळ्याचा आरोप केला आणि त्यानंतर अशोक चव्हाण बाजूला दिसले. मग कोण कोणाचं रक्षण करतंय. आम्ही घुसखोरांना घरात ठेवतोय का? शेख हसीनाला तुम्ही आसरा दिला, बांगलादेशींना विरोध केला आणि तिकडून पळून आलेल्या बांगलादेशच्या पंतप्रधानांना तुम्ही आसरा देताय आणि आम्हाला सांगताय घुसखोरांचे रक्षण करताय,असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी मोदींवर केला. सगळ्या भ्रष्टाचाऱ्यांना मुख्यमंत्रीपद, मंत्रिपद आणि इतर पदे तुम्ही देतात, असे सांगून निवडणूक आयोग हा भाजपाचा बटीक बनला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये आपले मत चोरी होऊ नये,यासाठी सर्वांनी दक्ष राहिले पाहिजे, असेही त्यांनी आवाहन केले.

# व्हीजेएनटी समितीकडून जिल्हाधिकारी यांच्या अभिनंदनाचा ठराव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट-**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या तीन दिवसीय दौऱ्यात जिल्हा प्रशासनाच्या कार्याची विशेष दखल घेण्यात आली. समिती प्रमुख आमदार सुहास कांदे व सर्व सदस्यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या संकल्पनेतून सोलापूर जिल्ह्यात व्ही जे एन टी समाजासाठी आयोजित करण्यात आलेल्या २५ विशेष शिबिरांमधून वंचित नागरिकांना विविध मूलभूत सेवा उपलब्ध करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा यशस्वी प्रयत्न केल्या बद्दल त्यांचे कौतुकाचा ठराव मांडला.

तो सर्वांनी एकमताने मंजूर केला. या शिबिरांद्वारे विमुक्त जाती व भटक्या जमाती मधील नागरिकांना १६०९ मतदान ओळखपत्रे, १४२१ जात प्रमाणपत्रे, ५१७ आधार कार्ड, १९ दिव्यांग प्रमाणपत्रे, तसेच ९१४ आयुष्यमान भारत कार्ड वितरित करण्यात आले. विशेष म्हणजे, ६२ लाभार्थ्यांना घरकुलासाठी मोफत जमीन वाटप करण्यात आली, ज्यामुळे या समाजघटकांना स्थैर्य व सन्मान प्राप्त झाला.

समितीने या उपक्रमाचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले असून, हा उपक्रम संपूर्ण राज्यात पथदर्शक प्रकल्प म्हणून राबविण्याची शिफारस करण्यात आली आहे.

# बँक कॉलनीत लोकसहभागातून गणपतीसाठी स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

जुळे सोलापूर येथील ज्ञानेश्वर नगर जवळील बँक कॉलनीत श्रीगणेशाच्या आगमनासाठी तयारी सुरू झाली आहे. त्यानिमित्त येथील गणपती कट्ट्यासमोरील मैदानाची लोकसहभागातून स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.



येथे दरवर्षी विघ्नहर्ता बाल गणेश मंडळाच्या माध्यमातून श्रीगणेशोत्सव साजरा करण्यात येतो. त्यासाठी कॉलनीतील प्रत्येक घरातून अबालवृध्द पुढाकार घेऊन उत्सवात सहभागी होतात. यंदाचा गणेशोत्सव दि. २७ ऑगस्टपासून सुरू होत आहे. त्यामुळे येथील गणपती कट्टा तसेच त्यासमोरील मैदानाची स्वच्छता करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार लोकसहभागातून मैदानाची तसेच कट्ट्याची स्वच्छता करण्यात आली. यंदा जोरदार पाऊस झाल्याने मैदानात गवत वाढले होते. ते काढण्यासाठी जेसीबीद्वारे काम करण्यात आले. मैदानात पडलेले खड्डे बुजवण्यात आले. मैदानावर साचणाऱ्या पाण्याचा निचरा होण्यासाठी पाण्याला वाट करून देण्यात आली. लोकसहभागातून काम करण्यामध्ये अमोल अमोने, उमाशंकर चांडोले, विनय वाळवेकर, रूद्रय्या हिरेमठ, श्रीपाद आरोळे, आदित्य हिरेमठ आदिसह अन्य कुटुंबिय सहभागी झाले होते.

# शेतकऱ्यांनी नुकसानीची सवय करून घ्यावी

**● भाजप नेते पाशा पटेल यांचे अजब विधान; 'शेतकरी विरोधी' म्हणत विरोधकांचा तिखट पलटवार**

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि.२३ ऑगस्ट-**

मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. या प्रकरणी ते सरकारकडे मदतीसाठी याचना करत असताना भाजप नेते तथा राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी त्यांच्या जखमांवर मीठ चोळणारे विधान केले आहे. वर्षातील ३६५ दिवसांतील ३२२ दिवस शेतकऱ्यांवर काही ना काही संकटे येणार आहेत. त्यामुळे आता आपल्याला असे नुकसान सहन करण्याची सवयच लावून घ्यावी लागेल, असे ते म्हणालेत. त्यांच्या टीकेचे राजकीय वर्तुळात संतप्त पडसाद उमटत आहेत.

चालू आठवड्यात मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात जोरदार पाऊस झाला. त्यात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यामुळे शेतकऱ्यांनी सरकारकडे मदतीची मागणी केली आहे. पाशा पटेल यांनी धाराशिव जिल्ह्यात पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला. यावेळी बोलताना त्यांनी शेतकऱ्यांना अशा नुकसानीची सवय लावून घ्यावी लागेल, तसेच निसर्गाच्या ऱ्हासाची कर्मफळे आपल्याला भोगावीच लागतील असे वादग्रस्त विधान केले आहे. सध्या अनेक प्रश्नांची चर्चा सुरू झाली आहे.

ज्या पद्धतीने पावसाने नुकसान झाले आहे, ते पाहता त्या नुकसानीची कुणालाही भरपाई करता येणार नाही. शेतकऱ्यांचे जेवढे नुकसान झाले आहे, तेवढे नुकसान भरून काढण्याची क्षमता कुणाचीच असू शकत नाही. सरकार फक्त मदत करू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी नुकसान सोसण्याची सवय लावून घेतली पाहिजे. कधी जास्त पाऊस होऊन, तर कधी कमी पाऊस पडून, कधी गारपीट, कधी थंडीमुळे शेतकऱ्यांवर वर्षातील ३६५ दिवसांपैकी ३२२ दिवस संकटे येणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. आपण निसर्गाचा प्रचंड नाश केला आहे. त्याचे फळ आपल्याला भोगावेच लागतील, असे पाशा पटेल म्हणाले.

### अत्यंत लज्जास्पद विधान ... अंबादास दानवे

दुसरीकडे, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे आमदार तथा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही या प्रकरणी त्यांच्यावर निशाणा साधला आहे. शेतकऱ्यांचे नुकसान हे केवळ निसर्गाचे कर्मफळ नाही, तर सरकारच्या चुकीच्या धोरणांचा परिणाम आहे. शेतकऱ्यांना आधार देण्याऐवजी असे बेजबाबदार विधान करणे अत्यंत लज्जास्पद गोष्ट आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

### शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळण्याचा प्रकार

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनीही या प्रकरणी पाशा पटेलांवर टीका केली आहे. पाशा पटेल यांना शेतकऱ्यांच्या दुखण्यापेक्षा स्वतःच्या राजकीय भवितव्याची चिंता जास्त आहे. शेतकरी अतिवृष्टी आणि आर्थिक संकटातून जात असातना त्यांना असे सल्ले देणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. सरकारने शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याची गरज आहे, त्यांना संकटाची सवय लावण्याचा सल्ला देण्याची नाही, असे ते म्हणाले.


### पाशा पटेलांनी आत्मपरीक्षण करावे : विजय घाडगे

शेतकरी चवळवळीतील कार्यकर्ते विजय घाडगे यांनी या प्रकरणी पाशा पटेलांना ते शेतकऱ्यांच्या प्रश्नांमुळेच मोठे नेते झाल्याची आठवण करून दिली आहे. पाशा पटेल हे शेतकऱ्यांच्या जीवावर व शेतकऱ्यांच्या प्रश्नावर नेते झाले. पण आता त्यांनीच शेतकऱ्यांच्या विरोधात भूमिका घेतली आहे. सोयाबीन व कापसाच्या प्रश्नावर पायी दिंडी काढणाऱ्या या नेत्याने या प्रकरणी आत्मपरीक्षण केले पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.

# पोथी ही वाचून टाकायची नसते...

ललित गजानन हे चंद्रशेखर टिळक सरांचं पुस्तक हातात आल्यावर एकाच बैठकीत वाचून पूर्ण झालं. जसं त्यांनी या पुस्तकात म्हटलं आहे की एकटाकी हे पुस्तक त्यांचं लिहून झालं.... इतकं अद्भुत आहे.

गजानन महाराजांची पोथी एका आसनावर बसून गुरुपुष्याच्या दिवशी पूर्ण पारायण करावे असा संकेत त्या पोथीत आहे. आणि बरेच दिवस याचं परीक्षण लिहीन लिहीन असं म्हणताना शेवटी आजचा गुरुपुष्य योग साधत आहे.




ललित लेखन म्हणजे एखाद्या घटनेचं अनुभवांचं किंवा विचारांचं भावनिक आणि कलात्मक पद्धतीने केलेले लेखन.त्यात विचारांची स्पष्टता असते. सौंदर्य असतं. भावनांची खोली असते. त्यात लेखक आपल्या भावना आणि कल्पनांना शब्दांच्या माध्यमातून प्रभावीपणे व्यक्त करतो.. हे सगळं सगळं आपल्याला या पुस्तकातून अनुभवता येते. अगदी सुरुवातच त्यांनी 'प्रास्ताविक ललितापासून' केली आहे. त्यात ते सांगतात श्रद्धेय श्री गजानन महाराज वास्तव आहे. त्यांनी दिलेली शिकवण हे तत्त्वज्ञान आहे. आहे ते रोकडे.रोखठोक वास्तव आहे.हे सारे वास्तव आपल्यासारख्यापर्यंत पोहोचवण्याचे काम हे कोणतेही ललित कृती करत असते.म्हणून या प्रकरणाचे नाव' प्रास्ताविक ललित' त्याच्यानंतर तिसऱ्या प्रकरणात चंद्रशेखर सर आपल्याला सांगतातः.. की तीन ही संख्या दासगणू महाराजांची आवडती असावी. आणि त्यांनी संपूर्ण पोथीमध्ये तीन या आकड्याच तीन तीन गोष्टींचा संदर्भ कुठे आलाय..हे अध्याय क्रमांक ओवी क्रमांक असे दिले आहे.

मला व्यक्तिशः हे फार आवडले.. म्हणजे पोथी ही वाचून टाकायची नसते, तर डोळे उघडे ठेवून, त्याचा अर्थ मनाच्या गाभाऱ्यात खोल उमटणे, त्यावर मनन करणे. चिंतन करणे. हे अपेक्षित असते चौथा आणि पाचवे प्रकरण तीनला समर्पित सहावे प्रकरण आहे 'संबोधन ललित'' या पोथीत साकारलेल्या व्यक्तिरेखांच्या जाती व्यवसायाबद्दल वर्णन आले आहे.

दहावे प्रकरण आहे 'खाद्य ललित'- यामध्ये, पोथीमध्ये आलेल्या विविध खाद्यपदार्थांचे रसभरीत वर्णन लेखकाने केले आहे.अगदी त्यांच्या पत्नीने केलेल्या मार्मिक टिप्पणीसहित...... पुढे येते.स्वभाव ललित प्रकरण- यात मानवी स्वभावाचे विविध पैलू उत्कटपणे रंगवून सांगितले आहेत.

बारावे प्रकरण आहे -वस्त्र ललित यात महाराजांना पांगरण्यात आलेल्या विविध वस्त्रांपासून ते त्यांच्या शिष्य पितांबर, याच्या वस्त्राबद्दल वर्णन केले आहे. शेवटी ते म्हणतात नर्मदेचे वर्णन असं केलं आहे. ' माझेच रूप आहे नीर' जलरूपी वस्त्र म्हणजे मीच किंवा मला असं वाटतं... मी.. मैया म्हणजे सर्वच समस्त जलतत्व (असाही अर्थ सरांना अभिप्रेत असावा.)

२१ वे प्रकरण आहे, विचार ललित- श्री गजानन विजय पोथी वाचून पूर्ण होत असताना असे वाटते श्री गजानन महाराज स्वामी समर्थ आणि साईबाबा या तीन महात्म्यांच्या बाबतीत साम्य आहे. इथे पण तीन संतांचा उल्लेख.. त्यांच्याबद्दल त्यांनी तीन गोष्टींचा उल्लेख केला आहे. अह... मी नाही सांगणार... तुम्ही हे पुस्तक जरूर विकत घ्या. मनोभावे वाचा. ती पोथी आणि या पुस्तकातलं वर्णन याचं मनन करा.आस्वाद घ्या. आणि अशा तऱ्हेने आपण जर सगळ्याच पोथ्यांचं वाचन केले... तर आपण नक्कीच समृद्ध होऊ... नाही का? माझे अहोभाग्य की मला प्रत्यक्ष, प्रसिद्ध अर्थतज्ञ, जागतिक कीर्तीचे विचारवंत या पुस्तकाचे लेखक दस्तुरखुद्द श्री चंद्रशेखर टिळक सर यांच्याकडून हे पुस्तक मिळाले.

**- डॉ. सौ. अरुणा टिळक, ठाणे**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मुंबईत येऊन शांततेत आरक्षण घेण्याचा जरांगेंचा संकल्प

**जालना, दि. २० ऑगस्ट -**

मराठा आरक्षणासाठी रान पेटवणाऱ्या मनोज जरांगे यांनी सरकारवर मुंबईत दंगल घडवण्याचा कट आखल्याचा गंभीर आरोप केला आहे. तसेच मुंबईत आल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत, पण शांततेत आरक्षण मिळवण्याचाही संकल्प व्यक्त केला आहे. मराठा आंदोलक मुंबईत यावेत आणि त्यांच्यात दंगल घडून यावी अशी सरकारचीच इच्छा आहे. सरकारच मराठ्यांच्या अंगावर आग फेकू पाहत आहे, असे ते म्हणालेत.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी येत्या २९ ऑगस्टपासून मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. त्याची जय्यत तयारी मराठा आंदोलकांकडून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर जरांगे यांनी शनिवारी जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी संवाद साधताना सरकारवर वरील आरोप केला. ते म्हणाले, माझे मुंबईकरांना सांगणे आहे की, आम्ही शांततेत येणार आणि शांततेतच आमचे आरक्षण घेणार. आमच्या मार्गात कुणीही आडवे आले, तरी आम्ही मुंबईत जाणार. पण आम्ही जेव्हा शांततेत आंतरवाली सराटीत बसलो होतो, तेव्हा आम्हाला मारहाण करण्यात आली. आमच्यातच रक्तपात घडवला गेला. येवल्याच्या लोकांना हाताशी धरून आमच्यात भांडणे लावण्यात आली. मग आता आम्हाला दंगल घडवण्याचा संशय का येऊ नये? मराठा आंदोलक मुंबईत यावेत व त्यांच्यात दंगल घडून यावी अशीच या सरकारची इच्छा आहे. सरकारच मराठ्यांच्या अंगावर आग फेकू पाहत आहे. पण आता सरकार जाणिवपूर्वक मराठ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत असल्याची बाब मराठ्यांच्या लक्षात आली आहे. त्यामुळेच ते संतप्त झालेत. पोलिस बघून घेतील म्हणजे काय? हा दंगल घडवण्याचा दुसरा प्रयत्न नाही काय? आम्ही शांततेत मुंबईला का येऊ नये? आझाद मैदानावर बसून उपोषण का करू नये? असे विविध सवाल जरांगे यांनी या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारवर निशाणा साधताना उपस्थित केले. मनोज जरांगे यांनी यावेळी समाजाला आंदोलनात हिंसाचार करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांपासून दूर राहण्याचेही आवाहन केले. हे लोक आपल्यात घुसून घोषणा देतील. त्यांचेच लोक देवेंद्र फडणवीस यांना शिवीगाळ करतील. पण आमचे लोक जाळपोळ व दगडफेक करणार नाहीत. त्यामुळे पोलिसांनी चुकीचे काम करणाऱ्या लोकांना ताबडतोब पकडावे. २९ ऑगस्ट रोजी आमच्या आंदोलनाला २ वर्षे पूर्ण होत आहेत. गणेशोत्सव आमचाच आहे. आम्ही आमच्या मुलांच्या कल्याणासाठी मुंबईत येत आहोत. मुंबई ही न्याय देणारी भूमी आहे. त्यामुळे आम्ही न्यायासाठी मुंबईत येत आहोत. उलट तुम्ही आम्हाला पाणी दिले पाहिजे, असे ते म्हणाले. मनोज जरांगे यांनी यावेळी मुंबईत यंदा आगळावेगळा गणेशोत्सव साजरा होणार असल्याचेही सूतोवाच केले. ते म्हणाले, आम्ही आमचे गणपती बाप्पा तिथेच आणणार आहोत. मुंबईकर व ग्रामीण महाराष्ट्रातील जनता तिथे एकत्र येत असल्यामुळे गणेशोत्सवाचा असा सोहळा जगात कधीच होणार नाही. आम्ही मराठे हिंदूंचे सर्व संस्कार पाळतो. वारकरी संप्रदायाचेही पालन करतो.



### मुंबईकरांनाही केले आवाहन

गणेशोत्सव आमच्या मुलांच्या सुखासाठी आहे. आरक्षणही त्यांच्या सुखासाठी आहे. आमची चूक काय? आम्ही तुमचीच लेकरे आहोत. गरिबांची लेकरे तुमच्या दाराशी येत आहेत. त्यांचे स्वागत करा, असेही मनोज जरांगे यावेळी मुंबईकरांना उद्देशून म्हणाले. दरम्यान, ४ महिन्यांपूर्वी मुंबईला जाण्याची तारीख ठरली तेव्हा गणेशोस्तव आहे याची कोणतीही कल्पना नव्हती, असेही जरांगे यांनी यावेळी प्रांजळपणे मान्य केले.

### नांगरांचे बैल बदलण्यासारखे

मराठा समाजाच्या मागण्यांच्या संदर्भात राज्य सरकारने पुनर्रचित केलेली मंत्रिमंडळ उपसमिती म्हणजे पोळ्याच्या दिवशी केलेला खांदेबदल आहे. उपस समिती आणि आमच्या मागण्या हे वेगळे विषय आहेत, असे मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी सांगितले. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रीमंडळ उपसमितीची पुनर्रचना करण्यात आली असून अध्यक्षपद आता जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे देण्यात आले आहे. उपसमिती हे पूर्वीचेच खूळ असून त्यामध्ये नवीन काही नाही. दुपारी नांगरांचे बैल बदलावेत तसे हे आहे. हा झाला की तो याप्रमाणे नांगरांचे बैल बदलले जातात. आता पोळयाच्या दिवशी उपसमितीमध्ये खांदे बदलले आहेत. आमच्या मागण्याच सरकारच्या डोक्यात येत नाहीत.

# अभियांत्रिकीच्या थेट दुसरे वर्ष प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीनंतर २० हजार जागा रिक्त

**मुंबई, दि. २० ऑगस्ट -**

अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्षाला प्रवेश मिळतो. त्यामुळे पदविका पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा या राखीव जागांवर प्रवेश घेण्यासाठी मागील काही वर्षांमध्ये कल वाढतो आहे. यंदा अभियांत्रिकीच्या थेट द्वितीय अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या फेरीनंतर ११ हजार ९१३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. तर २० हजार ५६६ जागा अद्यापही रिक्त आहेत. त्यामुळे पुढील दोन फेऱ्यांमध्ये किती विद्यार्थी प्रवेश घेतात हे महत्त्वाचे ठरणार आहे.

अभियांत्रिकी द्वितीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राज्यात ५२ हजार १४ जागा असून, या जागांसाठी यंदा ५७ हजार ८१० विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादीमध्ये निवड झालेली आहे. निवड झालेल्या या विद्यार्थ्यांपैकी ११ हजार ९१३ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन प्रवेश घेतला. तर १९ हजार ५३५ विद्यार्थ्यांनी 'उत्तम महाविद्यालय' हा पर्याय निवडला आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना आता तिसऱ्या फेरीमध्ये अपेक्षेप्रमाणे महाविद्यालय न लागल्यास या विद्यार्थ्यांना पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये लागलेल्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घ्यावा लागणार आहे. दोन फेऱ्यानंतर २० हजार ५६६ जागा रिक्त राहिल्या आहेत. या जागांवरील प्रवेशासाठी तिसऱ्या फेरीला २२ ऑगस्टपासून सुरुवात झाली आहे. या फेरीची गुणवत्ता यादी २६ ऑगस्ट रोजी जाहीर होणार आहे. या यादीमध्ये प्रवेशाची संधी मिळालेल्या विद्यार्थ्यांना २८ ते ३० ऑगस्ट दरम्यान प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन प्रवेश घेता येणार आहे.



### यंदा जागांमध्ये घट

अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या एकूण जागांच्या १० टक्के जागा आणि गतवर्षी प्रवेश न झाल्याने रिक्त राहिलेल्या जागांवर थेट दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश दिला जातो. अभियांत्रिकी अभ्यासक्रच्या दुसऱ्या फेरीसाठी २०२३-२४ मध्ये ४६ हजार १३४ जागा होत्या. त्यातील ३४ हजार ७१६ जागांवर प्रवेश झाले तर २०२४-२५ मध्ये ६० हजार २४५ जागा होत्या. यातील ४१ हजार ८९४ जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले होते, मात्र यंदा जागांमध्ये घट झाली आहे. २०२५-२६ मध्ये ५२ हजार १४ जागा आहेत. त्या जागांवर आतापर्यंत ११ हजार ९१३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत.



# सुरवसे प्रशालेमध्ये विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप

**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट -**

होटगी रोडवरील सुरवसे प्रशालेमध्ये कै. सुरेश सुरवसे यांच्या स्मृतिदिनी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्या गीतांजली पिरगुंडे यांची उपस्थिती होती. यावेळी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक दीपक डांगे बालक मंदिर विभागाचे मुख्याध्यापिका शुभांगी लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते कै. सुरेश आण्णा सुरवसे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्राचार्या पिरगोंडे यांनी मनोगतातून ज्यांच्या नावाने पुत्र प्रेमाने भारावून जाऊन कामगारांच्या मुलांना शिक्षण घेता यावे शैक्षणिक सामाजिक प्रवाहात गरीब हुशार व तळागाळातल्या मुलांना ताट मानाने जगता येईल या शुद्ध व पवित्र हेतूने कै. सखाराम दादा सुरवसे यांनी आपल्या मुलांच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी १९८५ ला कै. सुरेश सखाराम सुरवसे चारिटेबल ट्रस्ट संचलित सुरवसे शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून उद्योगपती दत्तांअण्णा सुरवसे व राजकुमार सुरवसे यांनी या शिक्षण संस्थेची वाटचाल निरंतर ठेवली या या संस्थेचे यशस्वी वाटचाल करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. यावेळी प्रशालेचे माजी विद्यार्थी रजाक मुल्ला तसेच (२००० साली दहावी पास) आऊट झालेले विद्यार्थी वल्लभ कुलकर्णी, स्वामी, तेजस सवळे, श्रीशैल बिल्लाड, यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले.

# सोलापूर शहरातील प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करावीत

- मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी यांचे निर्देश
- महापालिकेतील बैठकीत घेतला विविध महत्त्वपूर्ण प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा

**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट -**

सोलापूर शहराचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत आवश्यक सहकार्य करण्यात येईल. प्रलंबित प्रकल्प वेळेत पूर्ण करून नागरिकांना दर्जेदार सेवा देण्याचे उद्दिष्ट ठेवून कार्य केले पाहिजे. प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करण्याचे व अडचणी दूर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी यांनी दिले.

सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन विभाग, छत्रपती संभाजी महाराज तलाव, महात्मा गांधी प्राणी संग्रहालय तसेच शहरातील विविध महत्त्वपूर्ण प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली आज सोलापूर महानगरपालिकेत महत्त्वपूर्ण बैठक झाली. त्याप्रसंगी त्यांनी हे निर्देश दिले.

या बैठकीत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त तैमूर मुलाणी, मुख्य लेखा अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, नगर अभियंता सारिका आकुलवार, तपन डंके, रामचंद्र पेंटर, जागतिक बँकेचे प्रतिनिधी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी महात्मा गांधी प्राणी संग्रहालय व सांडपाणी प्रक्रिया व बायोगॅस प्रकल्पासह शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने घेतलेल्या या बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांवर सविस्तर चर्चा झाली. या बैठीकत भुयारी गटारी योजना, अमृत योजना व राज्यस्तरीय नगरोत्थान योजनेतील कामांची सद्यस्थिती व प्रगतीचा आढावा घेण्यात आला.



### महापालिका आयुक्तांशी केली चर्चा

संध्याकाळी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या निवासस्थानी दिवसभर झालेल्या बैठकीसंदर्भात स्वतंत्र चर्चा करण्यात आली. या आढावा बैठकीत सोलापूरच्या पाणीपुरवठा, परिवहन, सांडपाणी प्रक्रिया, महात्मा गांधी प्राणी संग्रहालय विकास आराखडा, छत्रपती संभाजी महाराज तलाव, निगडित प्रकल्पांना गती देण्याचे स्पष्ट करण्यात आले.

### जागतिक प्रतिनिधींचा आढावा दौरा

बैठकीनंतर जागतिक बँकेचे प्रतिनिधींनी मनपाच्या सात रस्ता बस डेपो, छत्रपती संभाजी महाराज तलाव, महात्मा गांधी प्राणी संग्रहालय तसेच देगाव येथील एसटीपी प्लांटची पाहणी केली. यावेळी एनटीपीसी थर्मल पॉवर येथे भेट दिली.

# माझ्या पांडुरंगाला मी मटण खाल्लेले चालते तुम्हाला काय प्रॉब्लेम?

- सुप्रिया सुळेंचा सवाल; मुख्यमंत्री वेळ देत नसल्याचा आरोप

**नाशिक** : मी मटण खाल्लेले माझ्या पांडुरंगाला चालते, तर तुम्हाला काय अडचण? असा प्रश्न सुप्रिया सुळे यांनी विरोधकांना केला आहे. आम्ही आमच्या पैशांनी खातो. आपण कुणाला मिंधे नाहीत, असेही त्यांनी म्हटले. तसेच, त्यांनी महायुती सरकारवरही अनेक मुद्द्यांवरून टीका केली. त्या दिंडोरी येथे महात्मा फुलेंच्या पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमात बोलत होत्या.

दिंडोरी तालुक्यातील खेडगाव येथे महात्मा फुलेंच्या पुतळ्याचे अनावरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला मंत्री नरहरी झिरवळ आणि सुप्रिया सुळे यांनी उपस्थिती लावली होती. कार्यक्रमात भाषण दरम्यान मंत्री नरहरी झिरवळ यांच्यां समोरच सुप्रिया सुळे यांची सरकारवर सडकून टीका केली. मी रामकृष्ण हरी वाली आहे. फक्त माळ घालत नाही. कारण कधी कधी मटण खाते, खरे बोलते. मी काही त्यांच्यासारखे खोटे बोलत नाही. माझ्या पांडुरंगाला चालते, तर तुम्हाला काय प्रॉब्लेम आहे? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी विरोधकांना केला. आमचे आई-वडील खातात, सासू-सासरे खातात, नवरा खातो, असेही त्या म्हणाल्या. आम्ही आमच्या पैशांनी खातो. दुसऱ्यांचे आपल्याकडे उधार नाही. आपण कुणाला मिंधे नाहीत. एकदा कुठेतरी जेवायला गेले असता, तिथे मटण खाल्ले होते. तेवढेच व्हायरल केले. खाल्ले तर काही पाप केले का? खायचा मोह होतो म्हणून अजून माळ घातली नाही. जे करायचे डंके की चोट पे, दिल खोल के करो, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

सुप्रिया सुळे यांनी यावेळी सरकारच्या कारभारावर टीका केली. मुख्यमंत्री तर मला वेळच देत नाही, असा आरोप सुळे यांनी केला. मुख्यमंत्री वेळ देत नसल्याने मी मागणेच बंद केले आहे. दहा वेळा आपण वेळ मागतो, पण वेळ देत नाहीत. याचा अर्थ काय, त्यांना वेळ द्यायचा नाही. म्हणून आम्ही थेट दिल्लीत जाऊन अमित शाह यांची भेट घेतो. मी ठरवले आहे, इथे काम करत नाही ना, माझी कामे दिल्लीत होतात असे सांगत त्यांनी अमित शहा यांचे जाहीर आभारही मानले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरसकट कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, मात्र ते पूर्ण केले नाही, असेही त्यांनी म्हटले. सुप्रिया सुळे यांनी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर देखील टीका केली. पत्ते तुम्ही खेळायचे आणि कोर्टात चकरा आम्ही मारायच्या का? तुमची आब्रु तुमच्याच मागच्या माणसाने घालवली. व्हिडीओ कोणी काढला? असा सवालही सुप्रिया सुळे यांनी केला. रोहित पवार यांना सारख्या नोटीस येतात. पण आमचा रोहित घाबरत नाही, असेही त्या म्हणाल्या.

### लाडकी बहीण योजनेत मोठा घोटाळा

सुप्रिया सुळे यांनी सरकारच्या 'लाडकी बहीण' योजनेत मोठा घोटाळा झाल्याचा आरोप केला. या योजनेतून २५ लाख महिलांची नावे कमी करण्यात आली आहेत. माझी सगळ्यांना विनंती आहे, झिरवाळ साहेब आपण ताकदीने याचा विरोध करायला हवा. ४ हजार ८०० कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. हजारो पुरुषांनी एवढे फॉर्म भरले कसे?'' असा सवालही सुळे यांनी केला. लाडक्या बहीण योजनेची संपूर्ण चौकशी करणार असल्याचेही सुप्रिया सुळे यांनी म्हटले.

# राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार

- बंगालच्या उपसागरात पुन्हा कमी दाबाचा पट्टा;
- २५ ऑगस्टपासून मुसळधार

**मुंबई** : मागील दोन दिवसांपासून राज्यात पावसाने उघडीप दिली असली तरी, आता पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात पुन्हा एकदा तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे येत्या काही दिवसांत राज्यातील काही जिल्ह्यांत अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.मागील आठवड्यात महाराष्ट्रात मुसळधार पावसाने थैमान घातले होते. १६ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट दरम्यान झालेल्या पावसामुळे मोठे नुकसान झाले होते. अतिवृष्टीमुळे शेतजमिनी पाण्याखाली गेल्या, पिकांचे मोठे नुकसान झाले आणि शेतकरी हवालदिल झाले. दोन दिवसांपासून पावसाचा जोर कमी झाला असला, तरी धोका अजूनही टळलेला नाही. हवामान विभागाच्या नव्या अंदाजानुसार, पुणे, सातारा, कोल्हापूर, रायगड तसेच मराठवाड्यातील धाराशिव, लातूर आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली असून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

काही दिवसांपूर्वी बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे महाराष्ट्रासह अनेक राज्यांत मुसळधार पाऊस झाला होता. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात पुन्हा कमी दाबाचा पट्टा तयार होत आहे, जो राजस्थान आणि पंजाब परिसरात सक्रिय होईल. याचा परिणाम म्हणून २५ ते २८ ऑगस्ट दरम्यान महाराष्ट्रात पावसाचा जोर पुन्हा वाढणार आहे. विशेषतः, मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाडा या भागांत जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पुढील पाच दिवस विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. पुढील २४ तासांत रायगड, सातारा, पुणे आणि कोल्हापूर जिल्ह्यांसह घाटमाथ्यावर मुसळधार पावसाची शक्यता असून या भागांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. हवामान विभागाने नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन करताना, पूरसदृश परिस्थिती किंवा भूस्खलनाचा धोका असलेल्या भागांत सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे.

# मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिलंय मग कशासाठी आग्रह?

- छगन भुजबळांचा जरांगेंवर हल्लाबोल

**मुंबई** : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाची हाक दिली असून, येत्या २९ ऑगस्ट रोजी मराठा मोर्चा मुंबईत धडकणार आहे. यावर ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिल्यानंतरही हे आंदोलन कशासाठी? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी येत्या २९ ऑगस्टपासून मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. त्याची जय्यत तयारी मराठा आंदोलकांकडून केली जात आहे. मराठा आरक्षणासाठी निघणारा हा मोर्चा पहिल्या मोर्च्यांपेक्षा पाच पट मोठा असेल, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला आहे. मनोज जरांगे आपल्या मोर्चावर ठाम असून, छगन भुजबळ यावर प्रतिक्रिया दिली आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याची त्यांची मागणी होती, ती पूर्ण केलेली आहे. मराठा समाजाला दहा टक्क आरक्षण देण्यात आले आहे. मराठा समाजाला देण्यात आलेले आरक्षण आम्ही टिकवणार असल्याचेही मुख्यमंत्री यांनी म्हटले आहे. त्यामुळे तो प्रश्न संपलेला आहे. मग हा आग्रह कशासाठी? हे कळण्याच्या पलिकडचे आहे, अशी टीका छगन भुजबळ यांनी मनोज जरांगेंवर केली. भुजबळांनी मोर्चाच्या वेळेबाबतही नाराजी व्यक्त केली. पावसामध्ये, गणपती उत्सवामध्ये हे काय करणार आहे? मला काही कळत नाही. लोकांना का त्रास देतायेत? असा सवाल छगन भुजबळ यांनी उपस्थित केला. त्यांचे जर हेच म्हणणे असेल की, ओबीसीमधून आरक्षण पाहिजे, तर चार आयोगांनी आरक्षण नाकारलेले आहे. सुप्रीम कोर्टानेही फार मोठा जजमेंट दिलेले आहे, असेही भुजबळ यांनी म्हटले आहे. छगन भुजबळ पुढे म्हणाले, बाकीच्या काही गोष्टी आहे. सारथी, बार्टी, महाज्योती या सारख्या संस्था आहेत. त्यावर आपण विचार केला पाहिजे. सारथीच्या माध्यमातून मिळणाऱ्या गोष्टींपैकी अनेक गोष्टी महाज्योतीच्या वाट्याला आलेल्या नाहीत. म्हणून मी मंत्रिमंडळात नेहमी सांगत असतो, ओबीसीची संख्या मोठी आहे, त्यांना किमान समान वागणूक द्या. पैसे कोण देते? हे विद्यार्थ्यांना कळत नाही. आदिवासी आणि दलित समाजाला दिल्लीतून पैसे येतात. विद्यार्थ्यांना एवढेच माहिती असते की, सरकार पैसे देते, मात्र आम्ही या गोष्टी विद्यार्थ्यांना नाही सांगू शकत. मग त्यांच्या मनात असा प्रश्न निर्माण होतो, त्याला देतात मग मला का देत नाही.

# 'चाकरमानी' नाही, आता 'कोकणवासीय' म्हणा

## उपमुख्यमंत्री अजित पवारांचे प्रशासनाला निर्देश, लवकरच शासन आदेश काढणार

**मुंबई, दि. २० ऑगस्ट -**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आता 'चाकरमानी' ऐवजी 'कोकणवासीय' या शब्दाचा वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. 'चाकरमानी' हा शब्द कोकणातील नागरिकांचा अपमान करतो, अशी भावना कोकणातील अनेक संघटनांनी व्यक्त केली होती. त्यामुळे 'चाकरमानी' या शब्दाला अनेक वर्षांपासून कोकणातील संघटनांकडून विरोध होत होता. या मागणीचा आणि कोकणवासीयांच्या भावना विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच याबाबत अधिकृत परिपत्रक जारी करण्यात येणार आहे.

कोकणातून मुंबई, पुणे आणि इतर शहरांमध्ये कामासाठी स्थलांतरित झालेल्या लोकांना आतापर्यंत 'चाकरमानी' म्हटले जायचे. परंतु, या शब्दाला कोकणवासीयांनी आक्षेप घेतला होता. 'चाकर' म्हणजे 'नोकर' किंवा 'सेवक'आणि' मानी' म्हणजे मानणारा असा अर्थ होत असल्याने, हा शब्द अपमानजनक वाटत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली होती. या मागणीचा विचार करून, अजित पवारांनी प्रशासनाला यापुढे फक्त 'कोकणवासीय' या नावाने त्यांना संबोधण्याचे आदेश दिले आहेत. गणेशोत्सवाच्या तोंडावर हा निर्णय जाहीर झाल्यामुळे कोकणवासीयांनी समाधान व्यक्त केले आहे.

मंत्रालयात झालेल्या एका बैठकीत रायगडचे खासदार सुनील तटकरे आणि कोकणातील संघटनांनी ही मागणी केली. त्यावेळी अजित पवारांनी या मागणीला पाठिंबा दिला. कोकणवासीय हे केवळ कामगार नसून, ते महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. त्यामुळे त्यांना योग्य सन्मान मिळायला हवा. 'चाकरमानी' हा शब्द त्यांची सांस्कृतिक ओळख आणि स्वाभिमान कमी करतो, असे मत अजित पवारांनी व्यक्त केले.



### पोलिसांनी माणुसकीला धरून काम करावे

दरम्यान, जालना येथे स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी पोलिस उपअधीक्षक अनंत कुलकर्णी यांनी एका आंदोलकास धावत जाऊन फिल्मी स्टाईल पद्धतीने कंबरेत लाथ मारल्याचा प्रकार घडला होता. या घटनेचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाल्यानंतर चांगलाच गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले होते. पोलिस अधिकाऱ्यावर कारवाईबद्दल अजित पवारांना प्रश्न विचारण्यात आला असता, आमच्या पोलिसांची काही नियमावली ठरलेली आहे, त्यानुसार कारवाई होईल. वास्तविक असे कोणी लाथ मारायची नसते. कायदा कोणी हातात घ्यायचा नसतो. कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ज्या यंत्रणेची असते त्या यंत्रणेनेदेखील माणुसकीला धरून काम केले पाहिजे अशी आमच्या सरकारची भूमिका आहे, असे ते म्हणाले.

### लवकरच परिपत्रक होणार जारी

या निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी शासन लवकरच परिपत्रक जारी करणार आहे. यामुळे सरकारी दस्तऐवज, पत्रके, जाहिराती आणि अधिकाऱ्यांच्या भाषणात 'चाकरमानी' हा शब्द टाळला जाईल. कोकणवासीयांच्या स्वाभिमानाला सन्मान देणारा हा निर्णय सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील रोजगारांवरील टांगती तलवार!

**जगात माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात सातत्याने बदल प्रवाही असतात. आज जगात सर्वत्र अस्थिरतता असतानाही होणारे बदल या क्षेत्रात प्रामुख्याने जाणवत आहेत. त्यातील काही बदल चांगले असले, तरी काही बदलांमुळे कर्मचारी कपातीची नामुष्कीही ओढावत आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील या बदलांचा घेतलेला आढावा...**

**व्यवस्थापननिती**
**दत्तात्रय आंबुलकर**



संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील 'टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस' म्हणजेच नावाजलेल्या अशा 'टीसीएस'या आघाडीच्या कंपनीने कर्मचारी कपातीची शक्यता वर्तवली आहे. जागतिक स्तरावर वाढलेली व्यावसायिक अस्थिरता व नजीकच्या काळातील अनिश्चित परिस्थिती लक्षात घेऊन 'टीसीएस' मध्यम व उच्चस्तरीय स्तरांवरील सुमारे १२ हजार कर्मचार्यांना सेवामुक्त करण्याची शक्यता आहे. आजतागयत व्यावसायिकता, व्यवस्थापन आणि कर्मचार्यांप्रति सहानुभूतीपूर्वक भूमिका बाळगणार्या 'टीसीएस'च्या कर्मचारीकपातीच्या निर्णयाचे संभाव्य परिणाम देशातील माहिती तंत्रज्ञान व संगणकीय सेवा क्षेत्रात सर्व स्तरावर उमटणे स्वाभाविक होते.

यासंदर्भात प्रामुख्याने व सर्वप्रथम उमटलेली 'टीसीएस' व्यवस्थापनाची प्रतिक्रिया वर नमूद केली असून, कर्मचार्यांच्या कपातीसंदर्भात आलेली त्यांची प्रतिक्रिया म्हणजेच प्रस्तावित भूमिका होय! ही भूमिका म्हणजे सद्यस्थितीत भारतातील संगणक क्षेत्र आणि संबंधित क्षेत्रातील अस्थिरतेचे द्योतकच समजायला हवी.

या क्षेत्रातील जाणकारांच्या मते, सध्या आपले माहिती तंत्रज्ञान व संबंधित क्षेत्र हे मोठ्या स्थित्यांतरातून जात आहे. यामुळे भारतातील संगणकीय सेवा उद्योगात तंत्रज्ञानापासून माहितीची देवाण-घेवाण, आर्थिक व्यवहार या सार्यांवरच मोठे परिणाम होत आहेत. याचे परिणाम भारतासह जागतिक स्तरावरही होत आहेत. यामध्ये विविध संसाधनांच्या नेमक्या व मोजक्या वापरासह आर्थिक निर्बंधांवर भर देण्यात येत असून, त्याचा अपरिहार्य परिणाम कर्मचारी आणि त्यांच्या संस्थेवर होत आहे.

दरम्यान, संगणक क्षेत्र आणि व्यवसायाला त्यांच्या फायदेशीर अस्तित्वासाठी कार्यालय, कर्मचारी, तंत्रज्ञान व आर्थिक दृष्टिकोन या सर्व बाबींचा साकल्याने विचार करूनच, त्यानुसार ध्येयधोरणाची नव्याने आखणी वा प्रसंगी फेरआखणी करावी लागते. वाढती स्पर्धा हा मुद्दासुद्धा सर्वांसाठी महत्त्वाचाच ठरतो. त्यातच भर पडते ती संगणक सेवा क्षेत्रातील वाढत्या अपेक्षांची! त्यांची पूर्तता करण्यासाठी यापूर्वी न वापरलेल्या उपाययोजनांचा विचार आणि वापर करणे अपरिहार्यच ठरते. यामध्ये कार्यालयीन जागा व कामकाजापासून, कर्मचार्यांच्या कार्यक्षमतेपर्यंत सर्वच मुद्द्यांचा प्रामुख्याने समावेश करण्यात येतो.

याचदरम्यान संगणक सेवा क्षेत्रातील अजून एक नामांकित कंपनी असलेल्या 'इन्फोसिस'ने, त्यांच्याकडे कोणतीही कर्मचारी कपात होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. 'इन्फोसिस'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सलिल प्रकाश यांनी जाहीर केलेल्या निर्णयानुसार कंपनीने कृत्रिम बुद्धिमत्ता व कर्मचार्यांच्या नव्या स्वरुपातील कौशल्यविकासाद्वारे, कंपनीच्या कर्मचारी कपातीसंदर्भातील चर्चेला पूर्णविराम दिला आहे. एवढेच नव्हे, तर एकीकडे कर्मचारी कपातीची शक्यता स्पष्टपणे फेटाळून लावतानाच, 'इन्फोसिस' आगामी वर्षभरात सुमारे २० हजार नव्याने उत्तीर्ण झालेल्या संगणक पदवीधरांना प्रशिक्षार्थी म्हणूनही घेणार असल्याची केलेली घोषणा हा सध्या मुख्य चर्चेचा विषय झाला आहे.

कंपनीच्या व्यवसाय आणि व्यवस्थापनाची दिशा स्पष्ट करताना सलिल प्रकाश यांनी स्पष्ट केलेली बाब म्हणजे, नव्या व्यावसायिक गरजा व व्यवस्थापन पद्धती यांचा व्यवसायानुकूल भर देण्यावर त्यांचा भर राहणार असून, कृत्रिम बुद्धिमत्तेचा अधिकाधिक परिणामकारक वापर करून व्यवसाय वाढवणे हे कंपनीचे उदिष्ट आहे. त्याचवेळी कृत्रिम बुद्धिमत्ता हे क्षेत्र सर्वार्थाने नवे असल्याने, त्यातील कौशल्यपूर्ण कर्मचार्यांची सर्वत्र वानवा आहेच. कौशल्यांच्या संदर्भातील नेमकी हीच गरज व त्याच्याशी निगडित आव्हाने लक्षात घेऊन, कंपनीने नव्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी उमेदवारांना प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. याचाच एक भाग म्हणून, नव्या कर्मचार्यांची निवड करण्याच्या पहिल्या टप्प्यात सुमारे १६ हजार प्रशिक्षार्थी कर्मचार्यांची नेमणूक केली जाणार आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

सुरुवातीलाच नमूद केल्यानुसार, सध्या जगाच्या पाठीवर माहिती तंत्रज्ञान उद्योग क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणावर व्यवसाय, कार्यपद्धती, धोरण, विस्तार, कर्मचार्यांचे प्रश्न यावर मोठ्या प्रमाणावर विमर्श सुरु आहे. त्यानुसार संबंधित कंपनींच्या धोरणात आणि कामकाजाच्या शैलीमध्ये आवश्यक बदल करणे अपरिहार्य ठरत आहे.

संगणक क्षेत्रातील या महत्त्वाच्या बदलांमध्ये प्रामुख्याने पुढील मुद्द्यांचा समावेश करता येईल.

**व्यावसायिक फायद्यासाठीची तीव्र स्पर्धा :** इतर व्यवसायांप्रमाणेच संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान व्यवसायामध्ये स्पर्धा असणे अपरिहार्य असले, तरी सध्या या स्पर्धेची व्याप्ती आणि तीव्रता प्रकर्षाने वाढली आहे. सध्या अधिकाधिक नफा मिळविण्यावरच भर दिला जात असून, त्यासाठी प्रसंगी अतिरेकी व्यावसायिक नीतीपद्धतींचा वापर केला जात आहे.

**व्यावसायिक फेररचना :** बदलत्या व्यावसायिक गरजा, वाढती स्पर्धा व विविध स्वरूपांची आव्हाने या सार्यांना एकाचवेळी तोंड देण्यासाठी व्यवसाय-व्यवस्थापन आणि कंपनी-कर्मचारी या क्षेत्रांची पुनर्रचना करणे सध्या अपरिहार्य झाले आहे. यासाठी उपाययोजना म्हणून, कृत्रिम बुद्धिमता क्षेत्र अग्रक्रमाने पुढे येत आहे. त्याचा वापरही आवश्यकच नव्हे, तर अपरिहार्यपण ठरला आहे.

**कर्मचाऱ्यांचे सोडून जाणे :** कंपन्यांसाठी परिणामकारक स्वरूपाचे काम करणार्या कर्मचार्यांचे राजीनामे हे मोठे आव्हान असते. सद्यस्थितीत व वाढत्या व्यावसायिक स्पर्धेला तोंड देताना, विशेषतः एरव्हीसुद्धा कामाच्या व कौशल्यप्राप्त कर्मचार्यांना टिकवून ठेवणे हे संगणकशास्त्र उद्योगासाठी आवश्यक आहे. तरी सध्या हीच बाब बदलत्या परिस्थितीत या व्यवसाय क्षेत्रासाठी अत्यावश्यक ठरली आहे.

याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाकडे शस्त्र आणि शास्त्र उभय दृष्टिकोन आणि भूमिकांसह पाहाणे गरजेचे आहे. कंपनी, तिचे कामकाज, कर्मचारी या सार्यांसाठीच नव्या बदलांचा अपरिहार्य हिस्सा म्हणून कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेतले पाहिजे. त्यातूनच कर्मचार्यांची व पर्यायाने कंपन्यांची उपयुक्तता निश्चितपणे व्यवसायपूरक ठरणार आहे.

**(लेखक एचआर-व्यवस्थापन सल्लागार आहेत)**
९८२२८४७८८६

# मताधिकार की लांगुलचालन ?

**बिहारच्या राजकारणात पुन्हा एकदा मुस्लिम मतांच्या ध्रुवीकरणाचा खेळ सुरू झाला आहे. विधानसभा निवडणुका जवळ आल्या की प्रत्येकवेळी दिसणारा हा ट्रेंड यंदाही नव्या आक्रमक रूपात समोर आला आहे. विशेष म्हणजे या वेळी काँग्रेस पक्षाने मुस्लिम मतदारांवर डोळा ठेवून आपली संपूर्ण रणनीती आखल्याचे स्पष्टपणे दिसून येते. बिहारमध्ये गेल्या काही महिन्यांपासून राजकीय वातावरण तापले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधींनी नुकतीच सुरू केलेली तथाकथित ''वोटर अधिकार यात्रा'' प्रत्यक्षात मताधिकारापेक्षा मुस्लिम मतदारांना आपल्या बाजूला वळवण्याचा राजकीय डाव असल्याचे स्पष्ट होत आहे.**



**राजनिती**
**पार्थ कपोले**

बिहारमध्ये नुकत्याच झालेल्या स्पेशल इन्टेन्सिव्ह रिव्हिजन (एसआयआर) अंतर्गत निवडणूक आयोगाने तब्बल ६५.५ लाख लोकांची नावे मतदार याद्यांमधून वगळली आहेत. हे आकडे बरेच काही सांगतात. या दहा जिल्ह्यांपैकी पाच जिल्ह्यांत मुस्लिम लोकसंख्या लक्षणीय आहे. २०२३ साली बिहार सरकारने केलेल्या जातीय जनगणनेनुसार राज्याच्या १३ कोटी लोकसंख्येपैकी १७.७० टक्के म्हणजे जवळपास २ कोटी ३० लाख लोक मुस्लिम आहेत. ही केवळ संख्येची ताकद नसून, बिहारच्या असंख्य विधानसभा मतदारसंघांवर निर्णायक प्रभाव टाकणारा घटक आहे. त्यामुळेच प्रत्येक पक्षाचा डोळा या मतांवर असतो आणि काँग्रेसही याला अपवाद नाही.

२०१० च्या बिहार निवडणुकीत नितीशकुमार-भाजप युतीला मोठा विजय मिळाला होता. त्या वेळी लालू प्रसाद यादव आणि काँग्रेसला मुस्लिम मतदारांचा मोठा आधार अपेक्षित होता, पण त्यात मोठी फूट पडली. मुस्लिम समाजाचा एक मोठा भाग लालू-राबडी राजवटीतील गुन्हेगारी आणि असुरक्षिततेमुळे त्रस्त झाला होता. परिणामी, अनेक ठिकाणी मुस्लिमांनी रालोआ उमेदवारांनाही पाठिंबा दिला. त्याचा परिणाम म्हणजे एनडीएला तब्बल २०६ जागा मिळाल्या. मात्र २०१५ मध्ये परिस्थिती पूर्णपणे बदलली. नरेंद्र मोदींच्या उदयानंतर मुस्लिम मतदार एकजूट होऊ लागले. नितीशकुमारांनी भाजपपासून हात काढून लालू यादवांसोबत महागठबंधन केले. त्याचा थेट परिणाम मुस्लिम मतांच्या ध्रुवीकरणावर झाला. तब्बल ८०-९० टक्के मुस्लिम मतदारांनी महागठबंधनला पाठिंबा दिला. या निवडणुकीत काँग्रेसलाही २७ जागा मिळाल्या, कारण मुस्लिम मतांचा मोठा ओघ त्या आघाडीकडे गेला होता. २०२० मध्ये पुन्हा एकदा समीकरणे बदलली. नितीशकुमार परत भाजपसोबत आले, तर लालू यादव मुस्लिम-यादव या समीकरणावर ठाम राहिले. २०२० च्या आकडेवारीनुसार १६-१८ टक्के मुस्लिम मतदारांनी ओवैसींच्या एआयएमआयएमला मत दिले, ज्यामुळे आरजेडी-काँग्रेसला फटका बसला. उदाहरणार्थ, सीमांचलातील किशनगंज, कटिहार, अररिया या जिल्ह्यांमध्ये ओवैसींना चांगला पाठिंबा मिळाला. परिणामी, २०२० मध्ये काँग्रेसला फक्त १९ जागा मिळाल्या, तर राजद सर्वात मोठा पक्ष ठरला, मात्र त्यांना सरकार बनवता आले नाही. या तिन्ही निवडणुकांचा धडा स्पष्ट आहे मुस्लिम मतदार ज्या आघाडीशी एकजूट झाले, त्यांना सत्ता गाठण्यास मदत झाली. आणि जेथे त्यांची मते विभागली, तेथे हिंदुत्ववादी-भाजप आघाडीस सत्ता मिळाली.

त्यामुळेच राहुल गांधींच्या १६ दिवसांच्या यात्रेने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. १७ ऑगस्टपासून सुरू झालेली ही यात्रा नेमक्या त्या भागांतून जाते आहे, जेथे मुस्लिमांची टक्केवारी राज्याच्या सरासरीपेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. किशनगंजमध्ये तब्बल ६८ टक्के, कटिहारमध्ये ४३ टक्के, अररिया ४१ टक्के, पूर्णिया ३७ टक्के इतकी मुस्लिम लोकसंख्या आहे. याशिवाय दरभंगा, पश्चिम चंपारण, सीतामढी, पूर्व चंपारण, भागलपूर आणि मधुबनी अशा सीमावर्ती जिल्ह्यांतही मुस्लिम लोकसंख्या १८ ते २२ टक्क्यांच्या दरम्यान आहे. ही केवळ योगायोगाची बाब आहे का, असा प्रश्न मतदारांच्या मनात निर्माण होणे साहजिक आहे. खरेतर, बिहारमध्ये काँग्रेसची राजकीय ताकद जवळजवळ संपुष्टात आली आहे. अशा स्थितीत राहुल गांधींनी निवडलेल्या या विशिष्ट मार्गामागे निव्वळ मतांची राजकीय गणिते दडलेली आहेत.

याहून गंभीर बाब म्हणजे या जिल्ह्यांमध्ये बांगलादेशातून अवैधरित्या शिरलेल्या घुसखोरांची मोठ्या प्रमाणात वस्ती आहे. गुप्तचर अहवाल, केंद्र सरकारच्या नोंदी आणि विविध न्यायालयीन निरीक्षणांतून ही बाब वारंवार समोर आली आहे. अवैध घुसखोर फक्त सुरक्षेलाच नाही, तर देशाच्या जनसंख्यात्मक संतुलनालाही धक्का पोहोचवतात. सीमावर्ती भागांत गेल्या काही वर्षांत लोकसंख्येचे प्रमाण जलद गतीने बदलले आहे. ही केवळ सामाजिक समस्या नसून राष्ट्रीय सुरक्षेशी निगडित अत्यंत गंभीर बाब आहे. अशा संवेदनशील परिस्थितीत काँग्रेस पक्षाने या भागांना प्राधान्य देणे, मौलानांसोबत बैठका घेणे, इमरान प्रतापगढीसारख्या तथाकथित मुस्लिम चेहऱ्यांना सक्रिय करणे, हे सर्व काही ठरवून केलेले राजकारण आहे.

भाजपनेही या यात्रेवर तीव्र टीका केली आहे. ''ही यात्रा नसून वोटबँक राजकारण आहे,'' असा थेट आरोप भाजप नेत्यांनी केला. पक्षाचे नेते अमित मालविय यांनी तर या प्रवासाला ''घुसखोर बचाव यात्रा'' असे नाव दिले आहे. ही टीका विनाकारण नाही. कारण काँग्रेसने पूर्वी आसाम, बंगाल आणि केरळमध्येही अशाच प्रकारे डेमोग्राफिक बदलांवर मौन बाळगले होते. सीमावर्ती भागांत होणाऱ्या घुसखोरीकडे काँग्रेसने कायमच राजकीय लाभाच्या दृष्टीने पाहिले आहे. आज बिहारमध्येही तेच दृश्य पुनः दिसत आहे.

सवाल असा आहे की, भारतीय लोकशाहीत एखादा पक्ष जर केवळ एका विशिष्ट पंथीय समाजावर अवलंबून राहिला, तर त्याचा परिणाम अखेरीस संपूर्ण समाजव्यवस्थेवर होणार नाही का? भारताची निवडणूक ही जात, पंथ, धर्म यांच्या पलीकडे जाऊन राष्ट्रीय हिताचा विचार करून होणे अपेक्षित आहे. मात्र काँग्रेसच्या रणनीतीतून पुन्हा एकदा दिसते आहे की, त्यांना राष्ट्रीय सुरक्षेपेक्षा मतांची बेरीज अधिक महत्त्वाची वाटते. देशाच्या सीमांवरचा धोका आणि अंतर्गत सुरक्षेचे प्रश्न त्यांच्यासाठी गौण ठरतात.

या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने मतदार याद्यांमधून वगळलेल्या नावांबाबत काँग्रेसने निर्माण केलेले रडगाणेही उघडकीस आले आहे. जर खरोखरच हे वगळलेले मतदार कायदेशीर नागरिक असतील, तर आयोगासमोर पुरावे ठेवून नावे परत मिळवता येऊ शकतात. पण काँग्रेस या वगळलेल्या नावांवरून आंदोलन करत असताना त्यांचा सूर असा आहे की जणू सर्वच वगळलेले मुस्लिम आहेत. हा निव्वळ दिशाभूल करणारा प्रचार आहे. आकडेवारी सांगते की ही वजावट सर्व समाजांमध्ये समान प्रमाणात झाली आहे. मात्र काँग्रेसला या प्रश्नावरूनही केवळ मुस्लिम मतदारांना उद्देशून राजकीय सहानुभूती मिळवायची आहे.

राहुल गांधींच्या यात्रेला काँग्रेसने ''मताधिकार यात्रा'' असे नाव दिले आहे. मात्र,हा मताधिकार केवळ भारतीय नागरिकांसाठी आहे की बांगलादेशातून आलेल्या घुसखोरांसाठीसुद्धा असा सवाल भाजपकडून विचारला जात आहे. बिहारमध्ये सीमापार घुसखोरीची समस्या दीर्घकाळापासून गंभीर आहे. पण त्यावर उपाययोजना करण्याऐवजी काँग्रेस अशा मतदारांभोवती राजकारण विणते आहे, जे स्वतः भारताचे नागरिक आहेत की नाहीत, हेच स्पष्ट नाही.

लोकशाहीतील सर्वात मोठी ताकद म्हणजे सर्वसमावेशकता. पण काँग्रेसने केलेला हा राजकीय प्रयोग समाजातील एका घटकाला फक्त मतदार म्हणून पाहतो, नागरिक म्हणून नव्हे. हेच खरे तर धोकादायक आहे. बिहारची निवडणूक म्हणजे फक्त सरकार बदलण्याचा प्रश्न नाही; ती राज्याच्या सुरक्षेची, सामाजिक स्थैर्याची आणि भारताच्या लोकशाही तत्त्वांची परीक्षा आहे. त्यामुळे काँग्रेसला राष्ट्रीय सुरक्षेपेक्षा, लोकशाही मूल्यांपेक्षा आणि विकासाच्या प्रश्नांपेक्षा मुस्लिम व्होटबँकेचे अधिक महत्त्व आहे का, असा सवाल यानिमित्ताने निर्माण झाला आहे.

# मोनोचा जागतिक प्रवास

**जगाच्या पाठीवर**
**गायत्री श्रीगोंदेकर**

नुकत्याच मुंबईत झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईतील लोकलसेवा आणि 'बेस्ट'ची बससेवा विस्कळीत झाली. अशा वेळी मुंबईकरांना अखंडित सेवा देण्यात 'मेट्रो' आणि 'मोनो' रेल्वेसेवेने मोठा हातभार लावला. मात्र, अचानक मोठ्या संख्येने प्रवासी एकाचवेळी मोनोमध्ये चढल्याने प्रवाशांच्या अतिरिक्त भारामुळे मोनो बंद पडली. यामुळे, आधीच घरघर लागलेल्या या मोनोच्या सुरक्षिततेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. मात्र, जगभरात किरकोळ तांत्रिक बिघाड वगळता, मोनो रेल्वेच्या कोणत्याही मोठ्या दुर्घटनेचे उदाहरण नाही.

२०२४ मध्ये जागतिक मोनोरेल बाजारपेठेचा आकार ६.६८ अब्ज अमेरिकन डॉलर्स होता आणि २०३४ पर्यंत तो सुमारे १०.१३ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. २०२५ ते २०३४ पर्यंत ४.२५ टक्क्यांच्या 'सीएजीआर'ने हा आकार वाढेल. सार्वजनिक वाहतुकीची वाढती मागणी, पर्यावरणीय शाश्वतता आणि वाढती गुंतवणूक हे मोनोरेल बाजारपेठेच्या वाढीचे प्रमुख घटक. अशातच आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) प्रगत वैशिष्ट्यांद्वारे रेल्वे आणि वाहतूक प्रणालींमध्ये क्रांती घडवून आणत आहे. 'एआय' आणि 'इंटरनेट ऑफ थिंग्ज' (आयओटी) रेल्वेमध्ये झपाट्याने डिजिटलायझेशन घडवून आणत आहे. पारंपरिक रेल्वे प्रणालींना तोंड द्यावे लागणार्या अनेक आव्हानांवर 'एआय'द्वारे मात करणे शय आहे. मोनोरेल सिस्टममध्ये 'एआय' एकत्रित केल्याने लोकोपायलट अनेक अडथळे शोधून ते रोखू शकतात. २०२४ मध्ये मोनोरेलच्या जागतिक बाजारपेठेत हिंद-प्रशांत महासागरातील क्षेत्राने महसूल वाट्यात ४० टक्क्यांपेक्षा जास्त योगदान दिले.

मोनोरेल सिस्टम मार्केटमध्ये चीनचा मोठा वाटा. वाढती लोकसंख्या आणि जलद शहरीकरणामुळे मोनोरेलसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची मागणी वाढताना दिसते. मोनोरेल सिस्टमच्या विकासासाठी सरकारचा मजबूत पाठिंबा बाजारपेठेच्या वाढीस पोषक ठरतो. स्मार्ट तंत्रज्ञानाच्या एकत्रीकरणासारख्या तांत्रिक प्रगतीमुळे बाजाराच्या वाढीस मदत होते. प्रगत पायाभूत सुविधांच्या विकासात वाढती गुंतवणूक आणि विद्यमान मेट्रो लाईन्सशी एकात्मता यामुळे बाजारपेठेतील गुंतवणुकीत वाढ होते.

मार्च २०१९ मध्ये, भारताने मुंबईत आपला पहिला मोनोरेल प्रकल्प पूर्ण केला. सप्टेंबर २०२३ पर्यंत, अमेरिकेत १६, तर कॅनडात सहा मोनोरेल सिस्टम वापरात आहेत. तसेच युरोपमध्येही मोनोरेल सिस्टम लक्षणीय दराने वाढत आहे.

मोनोरेल एकावेळी फक्त चार ते सहा डबे आणि काही ठिकाणी आठ डबे वाहून नेण्यास सक्षम आहे. जगात अनेक ठिकाणी मोनोरेलचा वापर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत केला जातो. चीन, मलेशिया, जपान, इराण, जर्मनी, नायजेरिया, ऑस्ट्रेलिया अशा विविध देशांत मोनोरेल सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका निभावते.

जगात दोन प्रकारच्या मोनोरेल अस्तित्वात आहेत. त्यांपैकी एक 'स्ट्राडेल मोनोरेल' आणि 'सस्पेंडेड मोनोरेल.' मुंबईत पहिल्या प्रकारची मोनो धावते. या प्रकारच्या मोनोरेलमध्ये गाडी एका बीमवरून धावते. या गाडीला बीमवर पसरलेले 'वॉकिंग व्हिल्स' असतात, त्याबरोबरच 'गायडिंग व्हिल्स' आणि 'स्टॅबलायझिंग व्हिल्स'ही असतात, जे बीमच्या दोन्ही बाजूला धरून ठेवतात. या प्रकारची गाडी छोटी जागा असलेल्या दाट शहरी भागातील वाहतुकीसाठी उपयुक्त ठरते. त्याबरोबरच डोंगरी भाग, किनारी वस्त्या इथेही ही गाडी उपयुक्त आहे.

जलद शहरीकरण, वाढती वाहतुककोंडी आणि वाढती लोकसंख्या हे जगातील मोनोरेल बाजारपेठेच्या वाढीला लक्षणीय चालना देईल, अशी अपेक्षा आहे. जलद शहरीकरण, दैनंदिन प्रवाशांची संख्या वाढणे, रस्त्यावरील वाहतुककोंडी वाढणे आणि लहान जागांची उपलब्धता यामुळे सरकार मोनोरेल प्रणालींना प्राधान्य देत आहेत. उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये मोनोरेल सिस्टमचा वाढता वापर पाहता, मोनोरेल सिस्टम बाजारपेठेचे भविष्य आशादायक आहे. भारत, सौदी अरेबिया, मलेशिया, सिंगापूर, थायलंड इत्यादी विकसनशील देश त्यांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचा भाग म्हणून सक्रियपणे मोनोरेल सिस्टम बसवत आहेत. अशा देशांची सरकारे लोकांची जीवनशैली सुधारण्यासाठी अनेक पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू करतात. ते मोनोरेल सिस्टमच्या विकास आणि वापराला गती देण्यासाठी निधी देऊनदेखील योगदान देतात.



# कर्जरोख्यांत गुंतवणुकीत उदासीनता का?

**एकीकडे शेअर बाजार आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीत महिन्याकाठी वृद्धी होत असताना, भारतीय सर्वसामान्य गुंतवणूकदारांची खासगी कर्जरोख्यांमधील गुंतवणूक तुलनेने कमी आहे. यामागील एक कारण म्हणजे, कर्जरोख्यांविषयीची सर्वसामान्य गुंतवणूकदारांना असलेली शून्य किंवा अत्यल्प माहिती. म्हणूनच आजच्या लेखातून कर्जरोख्यांमधील गुंतवणुकीविषयी केलेले हे मार्गदर्शन...**

**अर्थ वृत्तांत**
**शशांक गुळगुळे**

सरकार काही कंपन्या निधी उभारणीसाठी कर्जरोखे (बॉण्ड्स) विक्रीस काढतात. या कर्जरोख्यांवर बँकांच्या मुदतठेवींच्या तुलनेत परतावाही जास्त दिला जातो. या कर्जरोख्यांच्या शेअरमध्ये परिवर्तन होत नाही, हे अपरिवर्तनीय कर्जरोखे असतात. मुदतीअंती गुंतवणूकदाराला मूळ रक्कम परत केली जाते व ठरलेल्या कालावधीत व्याजही दिले जाते. भारतीय कर्जरोख्यांचा बाजार आता २२६ लाख कोटी रुपये आहे. यांपैकी ६२ हजार, ४३१ कोटी रुपये परकीय गुंतवणूकदारांची गुंतवणूक भारतीय कर्जरोख्यांत आहे. मागील दहा वर्षांत कर्जरोखे बाजारात भारताने आमूलाग्र प्रगती केली आहे. तरीही भारतीय सर्वसामान्य गुंतवणूकदारांची खासगी कर्जरोख्यांमधील गुंतवणूक अत्यंत कमी आहे. सरकारी कर्जरोख्यांबरोबरच खासगी कंपन्यांच्या कर्जरोख्यांमध्ये पुन्हा सर्वसामान्य गुंतवणूकदार मागेच आहे.

भारतीय संस्थात्मक गुंतवणूकदारांना कर्जरोखे आणि त्यामधील गुंतवणूकही तशी काही नवी नाही. परंतु, मागच्या दोन-तीन वर्षांतील घडामोडी पाहता, भारत सरकारने जागतिक स्तरावर कर्जरोख्यांच्या गुंतवणुकीत मोठी झेप घेतलेली दिसते. 'जेपी मॉर्गन ग्लोबल बॉण्ड इंडेक्स'मध्ये सध्या दहा टक्के 'वेटेज' भारतीय कर्जरोख्यांना आहे. त्यानंतर 'ब्लूमबर्ग बॉण्ड इंडेक्स'मध्येसुद्धा येत्या काही वर्षांत ते सामील होण्याची शक्यता आहे. एखादा देश जेव्हा आर्थिकदृष्ट्या संपन्न होण्याच्या मार्गावर असतो, तेव्हा तो देश विविध मोठ्या सरकारी गुंतवणुकीसाठी पायाभूत सुविधा वाढविण्यासाठी सरकारी कर्जरोख्यांचाच आधार घेऊन गुंतवणूक करत असतो आणि पुढे जात असतो. व्याजदर कमी होत असताना खासगी कंपन्यांना कर्ज घेण्यापेक्षा कर्जरोखे विक्रीस काढून पैसा उभा करणे जास्त सोयीचे वाटते. यामुळे कंपन्यांना विस्तार करण्यासाठी लागणारा पैसा सर्वसामान्य गुंतवणूकदारांकडून गोळा केला जातो.

'इकोनॉमिक सर्व्हे, २०२५'च्या आकडेवारीनुसार, परकीय गुंतवणूकदारांनी विविध प्रकारच्या २९ कर्जरोख्यांमध्ये गुंतवणूक केली आहे. परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी तीन लाख कोटी रुपयांची गुंतवणूक सरकारी कर्जरोख्यांमध्ये केली आहे. परदेशी गुंतवणूकदारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरचा विश्वास वाढत चालला आहे. 'इमर्जिंग मार्केट'मधील इतर अर्थव्यवस्थांपेक्षा भारतीय रुपयाचे डॉलरच्या तुलनेत स्थिर असलेले मूल्य, स्थिर परंतु वाढत जाणारा 'जीडीपी', महसूल तूट जास्तीत जास्त कमी करण्याचे भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रयत्न या आणि अशा इतर विविध धोरणांच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेतील त्रुटी कमी करून जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याची धडपड या सर्व गोष्टींमुळे परदेशी गुंतवणूकदारांची सरकारी कर्जरोख्यांमध्ये गुंतवणूक वाढत आहे. भारतीय सर्वसामान्य गुंतवणूकदारांची खासगी कर्जरोख्यांमधील गुंतवणूक फार कमी आहे. सध्या भारतीय सर्वसाधारण गुंतवणूकदार म्युच्युअल फंड योजनांच्या मागे लागले आहेत. सरकारी कर्जरोख्यांबरोबरच खासगी कंपन्यांच्या कर्जरोख्यामध्ये गुंतवणुकीची रक्कम कमीतकमी दहा हजार रुपये करण्यात आली आहे. कर्जरोख्यांच्या मार्केटमध्ये खरेदी आणि विक्री यांचे प्रमाण पाहिजे त्या पद्धतीने वाढलेले नसल्यामुळे गुंतवणूकराराला पाहिजे त्या वेळेस बॉण्डची विक्री करून पैसा मिळत नाही. यामुळे सर्वसामान्य गुंतवणूकदार यात गुंतवणुकीत उदासीन आहेत. आता रिझर्व्ह बँकेने स्वतःचे मोबाईल ॲप आणि पोर्टल असल्यामुळे या गुंतवणूकदारांसाठी चांगली सोय निर्माण केली आहे.

सरकारी रोखे, कॉर्पोरेट रोखे, ट्रेझरी बिल्स, झिरो कुपन रोखे, परिवर्तनीय रोखे, कॉलबेल रोखे, ग्रीन बॉण्ड अशा विविध प्रकारच्या कर्जरोख्यांचा पर्याय उपलब्ध आहे. रोख्यांची दर्शनी किंमत म्हणजे रोख्यांवर दहा हजार रुपये लिहिलेले असेल किंवा तो दहा हजार रुपयांचा रोखा असेल, तर सरकार किंवा कंपनी मुदतीच्या शेवटी गुंतवणूकदाराला दहा हजार रुपये द्यायला बांधील असेल. रोख्यांच्या किमतीवर 'यील्ड' ठरविले जाते. रोखे कधी विकत घेतले, कोणत्या किमतीला विकत घेतले आणि ते किती मुदतीचे आहेत, या सर्व बाबींवर गुंतवणूकदाराला मिळणारा परतावा म्हणजे 'यील्ड.' 'मूडीज', 'एस ॲण्ड पी', 'फिच' यांसारख्या संस्था, रोखे विकणाऱ्या कंपन्या त्यांची आर्थिक स्थिती आणि गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्याची भविष्यातील त्यांची परिस्थिती याचा अंदाज घेऊन गुंतवणूकदारांसाठी असे कर्जरोखे भविष्यात फायदेशीर आहेत की नाही, याचा शहानिशा करून रेटिंग देतात. यालाच 'क्रेडिट रेटिंग' असे म्हणतात. 'एएए' (अतिशय उत्तम) ते 'डी' (डिफॉल्ट) अशी कंपन्यांची वर्गवारी केली जाते. प्रायमरी मार्केटमध्ये रोखे विक्रीस काढल्यानंतर शेअर बाजारात व्याजदराच्या चढ-उतारानुसार आणि कंपन्यांच्या कामकाजाच्या मूल्यानुसार त्यांची किंमत कमी-जास्त होत असते. यालाच रोख्यांची 'मार्केट प्राईस' असे म्हटले जाते. जेव्हा रोख्यांच्या दर्शनी मूल्यापेक्षा जास्त किमतीला विकला जातो, तेव्हा त्यास 'सेल ॲट प्रीमियम' असे म्हटले जाते. जेव्हा रोखे दर्शनी मूल्यापेक्षा कमी किमतीत विकले जातात, तेव्हा त्याला 'बॉण्ड सेल ॲट डिस्काऊंट' असे म्हटले जाते. दहा हजार रुपयांच्या एखाद्या रोख्याचा व्याजदर सहा टक्के असेल, तर त्या रोख्याचा 'करंट यील्ड' सहा टक्के; पण गुंतवणूकदाराने हाच रोखा शेअर बाजारामध्ये ९ हजार, ५०० रुपयांना विकत घेतला, तर 'करंट यील्ड' ६.३१ टक्के होईल. उलट दहा हजार रुपयांचा रोखा शेअर बाजारात १० हजार, ५०० रुपयांना घेतला, तर 'करंट यील्ड' ५.७१ टक्के होईल. तुम्ही रोखे मुदत पूर्ण होईपर्यंत 'होल्ड' केले, तर त्या संपूर्ण काळाकरिता जेवढा परतावा गुंतवणूकदाराला मिळाला असेल, म्हणजेच दरवर्षीचे व्याज, व्याजावरील परतावा आणि खरेदी किंमत व मुदतपूर्ण किंमत यांमधील फरक या सर्वांची एकूण गोळाबेरीज म्हणजे 'यील्ड टू मॅच्युरिटी!' व्याजदराचा, महागाईदराचा आणि इतर आर्थिक घडामोडींचा रोख्यांवर परिणाम होतो. कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था किंवा जागतिक अर्थव्यवस्थेत मोठे बदल घडणार असतील, अर्थव्यवस्था डबघाईला येणार असेल किंवा अन्य कोणत्याही भू-राजकीय परिस्थितीमुळे आर्थिक व्यवस्थेत मोठे बदल घडणार असतील, तर त्याची सर्वांत पहिली प्रतिक्रिया 'बॉण्ड' म्हणजेच कर्जरोखे बाजारात बघायला मिळते. रिझर्व्ह बँकेच्या कर्जरोख्यांत गुंतवणूक करणे म्हणजे १०० टक्के सुरक्षितता आणि १०० टक्के परतावा! परत मिळणारच याची गॅरेंटी!




तरुण गुंतवणूकदारांची (ज्यांच्याकडे गुंतवणुकीसाठी निधी उपलब्ध आहे.) मात्र अजूनही शेअर बाजार व म्युच्युअल फंड योजनांत गुंतवणूक करण्याची 'क्रेझ' कायम असून त्यांना अजूनही कर्जरोखे हवे तितके आकर्षित करीत नाहीत; तरुण गुंतवणूकदारांना अशा खासगी (कंपन्यांच्या) आणि सरकारी कर्जरोखे मार्केटमध्ये आकर्षित करण्यासाठी त्यांची मनोवृत्ती बदलण्यासाठी विविध स्तरांवर गुंतवणूकदार जागृती उपक्रम राबवावयास हवे. याशिवाय शैक्षणिक आणि माहितीपर विविध उपक्रम वाढविण्याची गरज आहे. कारण, गुंतवणूकदारांची सर्व प्रकारच्या गुंतवणूक पर्यायांत गुंतवणूक हवी. सध्या बँकांनाही ठेवी मिळविण्यासाठी फार प्रयत्न करावे लागत आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



## महामानव डॉ. आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने महिलांना फळांचे किट वाटप

**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट-**

महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने माजी मंत्री राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मदर तेरेसा आरोग्य केंद्र या ठिकाणी ६८ महिलांना फळांचे किट वाटप करण्यात आले. यावेळी आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, युवा नेते सुशील सरवदे, माजी नगरसेवक बाबा मिस्त्री, शिवम सोनकांबळे, डॉ. ज्योत्स्ना कोरे , डॉ.चिंचोलकर , किरण डोळसे, राहुल वाळके ,रेशमा तडफदार , संगीता गुरव , संघर्ष समिती अध्यक्ष दिलावर मणियार आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले,प्रमुख मार्गदर्शक इकबाल तडकाल, खजिनदार अरुण मेहेत्रे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ट्रेड युनियनचे पदाधिकारी सुनील शिंदे, नरेश कदम, चंद्रकांत मेहेत्रे, संगीता लेकुरवाळे, सुनिता ढगे, राणी बनसोडे, विकास पवार, बागवान यांच्यासह ट्रेड युनियनचे पदाधिकारी व सदस्य यांनी परिश्रम घेतले.



## सदगुरु प्रभाकर महाराज सार्वजनिक वाचनालय स्वातंत्र्य दिन उत्साहात

**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट-**

शेळगी येथील श्री सदगुरु प्रभाकर महाराज सार्वजनिक वाचनालय येथे भारताचा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. परिवहन महामंडळ माजी सभापती महादेव पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. यावेळी जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष बाबुराव नरुणे, उपाध्यक्ष अशोक खानापुरे, सचिव मनमथ कोनापुरे, सहसचिव शिवलिंग आप्पा शहाबादे, भीमराव गंगधरे, सुरेश तानवडे, राजशेखर पाटील, शेळगी जिल्हा परिषद शाळा मुख्याध्यापीका सुनंदा अंकुश काळे, आशा सोमळे, संतोष जाधव सर, ईश्वरी गौरी, आरती स्वामी, रूपेश हिप्पर्गे शालेय विद्यार्थी, महिला वाचक गंगाबाई निन्ने, शशिकला वांगीकर, धानय्या स्वामी, गौरी वांगीकर, रूपाली सट्टे व बाल वाचक उपस्थित होते. जिल्हा परिषद शाळा शिक्षिका मंजूषा रोकडे यांनी घरातील जेष्ठ व्यक्तींना सनमाननीय वागणूक देण्या संबंधी सर्व बालवाचक यांच्याकडून शपथ घेतली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन संगीता आराध्ये यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल नंदा कुर्ले, समर्थ कुर्ले यांनी प्रयत्न केले. कार्यवाह जयंत आराध्ये यांनी आभार मानले.

## मराठा समाज सेवा मंडळाची ३० ऑगस्टला वार्षिक सभा

**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट-**

येथील मराठा समाज सेवा मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा येत्या शनिवारी,३० ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता रेल्वे लाईन्स येथील हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागे असलेल्या मराठा मंदिरात आयोजित करण्यात आली आहे. या सभेच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे हे असणार आहेत. सभासदांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मराठा समाज सेवा मंडळाने केले आहे. या सभेत सन २०१९ ते २०२५ पर्यंतचा ऑडिट रिपोर्ट मान्यता, २०१९ ते २४ पर्यंतच्या कन्सॉलीटेड ऑडिट रिपोर्ट मान्यता, २०२५-२६च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे, संस्थेच्या कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयाची माहिती, विद्यमान कार्यकारी मंडळाने आजपर्यंत केलेल्या कामकाजाबाबतचा विभाग प्रमुखांकडून आलेला अहवाल सादर करणे, गेल्या पाच वर्षात कार्यकारी मंडळाने विविध शाखांमध्ये राबविलेली नोकर भरती प्रक्रिया आदी विषयावर चर्चा होणार आहे.

# ६ पाण्याच्या टाक्यांच्या परिसरात केली साफसफाई

- महापालिकेच्या ७० कर्मचाऱ्यांनी केला ६ टन कचरा संकलित
- महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ता. २३ ऑगस्ट-**

महापालिकेच्या स्वच्छता मोहीम ६.० अंतर्गत शहर व हद्दवाढ भागातील विविध ठिकाणच्या पाण्यांच्या टाक्यांचा परिसर स्वच्छ करण्याची मोहीम हाती घेतली आहे. मोहिमेच्या चौथ्या दिवशी आज विविध ६ ठिकाणच्या पाण्याच्या टाक्यांचा परिसरात साफसफाई करण्यात आली, अशी माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिली.

सोलापूर शहर व हद्दवाढ भागात नागरिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी एकूण ३५ ठिकाणी उंचावरील व जमिनीवरील टाक्याच्या असलेल्या पिण्याच्या पाण्याचे टाक्याच्या आजूबाजूला असलेले झाडी झुडपे, गवत, मती- अजोरा, कचरा पावसामुळे जागेवर कुजून त्यामुळे दुर्गंधी पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असल्याने आयुक्त सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवि पवार व सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२० ऑगस्ट २०२५ रोजी सोलापूर महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील १ ते ८ विभागीय कार्यालयांतर्गत असलेल्या स्मशानभूमीच्या कार्यक्षेत्रामध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. या स्वच्छता मोहिमेच्या आज चौथ्या दिवशी शनिवारी या मोहिमेमध्ये एकूण ६ पाणी टाकी परिसर स्वच्छता करण्यात आली.

दैनंदिन कचरा संकलना व्यतिरिक्त आज घेण्यात आलेल्या मोहिमेमध्ये एकूण ६ टन इतका कचरा संकलित करण्यात आला. ही मोहिम घनकचरा व्यवस्थापन विभाग तसेच मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधीक्षक अनिल चराटे , विभागीय कार्यालयाकडील विभागीय अधिकारी, मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक व अवेक्षक यांच्या नियंत्रणाखाली सर्व झाडूवाला/झाडूवाली, बिगारी, सफाई कामगार, मजूर यांचे समन्वयाने राबविण्यात आली.या मोहिमेमध्ये एकूण ७० सेवक, १ जेसेबी व १ डम्पर यांचा समावेश करण्यात आलेला आहे.



### या ठिकाणी राबवली स्वच्छता मोहीम

या मोहिमेअंतर्गत आज पोलीस आयुक्तालय समोरील पाण्याची टाकी,जुळे सोलापूर येथील एम बी आर पाणी टाकी, बाळे टोलनाका व केगाव स्मशानभूमी , जिल्हा परिषद समोर येथील पाण्याची टाकी जवळील परिसर आदी ठिकाणी स्वच्छता करण्यात आली.

# पोलीस असल्याचे सांगून ७५ हजार रुपयांचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ता. २३ ऑगस्ट-**

पोलीस असल्याची बतावणी करून दोघा भामट्यांनी वृद्धाकडील ७५ हजार रुपयांचे दागिने काढून घेऊन लंपास केले ही घटना २२ ऑगस्ट रोजी सकाळी कुमठा नाका परिसरातील बालाजी हाऊसिंग सोसायटीमध्ये घडली.

याबाबत अशोक भुजबळ सुमंत वय ७८ राहणार बालाजी हाऊसिंग सोसायटी कुमठा नाका सोलापूर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एम आयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

अशोक सुमंत हे २२ ऑगस्ट रोजी सकाळी आठच्या सुमारास वाकिंग करिता बाहेर गेले होते बालाजी हाउसिंग सोसायटीमध्ये राहणारे वाडी वाले यांच्या घरासमोर सुमंत यांना दोन अनोळखी व्यक्तींनी थांबविले त्या दोघांपैकी एकाने सुमंत यांना पोलीस असल्याचे सांगून त्याच्या जवळील ओळखपत्र दाखविले तर दुसऱ्याने आम्हाला वरून आदेश आले असून आम्ही कोणालाही चेक करू शकतो असे सांगून त्यांच्या खिशातील सर्व साहित्य व हातातील अंगठी काढण्यास सांगितले दोघांपैकी एकाने रुमाल हातात घेऊन दुसऱ्या व्यक्तीने सुमंत यांच्या हातातील सोन्याची अंगठी व गळ्यातील सोन्याची चैन काढून रुमाला मध्ये ठेवून गाठ मारून तू रुमाल सुमंत यांच्याकडे दिला व घरी जाण्यास सांगितले सुमंत यांनी घरी येऊन रुमाल उघडला असता त्यामध्ये सोन्याचे दागिने नसल्याचे दिसून आले त्यामुळे त्या दोघा भामट्यांनी सुमंत यांचे ७५ हजार रुपये किमतीचे दागिने लंपास केल्याचे दिसून आल्याने याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलीस हवालदार उबाळे पुढील तपास करीत आहेत




# वेलांकन्नी महोत्सवासाठी सोलापूर स्थानकांवरून ८ विशेष गाड्या धावणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ता. २३ ऑगस्ट-**

भारतीय रेल्वेने वेलांकन्नी महोत्सव २०२५ मध्ये येणाऱ्या भाविकांसाठी सोलापूर विभागातील ३ स्थानकांवरून मुंबई ते वेलंकन्नी दरम्यान ८ विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती सोलापूर रेल्वे प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

एलटीटी मुंबई-वेलांकन्नी विशेष गाड्या ४ फेऱ्या असतील. यामध्ये ट्रेन क्रमांक ०११६१ विशेष ट्रेन २६ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १ वाजता एलटीटी मुंबईहून निघेल आणि तिसऱ्या दिवशी दुपारी ३ वाजता वेलांकन्नी येथे पोहोचेल. ट्रेन ०११६२ विशेष ट्रेन २८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ६ वाजता वेलांकन्नी येथून निघेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी ४.२० वाजता एलटीटी मुंबई येथे पोहोचेल. ट्रेन ०११६३ ही विशेष गाडी ७ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता एलटीटी मुंबईहून निघेल आणि तिसऱ्या दिवशी ३ वाजता वेलांकन्नी येथे पोहोचेल. ट्रेन ०११६४ ही विशेष गाडी ९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ६ वाजता वेलांकन्नी येथून निघेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी ४.२० वाजता एलटीटी मुंबईला पोहोचेल.

एलटीटी मुंबई - वेलांकन्नी विशेष गाड्यांची रचना ही २ एसी- टियर, ६ एसी- टियर, १२ स्लीपर क्लास, २ जनरल सेकंड क्लास आणि २ सेकंड सीटिंग कम गार्ड ब्रेक व्हॅन अशी असेल तर ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड, सोलापूर, कलबुरगि, वाडी, यादगिर, कृष्णा, रायचूर, मंत्रालयम रोड, अडोनी, गुंतकल, गुत्ती, तडिपतत्रि, यर्रगुंटला, कड़पा, राजमपेटा, रेणिगुंटा, काटपाडी, तिरुवण्णामलै, विल्लुपुरम, मयिलाड़तूरै आणि नागप्पट्टिनम या ठिकाणी थांबले असतील.



वांद्रे टर्मिनस मुंबई - वेलांकन्नी स्पेशल ४ फेऱ्या असतील, यामध्ये ट्रेन ०९०९३ स्पेशल वांद्रे टर्मिनस मुंबई येथून २६ ऑगस्ट २०२५ आणि ६ सप्टेंबर २०२५ रोजी २०.४० वाजता सुटेल आणि तिसऱ्या दिवशी ०७.४० वाजता वेलांकन्नी येथे पोहोचेल. ट्रेन ०९०९४ स्पेशल वेलांकन्नी येथून ३० ऑगस्ट २०२५ आणि ०९ सप्टेंबर २०२५ रोजी ००.३० वाजता सुटेल आणि वांद्रे टर्मिनस मुंबईला दुसऱ्या दिवशी १०.३० वाजता पोहोचेल.

वांद्रे टर्मिनस मुंबई - वेलांकन्नी स्पेशल या गाड्यांची रचनाही २ एसी- टियर, ६ एसी- टियर, १२ स्लीपर क्लास, २ जनरल सेकंड क्लास आणि २ सेकंड सीटिंग कम गार्ड ब्रेक व्हॅन अशी असेल तर बोरिवली, वसई रोड, पनवेल, लोणावळा, पुणे, दौंड, सोलापूर, कलबुरगि, वाडी, यादगिर, कृष्णा, रायचूर, मंत्रालयम रोड, अडोनी, गुंतकल, गुत्ती, तडिपतत्रि, यर्रगुंटला, कड़पा, राजमपेटा, रेणिगुंटा, काटपाडी, वेलूर छावनी, तिरुवण्णामलै, विल्लुपुरम, मयिलाड़तूरै आणि नागप्पट्टिनम येथे थांबले असतील.


## मुळ रजि. खरेदीखत व पावती हरवले बाबतची जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः सोलापूर शहर तथा बार्शी शहर ता. बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, श्रीमती वर्षा विजय शिंदे, यांच्याकडून बार्शी येथील गट नं. १७६/३ पैकी प्लॉट याचे क्षेत्र ७५.०० चौमी. याबाबतचे रजि. खरेदीदस्त नं. ४३५६/२००१/ बरस, हे मूळ दस्त व त्याची पावती दत्त नगर परिसर बार्शी येथून बँकेच्या कामासाठी जात असताना दि. ०१/०८/२०२५ रोजी दुपारी ०१-०० वा. च्या सुमारास हरवलेले आहे. त्याबाबत त्यांनी बार्शी शहर पोलीस स्टेशन, येथे दि. २२/०८/२०२५ रोजी तक्रार केली आहे. त्याचा गहाळ रजि. क्र. ०५१२/२०२५ असा आहे.

श्रीमती वर्षा विजय शिंदे व श्री. आनंद विजय शिंदे यांना सदर जागा कर्ज प्रकरण करून बँकेकडे तारण ठेवण्याकरिता मूळ रजि. खरेदीदस्त नं.४३५६/२००१/बरस व त्याची पावती आवश्यक आहे. परंतु सदर खरेदीखत मूळ दस्त व त्याची पावती हरवल्याने यदाकदाचित कोणास मिळाल्यास खालील दिलेल्या पत्यावरती संपर्क साधून आणून द्यावेत, अथवा आमचे अशील हे मूळ रजि. खरेदीखत दस्त आणि पावती ऐवजी दुय्यमप्रत आधारे कर्ज प्रकरण करतील, यदाकदाचित याबाबत कोणाची काही हरकत अथवा त्या प्लॉट बाबत हक्क, हितसंबंध लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा. अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीहि हरकत नाही असे गृहीत धरून सदर मिळकत बँकेकडे तारण ठेवतील, नंतर कोणाची कसलीही हरकत आल्यास आमचे अशीलाच्या व बँकेच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत/फसवणूक होऊ नये या करिता हि जाहीर नोटीस दिली. दि.२३/०८/२०२५.

आमचे अशील
श्रीमती वर्षा विजय शिंदे व
श्री. आनंद विजय शिंदे

सही/-
ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर,
ऑफिस पत्ता :- ३९४५/१. भवानी पेठ,
सोलापूर रोड बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर.
(अशिला तर्फे ॲडव्होकेट)

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सासुरे, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे सासुरे हद्दीतील गट नं. ८८ या जमीनपैकी क्षेत्र ० हे. ६४ आर, आकार ० रु.८९ पैसे, पोटखराब ०.०३ आर, एकूण क्षेत्र ० हे. ६७ आर यासी चतुःसिमा : पुर्वेस गुरुनाथ गवळी यांची जमीन, दक्षिणेस -आण्णा पौळ यांची जमीन, पश्चिमेस रस्ता व नवले यांची जमीन, उत्तरेस शिलवंत यांची जमीन. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक शेतजमिन आतील सर्व झाडझुडूपे वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह.

उपरोक्त वर्णन केलेली शेतजमीन ही काशीनाथ अंबादास गवळी यांचे स्वतंत्रमालकी व कब्जेवहिवाटीची होती व आहे व आजरोजी प्रत्यक्ष मालकी हक्कात व कब्जेवहिवाटीत आहे. विद्यमान मालकांनी सदरची शेतजमीन त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेली आहे. सदर शेतजमीन मिळकत खरेदी घेण्याबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्या दरम्यान सदर शेतजमीनी मिळकतीबाबत खरेदी घेणेबाबत बोलणे झालेले असून खरेदी देणाऱ्यांनी आमचे अशिलाकडून इसार म्हणून काही रक्कमेचा मोबदला स्वीकार केलेला आहे. सदर शेतजमीन मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा शेतजमीन मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमुद शेतजमीनीवर कोणाचा हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास सदर शेतजमीन संदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर शेतजमीनवर कोणाचा बोजा हक्क, हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर शेतजमीन निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली असे. ता.२२/०८/२०२७

सही/-
श्री. लक्ष्मीकांत सिध्देश्वर झाडे
ॲडव्होकेट
२२०९/३८, सिध्देश्वर निवास, गणेश नगर,
माढा रोड, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
अशिलातर्फे ॲडव्होकेट

पुढील नेमली ता.२४/०९/२०२५
दि.कि.अ.नं. ९५/२०२५
नि.५

## जाहीर प्रसिध्दीकरण

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठस्तर यांचे न्यायालयात**
(R.P. Bagade 4th CJM)

१) **श्री. गणेश सुरेश पोफळे,** वय ४२ वर्ष धंदा-नोकरी, रा. बार्शीरोड, पांगरी, ता. बार्शी जि. सोलापूर (स्वतः करीता व अज्ञान अर्जदार नं.२ चे अ.पा.क.म्हणून)
२) **आराध्या गणेश पोफळे,** वय ०७ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर-अज्ञान
— **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणी नाही** --- **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं.२ ही अर्जदार नं.१ याची मुलगी असून अर्जदार नं.१ यास अश्विनी गणेश पोफळे नावाची पत्नी होती सदर अश्विनी गणेश पोफळे या मौजे पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे दि.२८/०३/२०२५ रोजी मयत झालेल्या आहेत. अर्जदार नं. १ हे पती या नात्याने व अर्जदार नं.२ ही मुलगी या नात्याने मयत अश्विनी गणेश पोफळे यांचे कायदेशीर वारस असून अर्जदाराशिवाय मयतास कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारास शासकीय, निमशासकीय व कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता वारस/हेअरशिप प्रमाणपत्राची गरज भासलेली आहे सदर वारस/हेअरशिप अर्जदाराकडे नसलेने अर्जदारांना अनेक कायदेशीर अडचणीस सामोरे जावे लागत आहे. सबब अर्जदार हे मयत अश्विनी गणेश पोफळे यांचे कायदेशीर वारस असलेचे वारस/हेअरशिप प्रमाणपत्र मिळावे असे कथन करुन अर्जदारानी ते मयत अश्विनी गणेश पोफळे यांचे कायदेशीर वारस असलेबाबतचे हेअरशिप/वारस प्रमाणपत्र या मे. न्यायालयाकडे मागणी केली आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत वा पुढील नेमले तारीख २४/०९/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले म्हणणे, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग तो हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे. ता.२२/८/२०२५

सही/-
लिपीक
दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी

## बालाजी अमाइन्स लिमिटेड

Balaji AMINES LIMITED ...A Specialty Chemical Company
CIN No : L24132MH1988PLC049387
बालाजी टॉवर्स, क्र. 9/1ए/1, होटगी रोड, आसरा चौक, सोलापूर, महाराष्ट्र - 413224
**दूरध्वनी :** 0091-217-2310824/2451500, **फॅक्स :** 0091-217-2451521,
**ई-मेल :** cs@balajiamines.com **संकेतस्थळ :** www.balajiamines.com

**भागधारकांना सूचना**

सेबीने दस्तावेजांमधील कमतरतेमुळे नाकारलेले/ परत आलेले / न स्वीकारलेले आणि ०१ एप्रिल, २०१९ च्या वेळ मर्यादिपूर्वी दाखल केलेल्या प्रत्यक्ष शेअर्सची हस्तांतर विनंती पुन्हा दाखल करणाऱ्या सुविधेसाठी विशेष खिडकी उघडण्याला परवानगी दिली आहे. (सेबी सर्क्युलर क्र. सेबी/एचओ/एमआइआरएसडी/एमआइआरएसडी-पीओडी/पी/सीआइआर/२०२५/९७ दिनांक ०२ जुलै २०२५)

| **महत्वाचे तपशील** | |
|---|---|
| पुन्हा दाखल करण्यासाठी खिडकी | ७ जुलै, २०२५ ते ६ जानेवारी, २०२६ |
| कोण हस्तांतर विनंती पुन्हा दाखल करू शकतात? | ज्या गुंतवणूकदारांनी हस्तांतर विलेख एप्रिल, २०१९ पूर्वी दाखल केले आणि दस्तावेजातील कमतरतेमुळे/परत आलेले आहेत. |
| हस्तांतर विनंती पुन्हा दाखल कशी करावी ? | रजिस्ट्रार आणि शेयर ट्रान्सफर एजंट व्हेंचर कॅपिटल आणि कॉर्पोरेट इन्व्हेस्टमेंट्स प्रा. लिमिटेड कडे गहाळ किंवा सुधारित तपशीलासह मूळ हस्तांतर दस्तावेज सादर करावेत. |

| | |
|---|---|
| टपाल पत्ता | औरम, दरवाजा क्र. ४-५०/P-II/५७/४एफ & ५, प्लॉट क्र. ५७, चौथा आणि पाचवा मजला, जयाभेरी एन्क्लेव्ह, फेज-२, गच्चीबोवली, हैदराबाद-५०००१८, तेलंगणा. दूरध्वनी क्र. ०४०-२३८१८४७५ |
| हेल्पलाईन | ०४०-२३८१८४७५,२३८६८२५७ |
| कोणत्याही चौकशी करिता | ई-मेल : investor.relations@vccipl.com cs@balajiamines.com |

शेअर्स जे फक्त डिमेट माध्यमाने जारी केलेल्याच्या हस्तांतरणासाठी पुन्हा दाखल करायचे आहेत.

ठिकाण : सोलापूर,
दिनांक : २३ ऑगस्ट, २०२५

बालाजी अमाईन्स लिमिटेड साठी
सही/-
अभिजीत कोठाडिया
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी



## बालाजी अमाइन्स लिमिटेड

Balaji AMINES LIMITED ...A Specialty Chemical Company
CIN No : L24132MH1988PLC049387
बालाजी टॉवर्स, क्र. 9/1ए/1, होटगी रोड, आसरा चौक, सोलापूर, महाराष्ट्र - 413224
**दूरध्वनी :** 0091-217-2310824/2451500, **फॅक्स :** 0091-217-2451521,
**ई-मेल :** cs@balajiamines.com **संकेतस्थळ :** www.balajiamines.com



**भागधारकांना सूचना**

गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (आयईपीएफए), निगम व्यवहार मंत्रालयाने २८ जुलै, २०२५ पासून ६ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत ''सक्षम निवेशक'' नामीत १०० दिवसांची मोहीम सुरु केली आहे.

कंपनी तिचे विविध दळणवळण माध्यमांमार्फत खालील प्रक्रिया अवलंबून त्यांच्या केवायसी तपशील (म्हणजेच पॅन, बँक खाते तपशील, संपर्क तपशील, नामनिदर्शनासाठी पसंती, नमुना स्वाक्षरी) अद्यावत करून त्यांच्या दावारहित लाभांशावर दावा करण्यासाठी भागधारकांना प्रोत्साहन देत आहे.

| धारणाचा प्रकार | व्हेंचर कॅपिटल आणि कॉर्पोरेट इन्व्हेस्टमेंट्स प्रा. लिमिटेड (आरटीए) कडे सादर करावायाचे दस्तावेज खालील प्रमाणे : |
|---|---|
| डिमॅट स्वरूपात असलेले समभाग (शेअर्स) | १. तुमच्या डिपॉझिटरी पार्टीसिपंट सह केवायसी तपशील, विशेषकरून बँक खाते क्रमांक, बँकेचे नाव आणि शाखा, आफएससी कोड, नामांकनाची पसंती अद्यावत करावे. २. आरटीए कडे क्लायंट मास्टर लिस्ट (सीएमएल) च्या स्वसाक्षांकीत प्रत सादर करावे. |
| प्रत्यक्ष स्वरूपात असलेले समभाग (शेअर्स) | १. पुष्ठ्यर्थ दस्तावेजसह त्यामधील नमूद सुचणेनुसार रितसर भरलेल्या गुंतवणूकदार सेवा विनंती प्रपत्र * आययसआर १. प्रपत्र आययसआर २, आणि प्रपत्र आययस आर -३, किंवा प्रपत्र क्र. एस एच-१३ (नामनिर्देशन प्रपत्र) २. खाते धारक म्हणून तुमच्या नाम नाव नमूद असलेल्या मूळ रद्द केलेल्या धनादेश. ३. इत्तर पुष्ठ्यर्थ दस्तावेज जर असल्यास. |

| कोणत्याही माहितीसाठी संपर्क साधावा |
|---|
| व्हेंचर कॅपिटल आणि कॉर्पोरेट इन्व्हेस्टमेंट्स प्रा. लिमिटेड<br>औरम, दरवाजा क्र. ४-५०/P-II/५७/४एफ & ५, प्लॉट क्र. ५७, चौथा आणि पाचवा मजला, जयाभेरी एन्क्लेव्ह, फेज-२, गच्चीबोवली, हैदराबाद-५०००१८, तेलंगणा.<br>दूरध्वनी क्र. ०४०-२३८१८४७५<br>ई-मेल : investor.relations@vccipl.com |

ठिकाण : सोलापूर,
दिनांक : २३ ऑगस्ट, २०२५

बालाजी अमाईन्स लिमिटेड साठी
सही/-
अभिजीत कोठाडिया
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर -४१३००१
**नगर अभियंता कार्यालय, रस्ते विभाग, सो.म.पा.**
जा.क्र.नगर अभियंता/रस्ते विभाग/२०२५-२६/१११७ दि.२२/०८/२०२५

**ई -निविदा सूचना क्र. /२०२५-२६**

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर नगर अभियंता कार्यालय रस्ते विभागाकडून महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय स्वच्छ वायू कार्यक्रम 25-26 अंतर्गत खालील कामाचे ई-निविदा बाबत.

**1) टेंडर आय डी - 2025_SMC_1212898_1**

वरील कामाचे निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.25/08/2025 ते दि. 02/09/2025 पर्यंत भरणेत उपलब्ध आहे.

सही/-
प्र. नगर अभियंता
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

Classifieds

**पाहिजेत**

शेती कामगार बिऱ्हाड पाहिजे. अकलूज येथे नर्सरीत काम करणारे जोडपे पाहिजेत. ९८९०१४३४३२ (गिरमे)

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/




## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - २४

## भारतातील मॅरेथॉन आयोजक आव्हाने

भारतात मॅरेथॉन आयोजित करणे ही एक मोठी जबाबदारी असून अनेक गुंतागुंतीची आव्हाने यात समाविष्ट आहेत. एक रनर आयोजकाद्वारे आयोजन केल्यासच ते खऱ्या अर्थाने यशस्वी होते. खालील प्रमुख मुद्द्यांवरून ही आव्हाने समजून घेता येतात:

- दीर्घकालीन नियोजन व दूरदृष्टी यशस्वी मॅरेथॉनसाठी अनेक महिने अगोदर नियोजन आवश्यक असते. दिनांक निश्चित करताना सण, सुट्ट्या, पारंपरिक मिरवणुका, दिंड्या, मोर्चे, मतदान आणि जत्रा यांचा विचार करावा लागतो; अन्यथा इव्हेंटवर परिणाम होऊ शकतो.
- कंपन्यांचा विश्वास जिंकणे प्रायोजक मिळवणे कठीण असते कारण भारतातील मॅरेथॉनचा प्रभाव अजूनही तुलनेने हळूहळू वाढत आहे. ब्रँड्सना गुंतवणूक करण्यासाठी प्रभावी मार्केटिंग आणि दीर्घकालीन विश्वासार्हता दाखवावी लागते.
- ट्रॅफिक व्यवस्थापन सर्वात मोठी समस्या म्हणजे लोकसंख्या, वाहतूक, पोलीस बंदोबस्त, मार्गावरील रस्ता बंद करणे किंवा वळविणे; यामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनात अडथळा येऊ नये हे पाहणे आवश्यक आहे.
- हवामान आणि पर्यावरणीय अडचणी बदलते हवामान, पावसाळा, उष्णता किंवा प्रदूषण या गोष्टींमुळे धावपटूंची सुरक्षितता आणि कामगिरी प्रभावित होते.
- जाहिरात आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर प्रचार करावा लागतो, जेणेकरून स्थानिक लोक, धावपटू आणि संरक्षण दलातील कर्मचारी सहभागी होतील.
- बक्षीस रक्कम आणि स्थानिक सहभाग बक्षीस रक्कम आकर्षक ठेवावी लागते तसेच स्थानिक गर्दीचे व्यवस्थापन सुयोग्य असावे लागते.
- फसवेगिरी आणि चोरीचे प्रकार काही वेळा बाहेरगावच्या धावपटूंना फसवले जाते. यावर कठोर देखरेख आणि पारदर्शकता आवश्यक आहे.
- सोयीसुविधा पार्किंग, राहण्याची सोय, पोस्ट-रन फूड, मोबाईल टॉयलेट्स, रस्त्यांची साफसफाई, दुरुस्ती, प्रकाश व्यवस्था, ॲम्ब्युलन्स, फिजिओ टीम, फायर ब्रिगेड, डॉक्टर व उपकरणांची उपलब्धता हे घटक व्यवस्थित असणे महत्त्वाचे आहे.
- स्वयंसेवकांची मोठी टीम स्वयंसेवकांशिवाय इव्हेंट यशस्वी होऊ शकत नाही. मोठ्या ताफ्याची गरज असते, विशेषतः अल्ट्रा मॅरेथॉनसाठी रात्रीची सुरक्षा व व्यवस्थापन महत्त्वाचे ठरते.
- तांत्रिक आणि प्रशासकीय अनुमती टाइमिंग सिस्टीम, पोलिस परवानगी, महानगरपालिका सहकार्य तसेच तांत्रिक अडचणी आल्यास त्यावर तत्काळ उपाययोजना करण्याची क्षमता असणे गरजेचे आहे.
- आंतरराष्ट्रीय दर्जाचा अभाव भारताबाहेर मॅरेथॉन केल्यास आंतरराष्ट्रीय दर्जा मिळविता येतो, असे समजून काहीजण परदेशात जातात; परंतु परदेशी धावपटू भारतात खूप कमी येतात. याचे आणखी एक कारण म्हणजे भारतीय बिकट हवामान. त्यामुळे भारतातील मॅरेथॉनला मोठा दर्जा प्राप्त होत नाही.

या सर्व आव्हानांवर मात करण्यासाठी सुयोग्य नियोजन, स्थानिक प्रशासनाशी समन्वय, प्रायोजकांचा विश्वास आणि पारदर्शक व्यवस्थापन हेच यशाचे गमक आहे. **(क्रमशः)**

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो.९१७५८२८२०३

# जागतिक तिरंदाजी स्पर्धेत टेंभूर्णीच्या गाथा खडके हिस कांस्य पदक

### पुण्याची शर्वरी शेंडेही कांस्य पदकाची मानकरी

**पुणे, दि.२३ ऑगस्ट-**

कॅनडा येथे सुरु असलेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या गाथा खडके, शर्वरी शेंडेने जियाना कुमारच्या साथीने ऐतिहासिक कांस्यपदकाचा कामगिरी केली आहे. अमेरिकेच्या संघाचा ६-० ने दणदणीत विजय नोंदवून १८ वर्षांखालील रिकर्व्ह प्रकारात भारतीय मुलींनी कांस्यपदकाचा पराक्रम केला आहे.



**कॅनडा : पदक विजेते गाथा खडके, जियाना कुमार, शर्वरी शेंडे व प्रशिक्षक रणजीत चामले.**

पात्रता फेरीत भारत चौथ्या स्थानावर होता. उपउपांत्यपूर्व फेरीत मेक्सिको संघावर ६-० ने सेटने पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली. उपांत्यपूर्व लढतीत बलाढ्य जपान संघाचा ५-३ सेटने पराभव भारताने उपांत्य फेरीत मुसंडी मारली होती. उपांत्य फेरीत कोरिया संघाने भारताला कडवी झुंज दिली. ६-२ सेटपर्यंत लढत रंगली. अखेर १ गुण फरकाने कोरियाने निसटता विजय संपादन केला. कांस्य पदकाच्या लढतीत अमेरिकेला भारताने एकाही विजयाची संधी दिली नाही. ५५-५३, ५९-५६,५५-५२ गुणांसह ६-० सेटने भारताने ऐतिहासिक कांस्य पदकाचर मोहर उमटवली.

कांस्य पदक विजेता संघात टेंभूर्णीच्या गाथा खडके, पुण्याच्या शर्वरी शेंडेसह चंदिगडच्या जियाना कुमार हीचा समावेश होता.

### सरांच्या प्रोत्साहनामुळे यश

भारतीय संघांचे प्रशिक्षक प्रा रणजित चामले हे या संघांचे प्रशिक्षक होते. रणजीत सरांच्या प्रोत्साहनामुळे हे यश हाती आले
**-गाथा खडके, कांस्य विजेती**

### खेळाडूंसाठी धावले महाराष्ट्राचे मंत्री

कॅनडाला रवाना होण्यासाठी भारतीय संघांचे विमाना १५ ऑगस्ट रोजी होते. परंतु एअर कॅनडाचा संप झाल्यामुळे भारताच्या संघ ४ दिवस विमानतळावरच अडकून पडला होता. भारतीय तिरंदाजी संघटना आणि साईने यांनी विशेष प्रयत्न केले. अखेर महाराष्ट्राचे केंद्रिय राज्यमंत्री रक्षाताई खडके आणि मुरलीधर मोहोळ खेळाडूंच्या मदतीला धावले. या मराठमोळ्या मंत्र्यांच्या प्रयासाने प्रयत्न खेळाडूंना वेळेवर कॅनडाला रवाना झाले. संघाचे मार्गदर्शक रणजीत चामले हे स्पर्धेच्या दिवशी पहाटे साडेचार वाजता कॅनडात पोचलले. नाट्यमय घडामोडीनंतर भारतीय संघाने ही कामगिरी केली केल्याने क्रीडा मंत्रालय व साईकडून खेळाडूंचे कौतुक होत आहे.



## एसआरपी कॅप जि.प. शाळेची पवित्रा नागलगाव वेगवान धावपटू

**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट -**

एस.आर.पी.एफ ग्रुप नंबर १० गटांतर्गत स्पर्धेतील १४ वर्षे वयोगटातील मुलींमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा एस.आर. पी.कॅम्प (गट शाळा) मधील खेळाडू पवित्रा इरेश नागलगाव हिने ६० मीटर धावण्याची शर्यत जिंकत वेगवान धावपटूचा मान मिळविला. अक्षता संमुखप्पा गंगोंडा हिने द्वितीय तर सृष्टी शरणप्पा हडपद हिने तृतीय स्थान मिळविले. मुलांच्या गटात प्रथम इम्तियाज पटेल, द्वितीय अथर्व अनिल गोबे (गट शाळा) तृतीय क्रमांक रुद्र कुंभार या विद्यार्थ्यांनी संपादिला. या विद्यार्थ्यांचे समादेशक डॉ. दिपाली काळे यांच्या हस्ते मेडल देऊन सत्कार करण्यात आला. समादेशक सहाय्यक श्री मते यांच्या उत्कृष्ट नियोजनात व श्री. साळुंखे, श्री. तांगडे यांच्या सहकार्याने एस.आर.पी.एफ.ग्रुप नंबर दहाच्या ३८व्या गटांतर्गत स्पर्धा संपन्न झाल्या. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा प्रियांका माळी, सदस्य सुरज टोणपे, मुख्याध्यापक पुंडलिक कलखांबकर आदींनी अभिनंदन केले.

## फिट इंडिया सायकलिंग ड्राईव्ह निमित्त आज सायकल रॅलीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

फिट इंडिया सायकल ड्राईव्ह उपक्रमाअंतर्गत सोलापूर शहर आणि सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने रविवार २४ ऑगस्ट रोजी पहाटे साडेपाच वाजता सायकल मॅरेथॉनचे आयोजन केले आहे

पोलीस दल आणि नागरिकांमध्ये फिटनेस की डोस आधा घंटा रोज या संदेशाचा प्रसार करणे व फिटनेसला दैनंदिन जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनविणे हा असून त्यामुळे ही रॅली आयोजित करण्यात आली आहे.

चार पुतळा येथून सुरुवात होणाऱ्या या सायकलथॉनच्या मार्ग पुढील प्रमाणे आहे. चार पुतळा डफरीन चौक संगमेश्वर कॉलेज सात रस्ता नवीन जिल्हाधिकारी कार्यालय पत्रकार भवन चौक सैफुल चौक एस आर पी एफ कॅम्प वेरना हॉटेल टोळ नाका नांदणी पेट्रोल पंप आणि परत नांदणी पेट्रोल पंप टोल नाका वेरणा हॉटेल एस आर पी एफ कॅम्प सैफुल चौक पत्रकार भवन चौक सात रस्ता रंग भवन सिविल चौक ग्रामीण पोलीस मुख्यालय येथे समाप्त होईल.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेटे वस्तीतील १९ बुद्धिबळ खेळाडूंना पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

श्रीरमा जगदीश बहुद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेटे वस्ती येथील हुशार व गुणवंत बुद्धिबळ खेळाडूंना पुरस्कार म्हणून शालोपयोगी वस्तूचे वाटप करण्यात आले. त्यात कंपास,पॅड वह्या,पेन व खाऊ यांचा समावेश आहे

याप्रसंगी सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे सचिव शरद नाईक, संतोष पैकेकरी सुशील कुमार शिंदे भावी प्रशालेचे अध्यक्ष, प्रभाकर बटगेरी, नितीन बोंडगे, सचिन चव्हाण, संमेद हूल्ले व शिक्षिका वैशाली कार्वेकर हे प्रामुख्याने उपस्थित




होते. पुरस्काराने सन्मानित खेळाडू याप्रमाणे :संदेश अनिल गायकवाड, अविष्कार स्वप्निल दलाल, समृद्धी प्रवीण कसबे, सृष्टी सतीश चंदनशिवे, काव्या संतोष चंदनशिवे, अभिराज देवकुमार चंदनशिवे, वेदिका राहुल घरबुडवे, प्रशिक सुमित कापसे, सार्थक मधुकर माने, सानिका बाबासाहेब चंदनशिवे, समर्थ मधुकर माने, विश्वजीत शाहीर शिंदे, विहान श्रीकांत चंदनशिवे, हरीश गणेश गेजगे, तन्मय राहुल घरगुडवे, आहान देवकुमार चंदनशिवे, समिधा अमोल चंदनशिवे,

## थ्रोबॉल आमंत्रित जिल्हा स्पर्धा मंगळवारी

**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट -**

थ्रोबॉल असोसिएशन सोलापूर यांच्या वतीने १४ व १७ वर्षे मुले व मुली थ्रोबॉल जिल्हा आमंत्रित स्पर्धा मंगळवार २६ ऑगस्ट रोजी बीपीएड कॉलेज नेहरूनगर येथे सकाळी ९.३० वाजता वाजता होणार आहे. या स्पर्धे साठी येताना क्रीडा शिक्षकांनी संघाची यादी, खेळाडूंची आधार कार्डची झेरॉक्स व आवश्यक साहित्यसह मैदानावर उपस्थित रहावे.

खेळाडूंनी मैदानावर संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.संतोष खेंडे ९८५०६६६७९५, रवींद्र चव्हाण ८८५६९७५०७५, श्रीधर गायकवाड ७३८५८७३४६० अथवा संतोष पाटील ९१५६२३०००९ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रोटरी क्लबईस्टचे अध्यक्ष प्राचार्य कार्तिक चव्हाण, जिल्हा संघटनेचे सचिव मारुती घोडके व संचालक राजाराम शितोळे यांनी केले आहे.



## महादेव चषक बेसबॉल निमंत्रित जिल्हा स्पर्धेत २५६ खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

सोलापूर शहर व जिल्हा बेसबॉल असोसिएशन व श्री मल्लिकार्जुन हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने १४ व १७ वर्षे मुले व मुली बेसबॉल जिल्हास्तरीय निमंत्रित स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर जिल्हा मुख्याध्यापक संघटनेचे सहसचिव श्रावण बिराजदार यांच्या हस्ते, सॉफ्टफुटबॉल फेडरेशन ऑफ इंडियाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष वैजिनाथ हत्तुरे यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थेचे संचालक धरेप्पा हत्तुरे व जिल्हा सचिव प्रा.संतोष खेंडे, गंगाराम घोडके यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

या स्पर्धेसाठी व्हॅलेंटाईन स्कूल, आयडियल स्कूल, आय एम एस स्कूल, श्री मल्लिकार्जुन हायस्कूल, श्री सिद्धेश्वर कारखाना प्रशाला, नूतन विद्यालय कुर्डूवाडी या शाळेतील १६ संघातून २५६ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेप्रसंगी प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक रमेश दिंडोरे मारुती माने, अनिल गावडे, क्रीडा शिक्षक रवींद्र चव्हाण, संतोष पाटील, सिताराम भांड, दुर्गेश यादव, राजकुमार माने हे उपस्थित होते. या स्पर्धेसाठी पंच म्हणून पंचप्रमुख सागर जगझाप, महेश तेली, वीरेश कुंभार, साई कावळे, धीरज रायकोटी यांनी काम पाहिले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा सचिव प्रा. संतोष खेंडे, प्रास्तविक रमेश दिंडोरे आभार परमेश्वर चांदोडे यांनी मांनले

## तालुकास्तरीय तायक्कांदो व कराटे स्पर्धेत मंद्रूपच्या खेळाडूंची बाजी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्यावतीने मंद्रूप व आचेगाव येथे झालेल्या दक्षिण तालुकास्तरीय तायक्कांदो व कराटे स्पर्धेत मंद्रुप येथील दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी विविध वजनी गटात बाजी मारली.

या सर्व खेळाडूंची जिल्हास्तरीय तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यशस्वी खेळाडूंना दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमी मंद्रूपचे मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. निवड झालेल्या खेळाडूंचे दक्षिण सोलापूर तायक्कांदो अकॅडमी अध्यक्ष प्रवीण जोडमोटे, निरंजन ख्याडे, रेश्मा राठोड, सचिन कुंभार, सिध्दाराम विजापूरे, प्रदिप धुळखेडे,प्रिती राठोड यांनी अभिनंदन केले आहे.

### विविध वजनी गटात यश मिळवलेले खेळाडू असे

**१४ वर्षे मुली** : प्रथम : प्रगती कुमठेकर, धन्वंतरी कुमठेकर, श्रद्धा सोलापूरे, सुफीया शेख, स्वाती कट्टीमनी, साक्षी खंदारे, दिव्या पवार, श्रावणी पवार. द्वितीय : आरोही रणखांबे, आरोही गाडेकर, मंजुळा वाले.

**१७ वर्षे मुली** : प्रथम : अनुष्का शिंदे, सफिना शेख, पौर्णिमा खंदारे, द्वितीय क्रमांक, नंदिनी शिंदे, श्रावणी नंदुरे.

**१४ वर्षाखालील मुले** : **प्रथम** : आयुब शेख,मोहन चव्हाण, प्रमोद लच्याणे, ओंकार सोलापूरे, समर्थ चव्हाण, अबुबकर नदाफ. द्वितीय : संग्राम नवले, सार्थक पवार.

**१७ वर्षे मुले** : **प्रथम** : अमन शेख, अथर्व उंबरजे, वेदांत सोलापुरे, अभिजीत खरात.

**१९ वर्षाखालील मुले** : **प्रथम** : सुमित पवार. **मुली** : महेक शेख, प्रतिभा राठोड.

## विद्यार्थीदशेपासून प्रत्येकाने खेळ आत्मसात केल्यास भारत देश निरोगी युवकांचा देश बनेल : ॲड. दीपक सुळ

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि.२३ ऑगस्ट-**

कोणताही ऑलिम्पिक खेळ प्रकार शिकल्यास शारीरिक आणि मानसिक कणखरता आपोआप येते. त्याशिवाय अंगी शिस्त देखील बाणली जाते. म्हणूनच खेळाचे बाळकडू बालपणापासूनच देशाच्या भावी नागरिकांना दिले गेल्यास आपला देश निरोगी आणि सुदृढ युवकांचा देश ओळखला जाईल असे प्रतिपादन ॲड दीपक सुळ यांनी केले.

सुळ पुढे म्हणाले की, युद्धकला क्रीडा प्रकारात अत्यंत शिस्त असते आणि त्यामुळे ज्युदो खेळाचे खेळाडूना आपल्या देशाचे संरक्षण करणाऱ्या मिलिटरी आणि पॅरा-मिलिटरी फोर्सेससह पोलीस दलामध्ये देखील सेवा करण्याची संधी मिळते. खेळ शिकल्याने आरोग्यासह उत्तम भविष्याची सुनिश्चिती होते म्हणूनच या देशातील प्रत्येक बालकाने कोणतातरी खेळ शिकलाच पाहिजे असे आग्रही प्रतिपादन सुळ यांनी केले.

बार्शी रोडवरील गिरवलकर मंगल कार्यालयामध्ये पुनीत बालन ग्रुप प्रस्तुत ५२व्या राज्यस्तरीय सब ज्युनियर गटाच्या स्पर्धेचे शनिवारी उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य संघटनेचे अध्यक्ष



आणि लोकमान्य टिळकांचे पणतू शैलेश टिळक हे होते. या प्रसंगी योगेश गिरवलकर, सिद्धेश्वर बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचलन डॉ अशोक वाघमारे यांनी केले. प्रास्ताविक लातूर ज्युदो संघटनेचे अध्यक्ष डॉ प्रदीप देशमुख यांनी केले.

उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर राज्य ज्युदो संघटनेचे महासचिव दत्ता आफळे, कोषाध्यक्ष रवींद्र मेटकर, उपाध्यक्ष डॉ गणेश शेटकर, सुरेश समेळ, मुकूंद डांगे, तिलक थापा, दिनेश बागूल, राज्य तांत्रिक समितीच्या अध्यक्षा दर्शना लाखाणी, सचिव योगेश धाडवे, अतुल बामनोदकर, सचिन देवळे, निखील सुवर्णा, स्पर्धा संचालक योगेश शिंदे यांसह लातूर ज्युदो संघटनेचे सचिव आशिष क्षीरसागर, डॉ संपत साळुंके, डॉ अशोक वाघमारे यांची उपस्थिती होती.

दरम्यान, उद्घाटन कार्यक्रमावेळी राज्याचा सर्वोच्च क्रीडा सन्मान असलेल्या ज्युदो खेळातील शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू यशवंत दांगट, प्रसाद मोकाशी, अतुल शेलार आणि तुषार मालोदे यांच्यासह नुकतीच आंतरराष्ट्रीय पंच परीक्षा उत्तीर्ण झालेले सुरेश कनोजिया यांचा सत्कार करण्यात आला.



## तालुका बुद्धिबळ स्पर्धेत हुन्नूर आश्रम शाळेची कामगिरी

### दहा खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २३ ऑगस्ट-**

शालेय तालुका बुद्धिबळ स्पर्धेत माध्यमिक आश्रम शाळा हुन्नूर प्रशालेने उल्लेखनीय कामगिरी केली. १७ वर्षे वयोगट मुलींमध्ये संचिता सरगर व १४ वर्षे वयोगट मुलांमध्ये सुदर्शन शिंदे या दोन विद्यार्थ्यांनी मंगळवेढा तालुक्यातून प्रथम येण्याचा मान पटकावला. या कामगिरीवर प्रशालेतील १० खेळाडूंची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली.

मंगळवेढा येथील उदयसिंह मोहिते पाटील इंग्लिश मीडियम स्कूल येथे झालेल्या या स्पर्धेत १७ वर्षे वयोगट मुलींमध्ये संचिता सरगर प्रथम तर अक्षता खरात हिने द्वितीय क्रमांक पटकावला. १४ वर्षे वयोगट मुलींमध्ये स्वाती राजगे द्वितीय, मोनिका लवटे तृतीय तर पूजा कटरे हिने पाचवा क्रमांक संपादिला. १९ वर्षे मुलींमध्ये कोमल पुजारी द्वितीय, प्रतीक्षा पाटील तृतीय तर शुभांगी गोरड हिने पाचवा क्रमांक मिळवला. १४ वर्षे वयोगट मुलांमध्ये प्रशालेचा सुदर्शन शिंदे याने मंगळवेढा तालुक्यातून प्रथम येण्याचा मान मिळविला. १९ वर्षे मुलांमध्ये कृष्णा इंगोले चौथ्या क्रमांकावर आला.

सर्व यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक क्रीडा शिक्षकांचे श्री संत चोखोबा शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक प्रशांत साळे व मार्गदर्शिका पूर्वी साळे, मुख्याध्यापक गुरुदेव स्वामी, आप्पासाहेब कटरे, आदीनी अभिनंदन केले. सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक शुभम खंदारे, संग्राम दुधाळ, शिवाजी काशीद व सुनील कोळेकर आदींचे मार्गदर्शन लाभले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### मंगळवेढा पोलिस ठाण्यात नागरिकांच्या ९२ तक्रारी मिटविण्यात पोलिसांना आले यश

**मंगळवेढा दि. २३ ऑगस्ट-**


मंगळवेढा पोलिस ठाण्यात भरविण्यात आलेल्या तक्रार निवार दिनामध्ये शहर व ग्रामीण भागातून १७५ तक्रारी अर्ज प्राप्त झाले होते. दरम्यान मंगळवेढयाचे पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे व बीट निहाय अंमलदार यांच्या सहकार्यातून ९२ तक्रारी अर्ज निकाली काढण्यात यश प्राप्त झाले आहे. सोलापूर ग्रामीणचे पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी आपल्या पदाचा कार्यभार घेतल्यानंतर नागरिकांच्या तक्रारींना स्थानिक पातळीवर योग्य न्याय मिळावा या उदात्त हेतूने प्रत्येक शनिवारी जिल्हयातील प्रत्येक पोलिस ठाण्यामध्ये तक्रार निवारण दिन म्हणून घेण्याचा महत्वकांक्षी निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे दि.२३ ऑगस्ट रोजी मंगळवेढा पोलिस ठाण्याकडे १७५ तक्रारी अर्ज मंगळवेढा शहर बीट,मंगळवेढा ग्रामीण बीट,बोराळे दूरक्षेत्र,नंदेश्वर दूरक्षेत्र,हुलजंती दूरक्षेत्र,लक्ष्मी दहिवडी बीट आदी सहा बीटमधून हे अर्ज प्राप्त झाले होते. पोलिस ठाण्यामध्ये पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे,सहाय्यक पोलिस निरिक्षक अंकुश वाघमोडे,सहाय्यक पोलिस निरिक्षक विनोद लातूरकर,पोलिस उपनिरिक्षक विजय पिसे,नागेश बनकर,पोलिस हवालदार दिगंबर गेजगे,पोलिस हवालदार मनोज खंडागळे,योगेश नवले यांचेसह सर्व बीट अंमलदार यांच्या मदतीने या अर्जांचा निपटारा करण्यात आला.दरम्यान प्रामुख्याने पैसे,शेती,घरगुती असे वाद यामध्ये मोठया संख्येने असल्याचे निदर्शनास आले.येथील महिला समुपदेशन केंद्राच्या विभावरी कसबे,वैशाली गायकवाड आदींनी यामध्ये पती पत्नीचा एक वाद संपविला.प्रथमच समुपदेशन केंद्र या तक्रार निवारण दिनामध्ये सामील झाले होते.



सोलापूर : हुतात्मा स्मृती मंदिरात शनिवारी शिवरंजनीच्या संगीत सेवा पुरस्कारप्रसंगी संगीतकार अवधूत गुप्ते यांचे स्वागत पंडीत अजित कडकडे यांनी औक्षण करून केले.

## निधन वृत्त...

### ज्येष्ठ स्वयंसेवक वासुदेव पटवर्धन



**सोलापूर, २३ ऑगस्ट -**

रा.स्व संघाचे सोलापुरातील ज्येष्ठ स्वयंसेवक वासुदेव राजाराम उर्फ बाळासाहेब पटवर्धन यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर पुणे येथील वैकुंठ भूमी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### दत्तात्रय कुलकर्णी



**मंगळवेढा, दि.२३ ऑगस्ट -**

ब्रह्मपुरी, ता.मंगळवेढा येथील दत्तात्रय रघुनाथ कुलकर्णी उर्फ दत्ता काका ( वय ७२) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार. २२ ऑगस्ट रोजी रात्री १ च्या सुमारास निधन झाले.. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन विवाहित कन्या, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सांगोला येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, माजी नगरसेवक, भाजपा नेते नागेश जोशी यांचे ते चुलत सासरे तर शेतकरी महिला सूतगिरणीच्या संचालिका सौ.नम्रता जोशी व ब्रह्मपुरीचे दै.सकाळचे माजी पत्रकार संजय कुलकर्णी यांचे ते चुलते होते. कै. दत्तात्रय कुलकर्णी यांचेवर ब्रह्मपुरी येथील वैकुंठधाम येथे २३ ऑगस्ट रोजी दुपारी धार्मिक पध्दतीने अंत्यसंस्कार करण्यात आले.

### सुभाष मुद्दे



**लातूर, दि.२३ ऑगस्ट -**

सावेवाडी येथील सुभाष यल्लाप्पा मुद्दे (वय ७४) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी (दि. २२) रोजी सकाळी निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी (दि. २३) रोजी सकाळी ११:३० वाजता मारवाडी स्मशानभूमी लातूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, दोन मुले, भावंडे, नातवंडे असा परिवार आहे.

### सकुबाई कुन्हाडकर



**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट -**

सकुबाई सिताराम कुन्हाडकर (वय ५५) यांचे शनिवारी (दि.२३) अल्पशा आजाराने निधन झाले. ते विठ्ठल कुन्हाडकर यांचे मोठी वहिनी होत.

### आकाश माने



**सुस्ते, दि. २३ -**

आकाश समाधान माने २७ रा. सुस्ते (ता. पंढरपूर) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. ते सिटी ग्रुप प्रावेट कंपनी मगरपट्टा येथे कनिष्ठ अभियंता म्हणून कार्यरत होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सुस्ते परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# शिंदे सेनेच्या नव्या पदाधिकाऱ्यांकडून पक्षवाढीकडे दुर्लक्ष ?

- पक्षात गटबाजी वाढली
- पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी लक्ष देण्याची गरज

**तभा वृत्तसेवा । अमोगसिध्द मुंजे**
**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट -**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षवाढीसाठी तरूणांना संधी देत नवीन पदाधिकाऱ्यांची निवड केली. यामध्ये सोलापूरचे शहरप्रमुख सचिन चव्हाण व जिल्हाप्रमुख अमर पाटील यांचा समावेश आहे. तरूण पदाधिकाऱ्यांनी पक्ष वाढीसाठी प्रत्येक वॉर्ड व गावात शाखा उघडून पक्ष तळागाळापर्यंत पोहोचवावे हा नवीन शहरप्रमुख व जिल्हाप्रमुख निवडीमागे हेतू आहे. मात्र निवड होऊन सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी उलटला तरी शहरात नवीन शाखा उघडण्यात आल्याचे दिसून येत नाही. तर जिल्हाप्रमुख पाटील यांनीही शाखा उद्घाटनासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे नव्या पदाधिकाऱ्यांकडून पक्षवाढीकडे दुर्लक्ष होतेय का? असा सवाल शिवसैनिकासह पदाधिकाऱ्यातून विचारला जात आहे.

### पक्षविस्तार करण्यासाठी रणनीती आखणे अपेक्षित

नवीन पदाधिकारी निवडीमुळे पक्षात गटबाजी असल्याने जिल्ह समन्वयक प्र शिवाजी सावंत व माजी उपमहापौर दिलीप कोल्हे शिवसेनेचा राजीनामा देऊन भाजपात प्रवेश करण्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे शहर प्रमख व जिल्हाप्रमुख यांनी स्थनिक स्वराज्य संस्थेवर भगवा फडकविण्यासाठी व पक्षविस्तार करण्यासाठी रणनीती आखणे अपेक्षित आहे. पाटील यांना दक्षिण व अक्कलकोट तालुक्यात शिवसेना पदाधिकाऱ्यांची मोट बांधण्यासाठी गटबाजीवर मात करावे लागणार आहे. जुन्या पदाधिकाऱ्यांना सोबत घेताना नव्यांनाही संधी द्यावी लागणार आहे.

शिवसेना पक्ष फुटल्यानंतर शिवसेनेचे शिंदे सेना व उबाठा सेना अशा दोन गटात विभागणी झाली. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना पक्षवाढीवर विशेष जोर दिला. यावेळी राज्यात दौरे आयोजित करून अनेक आजी व माजी आमदारांचा पक्षप्रवेशही घडवून आणला.



सोलापूरातही पक्षाला बळ मिळावे म्हणून पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी पदाधिकारी खांदेपालट करून नवीन शहरअध्यक्ष व जिल्हाप्रमुख यांची निवड केली. यामध्ये सचिन चव्हाण यांना शहरप्रमुखपदी संधी देण्यात आली. शहर प्रमुख पद मिळाल्यानंतर चव्हाण यांनी सोलापूर शहरात पक्षवाढीसाठी उल्लेखनीय कामगिरी केल्याचे दिसून येत नाही. पक्षाच्या कार्यक्रमासाठी अनेक मंत्र्यांचे दौरे झाले. मात्र यावेळी एकाही शाखेचे उद्घाटन करण्यात आले नाही. पक्षप्रमुखांकडून सर्व प्रकारचे सहकार्य मिळत असताना आगामी महापालिका निवडणुकीसाठी व्यूहरचना दिसून येत नाही. पक्षाच्या शाखा उघडून नवीन पदाधिकाऱ्यांना संधी दिल्यास कार्यकर्त्यांची फौज तयार होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे पक्षविस्तारही होण्यास मदत होते. शिवाय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली अन्य पक्षातील एकाही नेत्याचा पक्षप्रवेश झाला नाही. चव्हाण व इतर पदाधिकारी यांच्यामध्ये गटबाजीअसल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे पक्षवाढीला खीळ बसत आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमर पाटील यांची जिल्हाप्रमुखपदी निवड केली. पाटील हे उबाठा सेनेचे जिल्हाप्रमुख होते. पक्षातील गटबाजीमुळे त्यांनी राजीनामा देऊन शिंदे सेनेत प्रवेश केला. जिल्हाप्रमुख झाल्यानंतर पाटील यांच्या कार्यकाळात नवीन पदाधिकारी निवड रखडली आहे. दक्षिण तालुक्यात पक्षविस्तार करताना 'योगि' व ' धर्म ' राजकारण दूर करावे लागणार आहे. योगि व धर्म रणनितीतुळे पक्षवाढीवर परीणाम होत असल्याचे कार्यकर्ते सांगत आहेत. दक्षिण आणि अक्कलकोट तालुक्यात पक्षवाढीसाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे असताना जिल्हाप्रमुखांचे त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे कार्यकर्त्यांमधून बोलले जात आहे. मनिष काळजे यांचे जिल्हाप्रमुखपद पाटील यांना देण्यात आल्याने काळजे यांच्या गटात नाराजी दिसून येते. शिवाय उपजिल्हाप्रमुख आणपपा सतुबर यांचा गटही सक्रीय नसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांच्या गटातही नाराजी दिसून येते. पक्षातील गटबाजीचा स्थनिक स्वराज्य संस्था निवडणूकीवर परीणाम होण्याची शक्यता आहे. येत्या दोन महिन्यात स्थानिक संस्थाच्या निवडणूका होणार असल्याने शहरप्रमुख व जिल्हाप्रमुख यांनी दौरा आयोजित करून पक्षवाढीसाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याची चर्चा आहे.

# जिल्ह्यात केंद्रप्रमुखाच्या १९९ पैकी तब्बल १६० जागा रिक्त

- जिल्हा परीषदेकडून पदोन्नती रखडल्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट-**

शिक्षण विभाग व शिक्षक यांना जोडणारा दुवा म्हणून केंद्रप्रमुखाची ओळख आहे. म्हणूनच केंद्रप्रमुख हा शिक्षण विभागाचा कणा आहे. मात्र, केंद्रप्रमुखांची १६० जागा रिक्त असल्याने विद्यार्थी व शिक्षकांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे रिक्त जागा तातडीने भरण्याची मागणी करण्यात येत आहे.

जिल्ह्यात केंद्रप्रमुखांच्या १९९ जागा आहेत. त्यातील तब्बल १६० जागा रिक्त आहेत. त्यामुळे शैक्षणिक नुकसान होत आहे. मात्र, याकडे शिक्षण विभाग दुर्लक्ष करून शंभरपेक्षा जास्त शिक्षकांना प्रभारी केंद्रप्रमुख म्हणून पदभार दिले आहे. त्यामुळे शिक्षकांतून संताप व्यक्त करण्यात येत आहे. जिल्ह्यात केंद्रप्रमुखांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असताना ती पदे पदोन्नती आणि परीक्षेद्वारे तत्काळ भरणे क्रमप्राप्त आहे. मात्र, न्यायालयाचे कारण देत शिक्षण विभाग पदोन्नती प्रक्रिया राबविण्यास विलंब लावत असल्याचा दावा शिक्षकांतून होत आहे. राज्यातील पुणे, सांगली, पालघरसह अनेक जिल्ह्यातील जिल्हा परिषदेने केंद्रप्रमुखांची रिक्त पदे पदोन्नती आणि परीक्षा घेऊन भरली आहेत. मात्र, सोलापूर जिल्हा परिषदेकडून याकडे दुर्लक्ष होत आहे. दरम्यान, केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रिया राबविण्यासाठी जिल्हा परिषदेकडून कोणतीच हालचाल दिसत नसल्याने पदोन्नती प्रक्रिया केव्हा राबवणार ? असा सवाल शिक्षकांतून विचारला जात आहे. शिक्षण विभागाने पदोन्नती प्रक्रियेला गती देणे आवश्यक आहे. पदोन्नती ऐवजी प्रभारी पद दिले जाते. मुळ पदे रिक्त राहत आहेत. यामुळे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे ही रिक्त पदे भरण्याची मागणी होत आहे. जिल्ह्यातील अनेक शिक्षकांकडे केंद्रप्रमुखांचे प्रभारी पदभार दिल्याने अनेक शिक्षकांवर कामांचा ताण वाढला आहे. त्यामुळे पदोन्नती प्रक्रिया आणि परीक्षा घेऊन रिक्त असलेल्या जागा तत्काळ भरल्यास अनेक शिक्षकांना न्याय मिळणार आहे.

### पदोन्नती प्रक्रिया विषयानुसार

केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रिया विषयानुसार राबवली आहे. त्यानंतर शासनाने ज्येष्ठतेनुसार प्रक्रिया राबवण्याचे आदेश दिले आहे. पदोन्नती प्रक्रियेच्या विरोधात न्यायालयात सहा प्रकरणे आहेत. त्यामुळे अभिप्राय मागविला आहे. वकिलांच्या अभिप्रायानुसारच पदोन्नती प्रक्रिया राबवली जाणार आहे.

**- कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परीषद , सोलापूर**

दक्षिण तालुक्यातील अनेक ठिकाणी प्रभारी केंद्रप्रमुख पदभार सुरू आहे. मंद्रुप केंद्रात दोन वर्षापासून प्रभारी केंद्रप्रमुख असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शिवाय शिक्षकांवर अतिरीक्त कामाचा ताण पडत आहे.

**- राम गोसावी, अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, मंद्रुप**

# मराठा आरक्षण आंदोलनाला माळशिरसमधून दीड हजार गाड्या



- पत्रकार परिषदेत धनाजी साखळकर यांची माहिती

**अकलूज, दि.२३ ऑगस्ट-**

मुंबई येथे होणाऱ्या २९ ऑगस्ट २०२५ रोजी मराठा समाजाने आरक्षण मिळवण्याच्या आंदोलनासाठी मुंबईला यावे असे आवाहन संघर्ष योद्धा मनोज जरागे पाटील यांनी केलेल्या आवाहणास माळशिरस तालुक्यातून प्रचंड प्रतिसाद मिळत असून तालुक्यातून सुमारे दीड हजार गाड्या भरून मराठा समाजातील लोक मुंबईला जाणार असल्याची माहिती मराठा समाज समन्वयक धनाजी साखलकर यांनी अकलूज येथे पत्रकार परिषदेत दिली.

साखलकर म्हणाले, मुंबई येथील आंदोलनात सहभागी होण्यासाठी आम्ही संपूर्ण माळशिरस तालुक्याचा दौरा केला आहे. मराठा समाजामध्ये या आंदोलनाला जाण्यासाठी प्रचंड उत्साह दिसून आला असून तालुक्यातून सुमारे दीड हजार चार चाकी गाडयांनातून सुमारे २० हजार आंदोलक मुंबईला पोहोचणार आहेत. आम्ही आंदोलनासाठी कोणाकडूनही आर्थिक मदत घेत नाही. ज्यांना आर्थिक मदत द्यावंयची आहे त्यांनी आंदोलनासाठी गाड्या द्याव्यात. आंदोलनापूर्वी आरक्षण मिळाले तरी मुंबईला जाणार आणि नाही मिळाले तरी आंदोलनासाठी आम्ही मुंबईला जाणार आहोत. आरक्षण मिळाले तर आम्ही गुलालाच्या गाड्या भरून मुंबईला जाऊ आणि सरकार मधील मंत्र्यांना गुलाल लावून त्यांचे आभार मानू. ५० टक्केच्या आत मराठा समाजाला आरक्षण द्यावे. संगे सोयरेची नोंद धरावी आणि सरसकट कुणबी नोंद करावी या आमच्या प्रमुख मागण्या आहेत. यावेळी बोलताना आण्णासाहेब शिंदे म्हणाले, ज्या मराठा बांधवानाच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत त्यांनी आता आपले भागले म्हणून गाफिल न राहता आपल्या इतर बांधवासाठी आंदोलनात सामील झाले पाहिजे. प्रा. डॉ. मीनाक्षी जगदाळे म्हणाल्या, आरक्षण आमच्या हक्काचे आहे. आरक्षण नसल्यामुळे आमच्या समाजावर खूप प्रतिकूल परिणाम होत आहे. शिक्षण आणि नोकरीमध्ये आमच्या समाजाची कुचंबना होत आहे. या पत्रकार परिषदेसाठी मराठा कोअर कमिटीतील भारत मगर, आशुभाऊ ढवळे, गणेश इंगळे, गणेश कदम, बापू भोळे, संकेत जाधव, सागर वरकड, ओंकार क्षीरसागर, शारदा चव्हाण, विशाल केचे पाटील, सयाजीराजे गायकवाड, सचिन गायकवाड उपस्थित होते.

# लक्ष्मी टाकळी येथे ओढ्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२३ ऑगस्ट -**

कित्येक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर तालुक्यातील लक्ष्मीटाकळी परिसरातील प्रतिभाताई परिचारक नगर येथे अखेर ओढ्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून आणि शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष महेश साठे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळेच सांडपाणी व्यवस्थापनातून या ओढ्याच्या कामासाठी तब्बल ६५ लाख रुपये एवढा निधी मिळाल्याची माहिती सरपंच संजय साठे यांनी दिली.



यावेळी ओढ्याच्या कामाच्या शुभारंभ कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करताना सरपंच संजय साठे बोलत होते. यावेळी शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष महेश साठे देखील उपस्थित होते. यावेळी बोलताना सरपंच संजय साठे म्हणाले की ,शासनाच्या अडचणींवर मात करून या कामासाठी कमिटी नेमली, सर्वेक्षण केले आणि शुक्रवारी या कामाची सुरुवात घडवून आणता आली. ओढा झाकणे व ९०% सांडपाणी दुर्गंधी मुक्त करणे या कामात महाराष्ट्र राज्याचे तात्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांचे मोठे योगदान आहे. लक्ष्मीटाकळी ग्राम पंचायतीच्या इतिहासात प्रथमच लक्ष्मी टाकळीला आषाढी वारी तीर्थक्षेत्रात समाविष्ट करून ३०० टॉयलेट, ५०० बाथरूम आणि ३० वॉटर टँकर मिळाले. ठाकरे चौक - लक्ष्मी टाकळी चौक रेल्वे फ्लायओव्हर प्रकल्पासाठी ५८ कोटी निधी मंजूर झाला आहे. या बरोबरच जिल्हाध्यक्ष महेश साठे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे समाजकल्याण विभागातून १ कोटींचा निधी मिळाला आहे.मागील यात्रेच्या वेळी घेतलेली शपथ पूर्ण करीत यंदा शिवेवरील लक्ष्मीआई मंदिराकडे जाणारा रस्ता हा मुरुमाचा करण्यात आला. या मुरुमाच्या रुंद रस्त्यावरून यात्रेत जाण्या, येण्याचा अखेर सुखर मार्ग येथील नागरिकांना उपलब्ध झाला. त्यामुळे या पुढील काळात देखील आमचे साठे कुटुंब लक्ष्मीटाकळी परिसराच्या तसेच येथील नागरिकांच्या सेवेकरिता सदैव कटिबद्ध असल्याची देखील सरपंच संजय साठे यांनी यावेळी ग्वाही दिली.

यावेळी मा.जि.प.सदस्य रामदास ढोणे, उपसरपंच रुपाली करंडे, ग्रामपंचायत सदस्य औदुंबर ढोणे, सागर सोनवणे, नागरबाई साठे, आशाबाई देवकाते, रेश्मा साठे, रोहिणी साठे व माजी सरपंच विजयमाला वाळके, ग्रामसेवक जयंत खंडागळे, प्रशांत डोंगरे, पैगंबर शेख, रोंगे, प्रा.अनंत गिरवीकर कुलकर्णी, आबासाहेब खरात, चंद्रशेखर पोरे, रमेश जाधव सर, मनोज लांबोरे, अथर्व लांबोरे, प्रवीण देशपांडे, दीपक देशपांडे, भानुदास शिंदे, अकबर आतार, हुसेन तांबोळी, समाधान नवगिरे, दत्ता शेटे, श्याम देशपांडे आदी उपस्थित होते.

# मराठवाडी बोलीचा समृद्ध साज : चलबट

१९६० च्या दशकात मराठी साहित्यात दलित आत्मकथनांनी एकच हलकल्लोळ माजवला होता. कारण, या आत्मकथनांची शैली, बोली भाषा, शिव्या, म्हणी, वाक्प्रचार हे सारेच मराठी भाषा आणि साहित्या साठी नवे दालन होते. ह्या समृद्ध दालनाने मराठी साहित्याला जागतिक उंचीपर नेऊन ठेवले. मराठीतील दलित साहित्याची प्रेरणा घेऊन हिंदीमध्येही दलित साहित्य मोठ्या प्रमाणात लिहिले जाऊ लागले.


गावगाड्याबाहेर असलेला कायम दुर्लक्षित, वंचित, अवमान, अवहेलनांनी घायाळ, शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर असणार्या अस्पृश्य समजल्या जाणार्या दलित समाजाच्या व्यथा, वेदना, दुःख, शोषण साहित्यातून जसजसे समोर येऊ लागले, तसतसे बेगडी समाजव्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगली जाऊ लागली.

प्रा.डॉ.अर्जुन व्हटकर यांचे चलबट 'हे आत्मचरित्र ग्रंथाली प्रकाशनाच्या वतीने प्रसिद्ध होत आहे. कसलीही शैक्षणिक पार्श्वभूमी नसताना गावगाड्याबाहेरील वंचित समाजातील एक मुलगा संघर्षाची ढाल हाती घेत स्वतः च्या हिमतीवर शिक्षणाची कास धरन स्वतःची वेगळी वाट निर्माण करतो. गावगाडा ओलांडून शहरात आल्यानंतरही संघर्षाने पाठ सोडली नाही. शहरात नोकरी लागल्यानंतर स्थिरस्थावर झाल्यानंतर 'मी भला आणि माझी नोकरी अन् बायका-पोरं भली असे न करता स्वतःची लहान भावंडे अर्जुन व्हटकरांनी आपल्या गावातून शहरात आपल्या सोबत आणली. त्यांचे शिक्षण ते नोकरी मिळेपर्यंत भावंडांची पोटच्या लेकरांप्रमाणे लेखक काळजी घेताना 'चलबट'या आत्मचरित्रात पानोपानी पहायला मिळते. धाकटा भाऊ मोठा शास्त्रज्ञ आणि धाकट्या बहिणी प्राध्यापिका, शिक्षिका म्हणून नावारूपाला येतात, हे लेखकाच्या कष्टाचे फलित होय.



हे सगळे करत असतानाच गावगाड्यात जसे मेलेल्या जनावराच्या कातड्याचं चलबट काढून ते रंगवून कातड्याचं चलबट वाळायला जसे ढोर घालतो, त्याप्रमाणेच लेखकाने बहिण-भावांच्या प्रगतीसाठी स्वतःचे आयुष्य पणाला लावून चलबटाप्रमाणे ते वाळायला घातले. मात्र आप्तेष्टांना त्या त्यागाचे, कष्टाचे काहीही देणे-घेणे नाही, ही सल चलबट ह्या आत्मचरित्राचा आत्मा आहे.'चलबट' ह्या आत्मचरियाचे आणखी एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ह्या आत्मचरित्राला लेखकाने मराठवाडी बोलीचा साज चढविलेला आहे.बोलीभाषेतील अगम्य शब्दांचे अर्थ, लेखकाने शेवटी परिशिष्टात सहा पानांतून दिलेले आहेत.

कोणत्याही भाषेचा समृद्ध ऐवज हा त्या भाषेतील बोलल्या जाणार्या बोली असतात. बोली भाषा ही समाजाची संस्कृती, परंपरा यांची वाहक असते.




मराठवाड्यात बोलल्या जाणार्या अस्सल मराठवाडी शैलीचा प्रत्यय 'चलबट वाचताना येतो, हे या आत्मचरित्राचे वेगळेपण आहे.आज जागतिकीकरणाच्या आक्रमणामुळे बोली भाषा पृथ्वीतलावरून नष्ट होताहेत, नामशेष होत चालल्या आहेत.अशा विदारक परिस्थितीत मराठवाडी बोलीतील हा संपन्न ऐवज वाचकाला समृद्ध करतो. लेखकाच्या घरात शैक्षणिक, सांस्कृतिक जीवनाचा, परिवर्तनाचा अन कलेचा कसलाच वारसा नसताना गावगाड्यातील एका घरातून दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता दूर करत परिस्थितीशी दोन हात करत, शिक्षणाचे व्रत अंगिकारत एका अंधारातील कुटुंबाला प्रकाशमान करण्याची चित्तरकथा लेखक 'चित्तरमटकथा विशद करतो. हे सगळे करत असतानाच स्वत:चे वैयक्तिक आयुष्य पणाला लावून सोशिकतेचा कळस गाठत, ससेहोलपट, अपमान,उपमर्द सहन करत साहित्य आणि कलेची आराधना करणाऱ्या अवलियाचा पट हे आत्मचरित्र आपल्यापुढे उलगडते.

'चलबटा' प्रमाणे स्वतःला झोकून कुटुंबाच्या प्रगतीसाठी आपलं सुख, इच्छा-आकांक्षा वाळत घालून लेखकाने समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. वाचक निश्चितच ह्या गावगाड्यातल्या एका दुर्लक्षित समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक दस्तावेजाचे स्वागत करतील, ह्याबद्दल निश्चित खात्री वाटते!

**-प्रा. नानासाहेब गव्हाणे**
**मो. ९९२२५४०२७९**

## महत्वाचे...

### गणेश उत्सव मध्यवर्ती मिरवणूक रस्त्याची दुरवस्था

सोलापूर : मध्यवर्ती गणेश मंडळाच्या मिरवणुका सालाबादप्रमाणे शहरातून ज्या मार्गावरून निघतात त्या मार्गावरील रस्त्याची दुरवस्था झाली आहे. महापालिका प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.

(छायाचित्रे : केवल तिवारी)


पूर्व भाग मध्यवर्ती जेल रोड रस्ता


लष्कर मध्यवर्ती मौलाली चौक रस्ता


लोकमान्य मध्यवर्ती किल्ला बाग रोड


सार्वजनिक मध्यवर्ती मल्लिकार्जुन मंदिर रस्ता


सार्वजनिक मध्यवर्ती माणिक चौक रस्ता

# महापालिकेत स्वतंत्र सीएसआर फंड सेलची स्थापना

## विविध विभागांकडून प्राप्त झाल्या ४७ कोटींच्या मागण्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

महापालिकेत स्वतंत्र सीएसआर सेल ची स्थापना केली असून या माध्यमातून आता पुढील विकास कामे केली जाणार आहेत. सीएसआर रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. यासाठी आता विविध विभागांकडून ४७ कोटींच्या मागण्याही प्राप्त झाल्या आहेत. आता विविध कंपन्यांकडे सीएसआर फंडाची मागणी केली जाणार आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये महापालिकेने विविध कंपन्यांकडून प्राप्त सीएसआर फंडातून शहरातील विविध विकास कामे आणि नागरिकांना विविध सोयी सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. आता यासाठी शहरात ठराविक वेगवेगळ्या कंपन्यांकडून यापूर्वी महापालिकेला मोठ्या प्रमाणात सीएसआर फंड उपलब्ध झाल्यानंतर त्या माध्यमातून शहरात विविध विकास कामे करण्यात आली आहेत. यापुढे लोकोपयोगी अशी अनेक विकास कामे महापालिकेचा निधी न खर्चता पूर्ण करण्याचा खटाटोप प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सुरू आहे. महापालिकेच्या वतीने शहरातील अशा विविध कामांची यादी तयार करण्यात आली आहे. यानुसार प्राप्त सीएसआर फंडातून एकेक कामे हाती घेण्यात येत आहेत. ही प्रक्रिया राबवितानाच विविध नियम अटी पूर्ण करण्याच्या प्रक्रियेलाही प्रशासनाकडून भेट देण्यात आला आहे. यातूनच नुकतेच महापालिकेने सीएसआर फंड उपक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी लागणाऱ्या रजिस्ट्रेशनसाठी केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेयर्स यांच्याकडे नोंदणी करून सीएसआर रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र

### स्वतंत्र सीएसआर सेलच्या अध्यक्ष पदावर अतिरिक्त आयुक्त रवी पवार

दरम्यान, या अनुषंगाने आता पुढील लोकोपयोगी कार्य तसेच शहर विकासाच्या कामामध्ये हातभारसाठी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर महापालिकेमध्ये स्वतंत्र सीएसआर सेल ची स्थापना करण्यात आली आहे. या सेलच्या अध्यक्ष पदावर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांना नेमण्यात आले आहे शिवाय या सेलवर अन्य उपायुक्त व सहाय्यक आयुक्तांना सदस्य म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे.



प्राप्त करून घेतले आहे. याचा क्रमांक- सीएसआर ०००९०७९६ इतका आहे.

महापालिका ही विविध प्रकारच्या लोकोपयोगी उपक्रमांची अंमलबजावणी करत असते. केंद्र शासनाच्या कंपनी अधिनियम २०१३ अन्वये ठराविक कंपन्यांना त्यांच्या सरासरी नफ्याच्या किमान दोन टक्के रकमेचा उपयोग सीएसआर उपक्रमासाठी करणे बंधनकारक आहे. याच पार्श्वभूमीवर महापालिकेत आत्तापर्यंत बालाजी अमाईन्स, प्रिसिजन कॅमशॉफ्ट तसेच विविध नामवंत बँकांकडून शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात काम करण्यासाठी महत्त्वपूर्ण निधी प्राप्त झाला आहे. यापूर्वी महापालिकेत शहरातील विविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्यासाठी तसेच शहर विकासाच्या दृष्टीने आयोजित विविध कंपन्या, बँका रोटरी क्लब आणि स्वयंसेवी संस्था समवेत सी एस आर निधीच्या उपयोग संदर्भात बैठक घेऊन त्यामध्ये सविस्तर सादरीकरण केले होते. या बैठकीत विविध विभागांकडून ४७ कोटींच्या मागण्या प्राप्त झाल्या आहेत. यानुसार आता पुढील प्रक्रिया देखील महापालिकेकडून सुरू करण्यात आली आहे. या सगळ्या कार्याचा व समन्वय तसेच योग्य प्रकारे पाठपुरावा करण्यासाठी सीएसआर सल्लागार नेमणे आवश्यक असल्याने प्रशासनाकडून त्याचीही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून यासाठी एकमेव प्राप्त अर्जदार किशोर किसन फडतरे यांना कार्यारंभ आदेश देखील देण्यात आले आहे.

### लोकोपयोगी कामासाठी आता विविध कंपन्या आल्या पुढे

महापालिकेला सीएसआर निधीसाठी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सीएसआर निधीसाठी कंपन्या व बँकांना ईमेलद्वारे अनुरोध करण्यात आले आहे. तर आणखी काही कंपन्यांना तशा प्रकारचे अनुरोध करण्यात येत आहे. यावरून मात्र सोलापूर एनटीपीसी कडून महात्मा गांधी प्राणी संग्रहालय व ग्रुपसाठी १५ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली असून त्यापैकी ७ कोटी रुपयांचा निधी प्राप्त होण्याच्या दिशेने आहे. शिवाय इतरांनीही आपला सीएसआर निधी महापालिकेला विविध लोकोपयोगी कामासाठी देण्याचे निश्चित केल्याचे सांगण्यात आले.

# श्रावणमास पुराणाची समाप्ती मंगळवारी

### प.पू.सदगुरु डॉ श्री शिवकुमार महास्वामी यांची प्रमुख उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

ओंकार आश्रम सिद्धारुढ मठाच्यावतीने श्रावणमासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धार्मिक कार्यक्रमातील श्रावणमास पुराणाची समाप्ती मंगळवार २६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे.

हा कार्यक्रम प.पू.सदगुरु डॉ श्री शिवकुमार महास्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. याप्रसंगी मातोश्री लक्ष्मीदेवी कलबुर्गी, प.पू. जडिसिद्ध



स्वामीजी, प.पू.श्री. शंकरानंद स्वामीजी, प.पू.मातोश्री सुशांतादेवीजी, प.पू.पूर्णानंद स्वामीजी आदींचे प्रवचन होणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी महामंगल आरती होऊन महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. तरी भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिद्धारुढ मठाच्या संयोजन समितीने केले आहे.

# 30 सप्टेंबरच्या पटसंख्येनुसार संचमान्यता

### शिक्षकांना अतिरिक्त होण्यापासून दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

३१ जुलै ही पटसंख्येची तारीख कळवलेली होती. त्यामुळे राज्यात सर्वत्र गोंधळाची परिस्थिती होती. याविषयी शिक्षण सचिव, शिक्षण आयुक्त व दोन्ही शिक्षण संचालक यांच्याशी राज्यातील सर्व शिक्षक संघटना व शिक्षक आमदारांनी पत्र देऊन चर्चा केली. नुकतेच आहे.प्राथमिक व माध्यमिकचे शिक्षण संचालक शरद गोसावी आणि महेश पालकर यांनी पत्र काढून ३० सप्टेंबरचा पट गृहित धरून संचमान्यता करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांचे आधार अपडेट करून लिंक करावे, जर ते लिंक झाले नाहीत तर विद्यार्थी वर्गात असूनही तो संचमान्यतेसाठी ग्राह्य धरला जाणार नसल्याने पत्रात नमूद केले .

राज्यात दरवर्षी ३० सप्टेंबरचा पट गृहीत धरून संचमान्यता होत असते. परंतु यावर्षी ३१ जुलै ही पटसंख्येची तारीख कळवली होती. त्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. याविषयी शिक्षण सचिव, शिक्षण आयुक्त व दोन्ही शिक्षण संचालक यांच्याशी राज्यातील शिक्षक संघटनांनी व शिक्षक आमदारांनी पत्र देऊन चर्चा केली. मागील आठवड्यात शिक्षण मंत्र्यांबरोबर बैठक घेऊन यावर सविस्तर चर्चा केली होती. परंतु, उच्च न्यायालयात याविषयी याचिका प्रलंबित असल्यामुळे अंतिम निर्णय घेता येणार नाही, असे शिक्षण सचिवांनी स्पष्ट केले होते. त्यानुसार आज दोन्ही शिक्षण संचालकांनी संयुक्तपणे पत्र काढून ३० सप्टेंबर २०२५ च्या संख्येनुसार संच मान्यता करण्यात येईल. राज्यातील सर्व मुख्याध्यापक व वर्गशिक्षकांनी आपापल्या वर्गात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे आधार अपडेट करून लिंक करावेत, जर ते लिंक झाले नाहीत तर विद्यार्थी वर्गात असूनसुद्धा तो संच मान्यतेसाठी ग्राह्य धरला जाणार नाही. असे स्पष्ट केले आहे.

### शिक्षण संचालकांचे आदेश

नवीन निर्णयाला राज्यभरातील संस्थाचालकांसह शिक्षक आमदारांनी विरोध केल्यानंतर पूर्वीच्या निर्णयाप्रमाणे संच मान्यता ३० सप्टेंबरच्या पटसंख्येनुसारच करण्याचे आदेश प्राथमिकचे शिक्षण संचालक शरद गोसावी आणि माध्यमिक व उच्च माध्यमिकचे महेश पालकर यांनी काढले आहे. संचमान्यतेमुळे शाळांना शिक्षकांची पदे वाचविण्याचे मोठे आव्हान असते. जर आवश्यक तेवढी पटसंख्या नसेल तर शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरविण्यात येतात. ३१ जुलै रोजी पटसंख्येनुसार संचमान्यता झाली असती, तर शेकडो शिक्षकांची पदे अतिरिक्त ठरण्याचा धोका होता. आता ३० सप्टेंबरमुळे शिक्षकांना अतिरिक्त होण्यापासुन दिलासा मिळाला आहे.

# जात पडताळणीच्या अध्यक्षा मंजुषा मिस्कर यांची तीन महिन्यातच बदली

## धाराशिवचे अहिरराव यांच्याकडे अतिरिक्त पदभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ता. २३ ऑगस्ट-**

तीन महिन्यापूर्वी सोलापूर जात पडताळणी समितीच्या अध्यक्षा म्हणून मंजुषा मिसकर यांची नेमणूक करण्यात आली होती . एक वर्षाचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच मंजुषा मिसकर यांची सांगलीला बदली झाल्याने जात पडताळणी अध्यक्षपद रिक्त झाले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जात पडताळणीचे प्रकरण प्रलंबित राहणार असल्याने पालक व विद्यार्थ्यांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

जात पडताळणी समितीकडे प्रलंबित अर्जाची संख्या मोठी आहे. आता पुन्हा सोलापूर समितीचा पदभार धाराशिव जात पडताळणी समितीचे अध्यक्ष प्रकाश अहिरराव यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

अहिरराव यांच्याकडे यापूर्वीच लातूर जिल्ह्याचाअतिरिक्त पदभार आहे. यामुळे ते सोलापूरसाठी किती वेळ देऊ शकतील ? हा प्रश्न उपस्थित होत आहे.

जुलै अखेरपर्यंत समितीकडे २१ हजार १४६ अर्ज प्रलंबित होते. अध्यक्षपदी मंजूषा मिसकर रुजू होताच १२ हजार ८६१ जणांना पडताळणी प्रमाणपत्र देण्यात आले. वैद्यकीय, अभियांत्रिकीसह इतर अभ्यासक्रमास पडताळणी प्रमाणपत्राची गरज असल्याने एप्रिल ते जुलै या तीन महिन्यात अर्जाच्या संख्येत १३ हजार अर्ज नव्याने दाखल झाले. प्रलंबित अर्जासोबतहोता, आता पुन्हा अध्यक्ष मिसकर यांची बदली झाल्याने या प्रमाणपत्र देण्यावर परिणाम होणार आहे. अतिरिक्त पदभार असलेले अहिरराव आठवड्यातून किती दिवस देणार ? यावरच प्रमाणपत्र संख्या ठरणार आहे.

### मंदिर समितीसह तीन जात पडताळणीचा पदभार

सोलापूर जात पडताळणी समितीचा पदभार सोपवण्यात आलेले प्रकाश अहिरराव यांच्याकडे धाराशिव जात पडताळणी समिती अध्यक्षपद आहे. याशिवाय त्यांच्याकडे लातूर समितीचा अध्यक्ष व तुळजापूर तुळजाभवानी मंदिर समितीचा कार्यकारी अधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार आहे. त्यात आता नव्याने सोलापूरची नव्याने भर पडली आहे.

# सेंद्रिय प्रयोगातून शेती सुधारली पाहिजे

### ह.दे. कनिष्ठ महाविद्यालयात पद्मश्री चैतराम पवार यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

वृक्षतोड थांबली पाहिजे तसेच शेतीमध्ये विविध सेंद्रिय पद्धतीने प्रयोग करून शेती सुधारली पाहिजे व शाश्वत विकासावर भर दिला पाहिजे, असे मत पहिला महाराष्ट्र वनभूषण पुरस्कार प्राप्त तसेच पद्मश्री पुरस्कार प्राप्त चेतराम पवार यांनी व्यक्त केले.

हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वनांचे संवर्धन करत संशोधन व वन समृद्धीसाठी त्याचा उपयोग कसा होऊ शकेल याबाबत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. एसपीएम इंग्लिश स्कूलमध्ये वनवासी कल्याण आश्रमाच्या वतीने आयोजित वनभाजी महोत्सवाच्या कार्यक्रमासाठी ते आले



होते. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये त्यांच्या बारीपाडा या गावातील लोकांनासंघटित करून वनांचे महत्त्व समजावून तसेच वनभाजांचे महत्त्व समजावून सांगून एक प्रकारे आदर्श गाव पुरस्कार मिळवून दिला हे विद्यार्थ्यांना सांगितले. वनधन विकासाच्या माध्यमातून मोहाच्या वृक्षातून कशा पद्धतीने एक उद्योग उभा राहू शकेल याचे देखील त्यांनी स्पष्टीकरण दिले मोहाच्या वृक्षापासून चॉकलेट, साबण ,वाईन तसेच तेल कशा पद्धतीने काढले जाते व शेतकऱ्यांना त्याचा आर्थिक फायदा कसा होतो हे देखील स्पष्ट केले त्यांनी त्यांच्या बारिपाडा या गावांमध्ये ११००० वृक्ष लागवडीचा संकल्प पूर्ण करून जवळपास १५५ दुर्मिळ वनस्पती कशा विकसित केल्या हे सांगितले त्यामध्ये काठमाठ ,कुरडू ,चिचर्डा, पालकही तेरीची भाजी सगोडा रताळीची भाजी इत्यादी सर्व भाज्या व त्यांचे आहारातील महत्त्व समजावून सांगितले.

यावेळी ह.देचे प्राचार्य दीपा फाटक, पर्यवेक्षक शांतप्पा कुंभार, बी. डी. बनसोडे, पर्यवेक्षक आप्पासाहेब राऊत. माजी पर्यवेक्षक अरुण उपाध्ये, हनुमंत मोतीबने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वीरसेन धनके यांनी केले. यु. डी. चव्हाण यांनी आभार मानले.

# कसबा गणपतीतर्फे यंदा ‘ढोलकपूर नगरी’ देखावा

## विविध धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

कसबा-२४
**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

गणेशोत्सव निमित्त बाळीवेस येथील श्रीमंत मानाचा कसबा गणपती मंडळाच्या ‘श्री’ च्या प्रतिष्ठापना मिरवणुकीचा शुभारंभ बुधवार दि. २७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता चार हुतात्मा पुतळा येथे मनपा आयुक्त सचिन ओम्बासे यांच्या हस्ते ‘श्री’ ची महापूजा होऊन मिरवणूकीस प्रारंभ होणार आहे, अशी माहिती मंडळाच्या उत्सव समितीचे अध्यक्ष बाळासाहेब मुस्तारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापुरातील अग्रगण्य असलेले श्रीमंत मानाचा कसबा गणपती प्रतिवर्षाप्रमाणे विविध धार्मिक, सांस्कृतिक शैक्षणिक क्रीडा क्षेत्रातील कार्यक्रम राबविणार आहे. मंडळाच्या वतीने काढण्यात येणाऱ्या मिरवणूकीत प्रारंभी कसबा ध्वज विविध एकतेचे प्रतिक असणारे पंचरंगी ध्वज, सनई, चौघडा, हलगी, बॅन्ड हलगीच्या तालावर नाचणारा घोडा, सामाजिक प्रबोधनात्मक चित्ररथ, घोडेस्वार, लोकमान्य टिळकची प्रतिमा असलेली बग्गी सजविण्यात आलेले बैल जोडे आदींचा समावेश आहे. नाविन्यपूर्ण मिरवणूकीची परंपरा मंडळाने यंदाही कायम राखली आहे. यंदाच्या मिरवणूकीत प्रतिवर्षाप्रमाणे गणेशोत्सव मिरवणूकीत ४०० युवक कार्यकर्त्यांचे पथक पारंपारिक लेझीमचे खेळ सादर करणार आहेत. त्यामुळे लेझीमचा हा खेळ आकर्षक तथा बहारदार होईल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आले.

गुरूवार,२८ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता कसबा गणपती महिला मंडळाच्यावतीने सामूहिक अथर्वशीर्ष



पठणासाठी मंडळाच्या परिसरातील ५०० महिला उपस्थित राहणार आहे. प्रतिवर्षी प्रमाणे मंडळाचे वतीने मुंबई व पुणे धर्तीवर भव्य व दिव्य आरास देखावा साजरा करण्यात येत आहे. यंदाच्या वर्षी ‘ढोलकपूर नगरी’ सादर करीत आहे.

या देखाव्याचे उद्घाटन शुक्रवार,२९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांच्या हस्ते होणार आहे. तसेच दरवर्षीपमाणे यंदाही शनिवार, ३० ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ यावेळेत भव्य रक्तदान शिबिर आयोजिले आहे.

दररोज सकाळी ७ वाजता नित्यपूजा, रूद्राभिषेक, महापूजा आरती व प्रसाद वाटप, सकाळी ९ पासून भाविकांची पूजा, सायंकाळी ७ वाजता नित्यपूजा, रूद्राभिषेक, महापूजा, भाविकांची पूजा, रात्री ९.३० वाजता उपस्थित भाविकांच्या हस्ते महाआरती व प्रसाद वाटप आदी कार्यक्रम आयोजित केले आहेत.

शनिवार दि. ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्थदिशी निमित्त सकाळी ७ वाजता उत्सव मंडपात विजापूर येथील भाविकांच्या हस्ते पूजनानंतर विसर्जन मिरवणुकीस सुरुवात होईल. गाडीखाना चौक, होटगी मठ, मल्लिकार्जुन मंदिर, बाळीवेस चौक, चाटी गल्ली, सराफ कट्टा, मधला मारूती, माणिक चौक, जुनी फौजदार चावडी, सोन्या मारूती, दत्त चौक, मार्ग गणपती घाट येथे ‘श्री’ चे आगमन होईल. ‘श्री’ पूजनाने प्रतिकात्मक विसर्जनाने उत्सवाचे सांगता होईल. तत्पूर्वी उत्सव मिरवणूकी दरम्यान बाळीवेस चौक, दत्त चौक येथे ‘श्री’ चे सामुहिक आरतीचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमांचा सोलापूरकरांनी लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस मंडळाचे ट्रस्टी बिप्पीन धुम्मा, उत्सव उपाध्यक्ष राहुल बुऱ्हाणपुरे, महेश हदरे, सचिव सिद्धेश्वर आळंद, पुष्कराज मेत्री, शशिकांत बिराजदार, गुरूशांत मोकाशी, केदार हदरे, केदार कुताटे आदी उपस्थित होते.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रभागरचना प्रसिद्ध

### डिसेंबरमध्ये निवडणूक प्रक्रियेची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ता. २३ ऑगस्ट-**

जिल्हा परिषद व पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणूक ग्रामविकास विभागाच्या २० ऑगस्टच्या नव्या नियमानुसार जागांच्या चक्रानुक्रमाने होणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीची अंतिम गट व गण रचना शुक्रवारी प्रसिद्ध झाली. ही प्रभागरचना अंतिम होण्यापूर्वीच ग्रामविकास विभागाने चक्रानुक्रमाची नवी नियमावली आणली आहे. या निवडणुकीसाठी अनुसूचित जाती/जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण महिला आरक्षण कसे काढावे, याबद्दल नियम सांगण्यात आले आहेत. ऑगस्ट अखेरपर्यंत गट व गणांसाठी प्रत्यक्ष आरक्षण सोडत काढली जाईल. सप्टेंबरमध्ये प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया सुरू होईल, अशी शक्यता व्यक्त होत आहे.प्रारूप प्रभागरचनेवर आलेल्या ५ हरकती विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी मान्य केल्याने अंतिम प्रभागरचना जाहीर करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. महापालिका, नगरपरिषदा व जिल्हा परिषदा यामध्ये सर्वात पुढे जिल्हा सर्वात अगोदर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची निवडणूक होईल, अशी शक्यता व्यक्त होत आहे.

# बापूंच्या प्रयत्नांना हवी सोलापूरकरांची साथ

## ● सोलापूरच्या मार्केटिंगसाठी पर्यटन सप्ताहाचे आयोजन ● लोकसहभागानेच सोलापूरचा विकास गतीने शक्य


**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. २३ ऑगस्ट –**

सोलापूर शहर व जिल्ह्यातील ५० ते ५५ लाख सोलापूरकरांच्या सहभागानेच सोलापूरचा विकासास गती मिळेल म्हणून लोकसहभागाचे ब्रीद घेवून सोलापूरच्या मार्केटिंगसाठी तळमळीने प्रयत्न करणारे राज्याचे माजी सहकार मंत्री दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाषबापू देशमुखांच्या तळमळीला आता साथ हवी आहे ती सोलापूरकरांची होय. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि जिल्हा प्रशासन सोलापूरच्या विकासासाठी नक्कीच झटेल पण त्यासाठी अगोदर सोलापूरकरांनी दोन पावले पुढे आले पाहिजे. आपल्या सोलापूरच्या विकासासाठी सोलापूरकर सरसावल्यास नक्कीच सोलापूरचा सर्वांगिण विकास शक्य आहे. जीवघेण्या डॉल्बीच्या विरोधात तमाम सोलापूरकर एकवटल्याने डॉल्बी बंदीच्या मार्गावर आहे. एक दिवस, एक आठवडा सोलापूरकरांनी सोलापूरसाठी देवून पर्यटन सप्ताह यशस्वी करावा. म्हणजे लाखो सोलापूरकरांची ताकद पाहून सरकार आणि प्रशासनदेखील सोलापूरच्या विकासासाठी सरसावेल कारण येत्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत.

आपल्या शेजारी असलेल्या पुणे, कोल्हापूरसह सर्व जिल्ह्यांचा विकास झपाट्याने झाला अन् होत आहे. याला सर्वात मोठे कारण आहे ते म्हणजे त्या गावातील लोक होय. संवेदनशील असलेल्या आणि सहनशीलतेचा अंत कोणालाही पाहू न देणाऱ्या या जिल्ह्यातील लोकांनी आपल्या जिल्ह्याच्या विकासासाठी सरकार, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला जाब विचारला प्रसंगी लोकशाही मार्गाने आंदोलने केली. या जिल्ह्यांच्या विकासाला तेथील लोकांचा सहभाग कारणीभूत ठरलेला आहे. शेजारील सर्व जिल्ह्यांचा विकास झाल्यानंतर आता नेक्स्ट डेस्टिनेशन सोलापूर आहे. पुण्यातील हिजवडीमधील आयटी पार्क पुणे सोडून जाण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे हे आयटी पार्क सोलापूरला आणण्याची मोठी संधी आहे. परंतु यासाठी आवश्यकता आहे ती म्हणजे जनरेट्याची आणि सोलापूरकर यासाठी सरसावतील यात शंका नाही. केवळ आपल्या एका मतदारसंघांचा विचार न करता संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्ह्यातील एका तरी आमदाराने प्रयत्न सुरु केले हीदेखील सोलापूरकरांसाठी आनंदाचीचबाब आहे. आ. सुभाषबापूंच्या प्रयत्नांना साथ देण्यासाठी आता तमाम सोलापूरकरांनी पुढे येणे ही काळाची गरज आहे. येत्या २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित होणाऱ्या सोलापूर पर्यटन सप्हातात प्रत्येक सोलापूरकरांनी सहभाग नोंदवला पाहिजे. सहभाग म्हणजे नेमके काय करायचे आहे तर या पर्यटन सप्हातात प्रत्येक सोलापूरकराने आपले नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रमंडळी यांना घेवून सोलापूर शहर-जिल्ह्यातील कोणत्याही ठिकाणी एक सहल, छोटेसे गेट्टुगेदर काढावे. आपल्या मुलीच्या सासरच्या लोकांना सोलापूरला बोलवावे तर आपल्या सूनेच्या माहेरच्यांना सोलापूरला बोलवावे आणि त्यांना सोलापुरातील एका पर्यटनस्थळी फिरावयास घेवून जावे.




पंढरीचा विठ्ठल, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर या धार्मिक पर्यटनासह अकलूजची अकलाईदेवी, करमाळ्याची कमलाईदेवी, माढ्याची माढेश्वरी, बार्शीचे श्री भगवंत, मंगळवेढ्याचे संत दामाजी पंत, मोहोळ वडवळचे श्री नागनाथ, दक्षिण सोलापूरमधील कुडल-संगम, उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डीची यमाईदेवी, सोलापुरातील श्री रुपाभवनीमाता, हिप्परग्यातील पावणारा श्री मश्रृम गणपती, अक्कलकोटमधील शिवपुरी, गौडगाव मारुती मंदिर आदी अनेक नवसाला पावणाऱ्या देवांची मंदिरे सोलापूर शहर व जिल्ह्यात आहेत. धार्मिक पर्यटनासह सोलापूरकरांनी आपल्या आप्तेष्ठ, नातेवाईक, मित्रांना सोलापूरच्या सुप्रसिध्द खाद्यपदार्थांची चव चाखवावी. सोलापूरची जगप्रसिध्द शेंगाचटणी, कडक भाकरी, लांबोटी चिवडा, कुंदा चहा, निसर्ग हॉटेलचे स्वादिष्ठ भोजन, मांसाहारी खाणाऱ्यांसाठी सोलापूची सुप्रसिध्द शिक-कडई, मटन आचार, ग्रीन मटन आणि सावजी चवीसह सोलापूरच्या काळ्या मसाल्यातील विविध चविष्ठ प्रकारांची चव आपल्या लोकांना चाखवावी. सोलापूरचा प्रसिध्द हुरडा ही तर पर्यटकांसाठी पर्वणीच आहे. दरवर्षी जानेवारी महिन्यातील ग्रामदैवत श्री सिध्देश्वरांची यात्रा व गड्डा मनोरंजन. पंढरपूरच्या चार मोठ्या वाऱ्या. याच बरोबर सोलापूरची जगप्रसिध्द चादर, टॉवेल आणि स्वस्त कपडे खरेदीसाठी पुढाकार सर्वांनी घेतल्यास सोलापूरचा पर्यटन सप्ताह खऱ्या अर्थाने सार्थक होईल.



**प्रशांत माने**
**मो. ९८८११९१४४३**

सोलापूरला प्रिसिजन कॅमशॉप्ट, बालाजी अमाईन्स, लक्ष्मी हायड्रोलिक्स, स्मृती ऑर्गेनिक्स आदीसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्या आहेत ही देखील सोलापूरकरांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. सोलापूरला पर्यटन सप्ताह भरविण्याचा उद्देश हा आ. सुभाष देशमुख यांच्या प्रचारासाठी नाही. तर सोलापूर शहर आणि जिल्ह्याचे माकेटिंग व्हावे, सोलापुरातील सर्व छोट्या, मोठ्या व्यापारी, व्यावसायिक, उद्योगांची आर्थिक उलाढाल वाढावी. उत्तरप्रदेशातील प्रयागराज येथे भरलेल्या महाकुंभ मेळाव्यात ६० ते ७० कोटी लोकांनी सहभाग घेतला आणि देशाची अर्थव्यवस्था मजबूत केली. आता महाराष्ट्रातील नाशिक येथे कुंभमेळा होणार असून याठिकाणी कोट्यवधी लोकांचा सहभाग होवून महाराष्ट्राच्या आर्थिक उलाढालीत भर पडेल. आता सोलापूरकरांनी सोलापूरच्या विकासासाठी आयोजित केलेल्या सोलापूर पर्यटन सप्ताहात सहभाग नोंदवला. सोलापूरच्या बाहेर राहणाऱ्या आपल्या पई-पाहुण्यांना, नातेवाईक-मित्रांना सोलापूरमध्ये निमंत्रित केले तर नक्कीच सोलापूरचा पर्यटन सप्ताह यशस्वी होण्यास वेळ लागणार नाही. सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या विकासाला सोलापूरकरांनीच हातभार लावल्याचा आनंद प्रत्येकाला होईल. सोलापूरच्या शक्तीस्थळांना सोलापूरची ताकत बनविल्यास नक्कीच विकासाला हातभार लागेल. प्रत्येक सोलापूरकरांनी खारुताईचा वाटा म्हणून या पर्यटन सप्ताहात सहभाग नोंदविणे ही काळाची गरज आहे.

आपल्या सोलापूरचे सकारात्मक मार्केटिंग आपणच करू शकतो, कोणी सोलापूरच्या बाहेरचा माणूस सोलापूरचा विचार करणार नाही. तर मातृभूमीची ऋुण फेडू चला तर मग एक दिवस सोलापूरसाठी देवू आणि सोलापूरचा विकास करू. ऐकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ.

### सोलापूर विकासासाठी पालकमंत्री व आमदारांचा सहभाग अत्यावश्यकच

सोलापूरच्या विकासासाठी संपूर्ण सोलापूर शहर व जिल्हा सरसावत असताना सोलापूरचे पालकमंत्री, सर्व आमदार आणि जिल्हा प्रशासनासह स्थानिक प्रशासन, सामाजिक संघटना, विविध शाळा, महाविद्यालये, साखर कारखाने, बँका, महिला बचत गट, मॉर्निंग वॉक ग्रुप, विविध जयंती-उत्सवाची मंडळे यांच्यासह विविध समाजाच्या संघटना आणि व्यावसायिक, व्यापारी, उद्योजक यांनी सोलापूर पर्यटन सप्ताहात सहभाग नोंदविल्यास सोलापूरच्या विकासाला तर हातभारच लागेल आणि सोलापूरला विकासापासून कोणी रोखू शकणार नाहीत. सातारच्या विकासासाठी थेट पंतप्रधान मोदींना भेटणारे सोलापूरचे पालकमंत्री सोलापूरच्या विकासासाठीदेखील भविष्यात पंतप्रधानांना भेटतील यात शंका नाही.

## ▸▸ महत्वाचे...

### झोपेतील व्यक्तीचा उपचारापूर्वी मृत्यू

**सोलापूर दि २३ ऑगस्ट-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील कुमठे येथील सिध्दार्थ नगरात राहणारे रत्नाकर विष्णु लालसरे (वय ४४) यांचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. ते शुक्रवारी रात्री झोपी गेले होते.सिध्दार्थ नगरातील राहत्या घरात रत्नाकर हे शुक्रवारी रात्री नेहमीप्रमणे झोपी गेले होते. सकाळी सहाच्या सुमारास घरातील लोकांनी त्यांना उठविण्याचा प्रयत्न केला. परंतु ते प्रतिसाद देत नसल्याने त्यांना बेशुध्द अवस्थेत भाऊ शिवाजी लालसरे यांनी उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### कुत्रा आडवा आल्याने; तरुण जखमी

**सोलापूर दि २३ ऑगस्ट-**

ग्रामीण पोलीस पेट्रोल पंपाच्या वळणावर कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून झालेल्या अपघातात तरुण जखमी झाला. हा प्रकार शुक्रवारी रात्री ८.४५ च्या सुमारास घडला. लखन मोहनसिंग बलराम वाले (वय ३५, रा.बेडरपूल) असे जखमी तरुणाचे नाव आहे. शुक्रवात्री ८.४५ च्या सुमारास लखन हा दुचाकी चालवित ग्रामीण पोलीस पेट्रोल पंपाच्या समोरील रस्त्यावरून जात होता. त्यावेळी अचानक दुचाकीच्या आडवा कुत्रा आल्याने दुचाकी घसरून लखन खाली पडला. यात त्याच्या डाव्या पायाला जखम झाली. तसेच डोक्याला मार लागल्याने रामसिंग याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### सायकल घसरून पडल्याने आठ वर्षाचे बालक जखमी

**सोलापूर दि २३ ऑगस्ट-**

राहत्या घरासमोर सायकल घसरून झालेल्या अपघातात आठ वर्षाचा बालक जखमी झाला. हा प्रकार शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास शिवगंगा नगर भाग पाच येथे घडला. मानव सुरेश चलवादी (वय ८, रा. शिवगंगा नगर) असे बालकाचे नाव आहे. शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास मानव हा त्याच्या राहत्या घरासमोर सायंकल खेळत होता. त्यावेळी अचानक सायकल घसरल्याने मानव खाली पडला. यात त्याच्या पोटाला मुकामार लागल्याने रात्री ७.५० वाजता अक्षय पुकाळे याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## कंपनीला ५८ लाखांचा गंडा घालणारा पाच महिन्यांनी अटकेत

### ▸▸ २५ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी, आर्थिक गुन्हे शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

कर सल्लागार कंपनीस ५८ लाख ११ हजार रुपयांचा गंडा घालणाऱ्या कंपनीतील क्लार्कला पोलिसांनी अटक केली. लक्ष्मण भीमाशंकर कोनाळे (वय ३६, रा. मल्लिकार्जुन नगर, अक्कलकोट रोड) असे त्याचे नाव असून तो ५ महिन्यांपासून बेपत्ता होता. आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ही कामगिरी केली.

त्याला न्यायालयापुढे उभे केले असता २५ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी मिळाली. कोनाळे याच्याविरुद्ध २२ मार्च २०२५ रोजी गुन्हा दाखल झाला होता. याविषयी नंदकिशोर रामनिवासजी काबरा (६२, रा. बुधवार पेठ) यांनी फिर्याद दिली. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. लक्ष्मण कोनाळे हा एन. आर. काबरा ॲन्ड कंपनीत कामास होता. त्याने कंपनीच्या नावाने बनावट शॉपॲक्ट लायसन्स काढले. त्याचा वापर करून, तसेच काबरा यांच्या कार्यालयातील शिक्का व लेटर पॅडचा वापर करून बँकेत एन. आर. काबरा ॲन्ड कंपनीच्या नावाने खाते काढले. ग्राहकांनी फी पोटी दिलेले धनादेश त्यावर जमा करून आणि इतर रकमा स्वीकारत कंपनीची ५८ लाख ११ हजार ४२ हजार रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार आहे. नंदकिशोर काबरा यांनी २२ मार्च रोजी फिर्याद दिली होती. फसवणुकीची रक्कम ५० लाखापेक्षा जास्त असल्याने गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला होता. सहाय्यक पोलिस निरीक्षक नितीन पेटकर यांनी कोनाळे यांना अटक केली.

## चॉपर गळ्याला लावून मागितली खंडणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि २३ ऑगस्ट-**

लोखंडी धारदार चॉपर गळ्याला लावून परमिट रूम चालकाला तर महा १०००० रुपयाची खंडणी मागणाऱ्या विरुद्ध फौजदार चवळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे अशाच प्रकारचा गुन्हा यापूर्वीही याच परमिट रूम चालकाने दाखल केला होता.

याबाबत विनोद विजय मोटे वय ३६ राहणार गोल्डफिंचपेट चौपाड सोलापूर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुरज उर्फ नागेश शिवाजी महानोर राहणार सोलापूर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे मोठे यांनी यापूर्वी महानोर विरुद्ध अशाच प्रकारचा गुन्हा दाखल केलेला आहे विनोद मोठे हे रत्न बार अँड रेस्टॉरंट हे चालवतात २० ऑगस्ट रोजी कल्पना कॉर्नर ते निराळे वस्ती रोडवर दुचाकीवरून जात असताना विनोद मोठे यांच्या समोर जुना बर्फ कारखाना येथे नागेश महानोर हा आला महानोर याने या एरियात तुला धंदा करायचा आहे का



नाही चुपचाप दर महिन्याला दहा हजार रुपये हप्ता वेळच्या वेळी जमा करायचा आता पटकन पाच हजार रुपये काढ आणि मला दे जास्त नाटक करायचे नाही असे म्हणून महानोर याने त्याच्या कमरेला लपविलेला लोखंडी धारदार चॉपर काढला आणि मोठे याच्या गळ्याला लावला. महानोर याच्या विरुद्ध दिलेली केस मागे घे आणि दरमहा दहा हजार रुपये हप्ता दिला नाही तर तुला ठार मारीन अशी धमकी दिली म्हणून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलीस उपनिरीक्षक पाटोळे पुढील तपास करीत आहेत.

## बप्पा निघाले रेल्वेने...



**डॉल्बी बंदीचा परिणाम....**

सोलापूर : सर्व गणेश मंडळांनी मिरवणुकीत डॉल्बी न वाजविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मंडळाचे कार्यकर्ते पारंपारिक वाद्य खरेदी करताना दिसत आहेत. (छायाचित्र : केवल तिवारी)

## तुझ्या हिश्याची शेती घे म्हणून विवाहितेचा छळ; चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

आई-वडिलां कडील तुझ्या हिश्याची शेती घे म्हणून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रीती बौद्ध राज ढेपे वय २५ राहणार घुमटे वस्ती जुना तुळजापूर नाका सोलापूर या विवाहितेच्या फिर्यादीवरून पती बौद्ध राज सासू शालन सासरे रमेश दीर मेघराज सर्व राहणार गोमटे वस्ती सोलापूर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे १० मे २०१८ ते १८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत प्रीती या पती बौद्धराज याचा सोबत सासरी नांदत होत्या त्यावेळी पती व त्याच्या घरातील लोकांनी मिळून प्रीती हिस घरातील किरकोळ कारणावरून तसेच नवीन घर बांधण्यासाठी माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये म्हणून शिवीगाळ करून मारहाण केली तसेच तुझ्या आई-वडिलांच्या शेतीवरचा हक्क का सोडला तुझ्या हिश्याची शेती तू घे असे म्हणून प्रीतीचा जात करून शारीरिक व मानसिक तसेच आर्थिक छळ केला म्हणून जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार दुधाळे तपास करीत आहेत.

## विहिंपतर्फे कारसेवकांचा जगद्गुरूंच्या हस्ते गौरव

### ● समान नागरी कायदा गरजेचा असल्याचे केले प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

राममंदीर उभारणीत कारसेवकांचे कार्य अजरामर आहे. देशात विश्व हिंदू परिषद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ समाज जागरणाचे काम करतात. त्यांच्या कार्यात संपूर्ण समाजाने जोडून घ्यायला हवे. राष्ट्रगीताचा अर्थ कधी विद्यार्थ्यांना सांगितला गेला का? भारत भाग्य विधाता कोण, अधिनायक कोण? हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिले पाहिजे. आपल्या घटनेत धर्मनिरपेक्ष ऐवजी हिंदूराष्ट्र गरजेचे होते. विविधतेत एकता हे योग्य आहे. पण धर्मानुसार कायदे वेगळे नकोत. समान नागरी कायद्याची आवश्यकता आहे. तरच हिंदूची संख्या अबाधित राहील. धर्मनिरपेक्षतेमुळे देशाचे विभाजन झाले, ते संकट अजूनही संपलेले नाही. सतर्क राहण्याचे आवाहन श्री श्री श्री १००८ काशीपीठ जगद्गुरू ज्ञानसिंहासनाधिश्वर डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले.



सोलापूर येथील होटगी मठात विश्व हिंदू परिषदेच्यावतीने रामजन्मभूमीसाठी कारसेवा केलेल्या रामभक्तांचा सन्मान गौरव सोहळा त्यांच्या हस्ते झाला. यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, 'शांतीमंत्रासोबत क्रांतीही हवी. ती सांगितली पाहिजे. केवळ शांती नको, राष्ट्र वाचवण्यासाठी क्रांती करावीच लागेल. क्रांती म्हणजे एकजूट,शिस्त असा त्याचा अर्थ आहे. केवळ शांतीमंत्र जपलो तर पुन्हा देश संकटात येईल. तिथे क्रांती करण्यासाठी हिंदू समाजाची पुढची पिढी सज्ज असली पाहिजे.' यावेळी विहिंप जिल्हाध्यक्ष हभप अभिमन्यू डोंगरे महाराज, अ.भा. वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकर इंगळे महाराज, तालुका संघचालक रवी जोशी, चंद्रकांत गडेकर, बृहन्मठ होटगी मठाचे मुख्य सचिव शांतय्या स्वामी, मल्लिनाथ पाटील, राजेंद्र गंगदे, श्याम जोशी, पुरुषोत्तम उडता, जयदेव सुरवसे, बाबू गिरगल, विष्णू जगताप, चंद्रकांत कुलकर्णी, सिद्राम चरकुपल्ली, अविनाश माने, अमित सारोळकर, महेश भंडारी, महेश हेले, राजेश यनगंटी, संजीव चिप्पा, अक्षय कनकुंटला, बालाजी रजपूत, रवी बोल्ली, राजेंद्र सैनी, नंदीनी अक्कल, श्रेया चव्हाण, लक्ष्मी चरकूपल्ली, वैष्णवी पवार, स्वाती बोल्ली, वंदना बोल्ली, सिध्देश्वर गोकावी, चन्नबसव सोलापुरे, ऋषी भुजबळ, दीपक ढगे, श्रीधर झांबरे, समाधान ताटे, किसन कापसे, कुमार हिरेमठ आदीसह विहिंप, बजरंग दलाचे कार्यकर्ते उपस्थित होते. रामजन्मूभी आंदोलनात तीन वेळा कारसेवा झाली. यात सहभागी कारसेवकांचा तसेच विहिंपचे पूर्व जिल्हामंत्री, सहमंत्री तसेच संयोजक यांचा सन्मान काशीपीठाचे जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य महास्वामीजी यांच्या हस्ते करण्यात आला. जिल्हामंत्री संजयकुमार जमादार प्रास्ताविक केले. विहिंप विभाग सहमंत्री व पत्रकार विजयकुमार पिसे यांनी संघ शताब्दी आणि विहिंप एकसष्ठी असा योग यावर्षी असल्याचे सांगितले. यावेळी अक्कलकोट तालुका संघचालक रवी जोशी, हभप इंगळे महाराज यांनी कारसेवेतील प्रसंग, अनुभव सांगितले. प्रवीण जिल्ला यांनी सूत्रसंचालन केले. सहमंत्री बापूसाहेब कदम यांनी आभार मानले.

# अवतार आणि भक्तियोगाचे तत्त्वज्ञान : हभप. डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २३ ऑगस्ट**

भक्तियोगाची स्थापना करण्यासाठीच भगवंताचा अवतार होतो. निर्गुण ब्रह्म जेव्हा सगुण रूप धारण करते, तेव्हाच त्याला अवतार म्हणतात. जे तत्त्व इंद्रियागोचर नव्हते, ते इंद्रियांना जाणवणारे होते; जे अदृश्य होते ते नाव-रूप धारण करून दृश्यरूपात प्रकट झाले. हाच अवताराचा खरा अर्थ होय. श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी ''श्रीमद्भागवत कथा चिंतन'' या विषयावर निरुपण करताना भगवंत मंदिरात या तत्त्वाचा सुंदर उलगडा केला. महाराज पुढे बोलतात, भक्ती म्हणजे काय? तर भगवंतावर केलेले निष्काम प्रेम म्हणजेच खरी भक्ती. या भक्तीची तीन मुख्य वैशिष्ट्ये आहेत. अनन्य ममता, अविच्छिन्न तन्मयता आणि आनंदरुपता होत.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - २९

अनन्य ममता म्हणजे भगवंताशिवाय अन्य कुठेही आसक्ती न राहणे.

अविच्छिन्न तन्मयता म्हणजे सतत भगवंताच्या चिंतनात मन गुंतवून ठेवणे.

आनंदरुपता म्हणजे भक्ती करताना अंत:करण आनंदमय होणे.

एखादी आई आपल्या लेकराला विसरत नाही; झोपेतही तिला लेकराचं भान असतं. त्याचप्रमाणे, जो भक्त भगवंताच्या स्मरणात रमतो, त्याच्या प्रत्येक श्वासात भगवंत असतात. हीच खरी अनन्यता होय.

डॉ.जयवंत महाराज पुढे विशद करतात की, अवतार म्हणजे काय? तर भगवान भक्तांच्या प्रेमाखातर स्वतःला सामान्य करतात, पृथ्वीवर उतरतात आणि भक्तांच्या नित्य संगतीस येतात. अवतार म्हणजे भक्तांच्या आर्त हाकेला दिलेला भगवंताचा प्रतिसाद आहे. तथापि, या तत्त्वज्ञानाबाबत काही आक्षेपही पुढे येतात

१) भगवान सर्वशक्तिमान आहेत, मग अवतार धारण करण्याची आवश्यकता तरी काय?

२) परमात्मा सर्वव्यापक असताना, अवतार धारण केला म्हणजे तो एका ठिकाणी राहून दुसरीकडे नाही, असे होत नाही काय?

३) अवतार सामान्य माणसासारखा कर्मांच्या अधीन असतो का?

या प्रश्नांचा सखोल विचार उद्या करावयाचा आहे, असे सांगून महाराजांनी श्रोत्यांना विचारमंथनासाठी प्रवृत्त केले.

अवताराची ही संकल्पना समजावून घेणे म्हणजे भक्तियोगाचे मूळ तत्त्व समजणे होय. कारण, भगवंताचा अवतार हा फक्त चमत्कारासाठी नसतो, तर भक्तांना योग्य मार्गदर्शन देण्यासाठी, धर्मसंस्थापनेसाठी आणि ❋भक्तियोग दृढ करण्यासाठी असतो.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - चांगला दिवस, क्रांतीवीर राजगुरु जयंती |
| दि. २४ ऑगस्ट २०२५ | |
| विक्रम संवत् २०८२ | |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - भाद्रपद | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. प्रतिपदा (११.४८) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पू. फाल्गुनी (२६.०५) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शिव (१२.२८) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (२४.०६) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

# मार्कंडेय हॉस्पिटलजवळील वीस हजार रुपयांचे पाईप चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

कुंची कोरवी गल्लीतील मार्कंडेय हॉस्पिटल जवळील वीस हजार रुपये किमतीचे लोखंडी पाईप चोरट्याने चोरून नेले.

याबाबत अभिषेक राजू कलागते (वय २९, रा. न्यू पाश्चापेठ अशोक चौक) याच्या फिर्यादीवरून जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० ऑगस्ट ते २१ ऑगस्टच्या रात्री चोरट्याने मार्कंडेय हॉस्पिटल जवळील रस्त्याच्या बाजूला असलेले वीस हजार रुपये किमतीचे १७ फूट लांबीचे लोखंडी दोन पाईप चोरून नेली म्हणून वेल रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहे.



# श्री चौडेश्वरी तोगटवीर पतसंस्थेची प्रगती कौतुकास्पद : आ. देवेंद्र कोठे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

सध्या आर्थिक संस्था चालविणे अवघड झाली आहे, अश्या प्रतिकूल परस्थितीत श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्थेची प्रगती कौतुकास्पद असून चेअरमन, व्हा. चेअरमन व सर्व संचालक मंडळ अभिनंदनास पात्र आहेत, असे प्रतिपादन मा. आमदार देवेंद्र कोठे यांनी केले.

पतसंस्थेच्या मल्लिकार्जुन नगर शाखेच्या नूतन वास्तुच्या उद्घाटनप्रसंगी आ. कोठे बोलत होते. याप्रसंगी तोगटवीर समाज अध्यक्ष नागनाथ कोंतम, चेअरमन विठ्ठल बडगंची, व्हा. चेअरमन चंद्रकांत रंगम या भागातील म ाजी नगरसेवक राजकुमार हंचाटे संचालक अरुण चिंता, लक्ष्म ीकांत उदगिरी, अरविंद पुडूर, नरेंद्र बत्तुल, मल्लिकार्जुन खंडे, विलास बडगंची, विष्णु म्याकल, अजय रंगम, विजयकुमार शिंपी, अंबादास कंदीकोंडा, संचालिका उमा पुडूर, अंबिका उदगिरी व तसेच नागेश सरगम, अक्षय अंजिखाने व व्यवस्थापक राजेंद्र उदगीरी यांची उपस्थित होते.

# नाट्य परिषद करंडक प्राथमिक फेरीला दमदार सुरुवात

## नाट्य परिषदेचा अभूतपूर्व उपक्रम : प्रकाश यलगुलवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती शाखा मुंबई यांच्या वतीने ''नाट्य परिषद करंडक २०२५''या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीची सोलापूर केंद्रावर दमदार सुरुवात झाली. कार्यक्रम ाचे उद्घाटक व नाट्य परिषद सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांनी नाट्य परिषदेचा हा उपक्रम अत्यंत अभूतपूर्व असून, नाट्य विषयक चळवळ तरुणांपर्यंत पोहोचली आणि रुजली पाहिजे यासाठी परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांच्या कल्पक नेतृत्वातून होत असलेल्या उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले.महाराष्ट्रातून या स्पर्धे ला भरघोस प्रतिसाद मिळालेला असून राज्यातून सर्व केंद्र मिळून एकूण २५२ संघांनी या एकांकिका स्पर्धेत सहभाग नोंदविलेला आहे अशी माहिती देत राज्य पातळीवर होत असलेल्या या स्पर्धेतून नाट्यसृष्टीस निश्चितच नवोदित कलावंत,तंत्रज्ञ,दिग्दर्शक मिळतील असा आशावादही प्रकाश यलगुलवार यांनी याप्रसंगी व्यक्त केला.



**सोलापूर : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई आयोजित नाट्यपरिषद करंडक उत्सव रंगभूमीचा सोलापूर केंद्र प्राथमिक फेरीतील थिएटरकर सोलापूर संघ 'खिच्या' या नाटकातील दृश्य.**

याप्रसंगी व्यासपीठावर शाखेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, जयप्रकाश कुलकर्णी, नाट्यपरिषद मुंबई शाखेच्या कार्यकारिणीचे सदस्य व सोलापूर उपनगरीय शाखेचे अध्यक्ष विजयकुमार साळुंखे, मध्यवर्ती कार्यकारिणीचे सहकार्यवाह दिलीप कोरके, नियामक मंडळ सदस्य तेजस्विनी कदम, महानगर शाखेचे अध्यक्ष प्रा.डॉ.अजय दासरी, बालरंगभूमी परिषद जिल्हा शाखा सोलापूरचे अध्यक्ष सीमा श्रीगोंदेकर-यलगुलवार, नाट्य परिषद नियामक मंडळ सदस्य सुमित फुलमामडी, मंगळवेढा शाखेचे प्रमुख कार्यवाह यतीराज वाकळे व स्पर्धेचे परीक्षक विश्वास धुमाळ (मुंबई), प्रताप सोनाळे (सांगली) हे उपस्थित होते.

प्रायोगिक रंगभूमी परिषदेचे सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष जयप्रकाश कुलकर्णी यांनी नाट्य चळवळीचे विविध प्रवाह कार्यान्वित आहेत, पण सर्वांचा उद्देश एकच आहे, तो म्हणजे यातून नवोदित कलावंत घडला पाहिजे आणि यासाठी नाट्य परिषद घेत असलेल्या या स्पर्धेचे त्यांनी स्वागत केले.

याप्रसंगी नाट्य परिषद मध्यवर्ती शाखा मुंबईचे कार्यकारणी सदस्य व सोलापूर उपनगरीय शाखेचे अध्यक्ष विजय साळुंखे या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धांच्या आयोजनाम ागे नवोदित कलावंतांना रंगमंच उपलब्ध करून देणे व त्यांना योग्य प्रोत्साहन देणे हा असून त्यासाठी नाट्य परिषद कटिबद्ध असल्याचे सांगितले.

प्राथमिक फेरीसाठी सोलापूर जिल्ह्यातून एकूण १४ संघांनी सहभाग नोंदवला आहे. आज ''प्रेम की यातना'' , ''खिच्याक'' ''चफी'' ''बेगम'' ''जाहला सोहळा अनुपम'' तसेच सोहम थिएटर, हैदराबाद- या संस्थेची''काय झालं, बाळ रडत होतं?'' ही एकांकिका सादर झाली. या प्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद सोलापूर स्पर्धेचे समन्वयक प्रा.जोतिबा काटे, इम्तियाज मालदार, संजय सावंत नाट्य परिषदेचे जेष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी, ज्येष्ठ रंगकर्मी व्यंकटेश रंगम,ज्येष्ठ रंगकर्मी राजाराजेशचंद्र, ज्येष्ठ रंगकर्मी राजेश जाधव, आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अखिल भारतीय नाट्य परिषद सोलापूर शाखेचे प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे यांनी केले. केंद्रप्रमुख सुमित फुलमामडी यांनी आभार मानले.

# मनाचे मालक बना

**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट -**

प्रसन्न मन आणि समाधानी वृत्ती ज्याच्याजवळ आहे त्याच्याजवळ जणू खजिना असतो.जो मनाला जिंकू शकतो विवेकी, विचारी,स्थिर,शांत संतुलित ठेवू शकतो तो जणू जगाला जिंकू शकतो.मनाला लगाम,अंकुश म्हणजेच मनावर ताबा ठेवणे. मनावर ताबा ठेवणे म्हणजेच विकास आणि प्रगती.आज आपले मन हे मालक आणि आत्मा नोकर बनलेले आहे. म नाचे मालक बना गुलाम नको असे प्रतिपादन स्वाध्यायी तृप्ती रांका (बेंगलोर)यांनी केले. बलिदान चौक येथील जैन स्थानकात जैन श्वेतांबर स्थानकवासी संघातर्फे पर्युषण महापर्वीनिमित्त आयोजित प्रवचनात त्या बोलत होत्या.



पर्युषण महापर्व विशेष

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या,आयुष्यात संगतीला फार महत्त्व असते.संगतीचा परिणाम नकळत होत असतो. संतसंगती लाभणे ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. ती पूर्व पुण्याईमुळेच लाभते. जीवनात जी काही कर्मे बांधली जातात अथवा व्यक्तीला जे काही दुःख भोगावे लागते ते केवळ मनामुळेच.आपले मन हे खरे तर आपले नोकर,चौकीदार आहे परंतु आपल्या स्वभावामुळे मन हे आपले मालक बनलेले आहे आणि आत्म्याला त्याने नोकर बनवले आहे.आपले मन जे सांगेल तेच आपण करतो.याचाच अर्थ मनाची मनमानी सुरू आहे. आपले मन हे माकडाप्रमाणे अथवा बेलगाम घोड्याप्रमाणे बनले आहे. मनाला बंधनात ठेवणे आवश्यक असते.

जन्म व मरण आपल्या हातात नसले तरी या जीवन मरणा मधला प्रवास आपल्या हाती असतो.या बी म्हणजे बर्थ आणि डी म्हणजे डेथ या बी आणि डी च्या मध्ये सी म्हणजे चॉईस असतो.मनाच्या समाधानासाठी आपण काय करू शकतो यावर विचार करा. जी गोष्ट आपल्याला प्राप्त होणार नाही अशाच गोष्टी मनाला हव्या असतात. अगदी कवडीमोल वस्तूंमध्ये मन अडकलेले असते.आपले मन हे आपल्याला दिसत नसले तरी खूप शक्तिशाली आहे. मनात सदैव सकारात्मक विचार करा,नकारात्मकता आणू नका.जर मन नकारात्मक बनले तर त्याच गोष्टी आपल्याला परत मिळतात. कान, तोंड, डोळे बंद करून जगण्यापेक्षा चांगले पहा,चांगले बोला,चांगले ऐका आणि उत्तम विचार करा.जी व्यक्ती स्वतः दुःखी असते ती इतरांना सुख कसे देणार. एखाद्या व्यक्तीच्या निधनानंतर आपण त्याच्या आत्म्याला शांती लाभो अशी प्रार्थना करतो. या मागचे कारण म्हणजे ती व्यक्ती जीवनभर अशांत असते.सदैव व्यक्ती आपल्या परिवारासाठी, समाजासाठी धडपडत असतो. अशा स्थितीत त्याचे मन अशांत असते म्हणून निधनानंतर मृत व्यक्तीच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून आपण प्रार्थना करत असतो.

# पूर्व विभाग मध्यवर्ती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ प्रेसिडेंटपदी केंजरला, अध्यक्षपदी नंदाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

पूर्व विभाग मध्यवर्ती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या प्रेसिडेंटपदी विनोद केंजरला, अध्यक्षपदी लोकेश नंदाल तर सचिवपदी विजय निली यांची निवड करण्यात आली आहे.

यंदाच्या गणेशोत्सवसाठी नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी मंडळाची बैठक ट्रस्टी जनार्दन कारमपुरी, पांडुरंग दिड्डी, रामचंद्र जन्नु, अजय दासरी, विजयकुमार गुल्लापल्ली, विष्णु कारमपुरी, अंजनकुमार देविदास, व्यंकटेश आकेन यांच्या प्रमुख उपस्थितीत नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.


विनोद केंजरला


लोकेश नंदाल


प्रशांत कुडक्याल


विजय निली

**अन्य नूतन पदाधिकारी असे**

कार्याध्यक्ष : प्रशांत कुडक्याल, सांस्कृतिक प्रमुख : माधवी अंदे, उपाध्यक्ष : शुभम एक्कलदेवी, श्रीनिवास आडम, निलेश चिलवेरी, श्रीनिवास पेंटा, संतोष क्यातम, श्रीकांत जिल्ला, वैशाली आडकी, विद्या यल्ला, हरिप्रसाद चरकुपल्ली, मुकेश बत्तुल, सहसचिव : अविनाश मंगलपल्ली, श्रीनिवास बुधारम, गोपाळ पोला, कृष्णा बुर्ला, सुरेश यल्लाराम, ललिता सिंगम, राजश्री वडनाल, खजिनदार : मनोज पिस्के, सहखजिनदार : अनिल जक्कन, राहुल दोंतुल, मिरवणूकप्रमुख : राजदत्त गुंजाळ, बाळकृष्ण रच्चा, प्रसिद्धीप्रमुख : गिरीष गोसकी, वंशीकृष्ण माचर्ला, स्वयंसेवक प्रमुख : गोविंद कोंकत्ती, गणेश क्यामा, कार्यालय प्रमुख नरेंद्र बोम्मेन, पुरोहित अरविंद जिल्ला.

# पांढरे वस्ती येथे महिलेला मारहाण करणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

शहरातील जुना कारंबा रोडवरील पांढरे वस्ती येथे महिलेला मारहाण करणाऱ्या विरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत गणेश संजय देडे (रा. पांढरे वस्ती) यांच्या फिर्यादीवरून प्रथमेश उर्फ सोन्या खाडे राहणार पांढरे वस्ती याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास गणेश देडे यांचे भाऊजी समाधान रणदिवे यांच्या घरासमोर जाऊन देढे यांची आई व बहीण सुप्रिया असे प्रथमेश यास समाधान यांना का मारहाण केली याबाबत विचारणा करण्यास गेले होते. त्यावेळी प्रथमेश खाडे याने त्यांना शिवीगाळ करून हाताने चापट मारून ढकलून देऊन गणेश देडे यास खाली पाडून काठीने मारहाण केली. यावेळी बहीण सुप्रिया ही वाचविण्यासाठी आली असता खाडे याने तिलाही मारहाण केली म्हणून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार ढोबळे पुढील तपास करीत आहेत.

# १ हजार ६१८ पदांसाठी एमपीएससीची भरती प्रक्रिया

**▶▶ २५ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्यास मुदत**

**▶▶ २१ सप्टेंबरला मुख्य परीक्षा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

लोकसेवा आयोगातर्फे गट क सेवा मुख्य परीक्षेची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार मुख्य परीक्षा २१ सप्टेंबर रोजी होणार असून, या परीक्षेसाठी पात्र उमेदवारांना येत्या सोमवार २५ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येणार आहे. एमपीएससीतर्फे गट क सेवेंतर्गत उद्योग निरीक्षक ३९ पदे, तांत्रिक सहायक ९ पदे, कर सहायक ४८२ पदे, लिपिक-टंकलेखक १७पदे आदी १,६१८ पदांच्या भरतीची प्रक्रिया राबवण्यात येत आहे.

एमपीएससीने १ जून रोजी घेतलेल्या पूर्वपरीक्षेचा निकाल नुकताच जाहीर केला. त्यात २६ हजार ७४० उमेदवार पात्र ठरले. पात्र उमेदवारांसाठी मुख्य परीक्षा अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक, नवी मुंबई, पुणे जिल्हा केंद्रांवर २१ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी उमेदवारांना ऑनलाइन अर्ज आणि शुल्क २५ ऑगस्टपर्यंत भरता येणार आहे.

उमेदवारांना गट क सेवेतील मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या संवर्गासाठी पर्याय, तसेच लिपिक-टंकलेखक संवर्गासाठी नियुक्ती प्राधिकारीनिहाय पसंतीक्रम नमूद करून अर्ज आणि शुल्क भरावे लागेल. शासनाच्या संबंधित विभागाच्या पदसंख्या आणि आरक्षणामध्ये सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. संबंधित संवर्ग, पदांचे सामाजिक-समांतर आरक्षण मागणीनुसार आहे.

# दोन महिन्यात लाळ खुरकूत लसीकरण करा

## पशूंच्या बचावासाठी दीड कोटीपेक्षा अधिक लसींचे होणार वितरण

### पशूसंवर्धन आयुक्तांचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

पावसाळा आणि हिवाळ्यात जनावरांना लाळ खुरकूतचा प्रार्दुभाव मोठ्या प्रमाणात होत असतो. त्यामुळे शासनाने कडक पाऊले उचलत एक कोटी ५९ लाख लाळ खुरकूत लसीचे वितरण करण्याची तयारी सुरू केली आहे. तसेच ते लसीकरण दोन महिन्यात पूर्ण करण्याचे आदेश पशुसंवर्धन विभागाने दिले आहे.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात लाळ खुरकूत लसीकरणाची लस सध्या शिल्लक आहे. त्या लसीतून लसीकरणास सुरुवात करण्याच्या सूचना पशसंवर्धन आयुक्तांनी दिले आहे. त्याम ुळे १४ ऑगस्टपासून लाळ खुरकूत लसीकरण सुरू आहे, तसेच येत्या चार ते पाच दिवसात राज्यात एक कोटी ५९ लाख लाळ खुरकुतचे लसीचे वितरण केले जाणार आहे.

दरम्यान, जनावरांमध्ये पावसाळा, हिवाळ्यात लाळ खुरकूत आजारांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत असते. रोगाच्या प्रतिबंधासाठी राज्य सरकारने उपाय योजना सुरू केल्या असून, दीड कोटी पेक्षा जास्त लस उपलब्ध करून दिली आहे. त्याचे जिल्हानिहाय वितरण येत्या काही दिवसात होणार आहे. राज्यातील साखर कारखान्यांच्या हंगामांना सुरुवात झाल्यानंतर जनावरांची राज्य, जिल्हा, तालुकास्तरावर मोठी वाहतूक होत असते. रोगग्रस्त भागातील जनावरे दुसऱ्या भागात गेल्यामुळे तेथील जनावरांना याचा प्रार्दुभाव होऊ नये, यासाठी विविध पशुसंवर्धन विभागाकडून जनावरांना विविध लसीकरण केले जाते.

**प्रत्येक पशूसंवर्धन दवाखान्यातून लसीकरण सुरू**

पावसाळा व हिवाळ्यात जनावरांमध्ये लाळ खुरकूतचे प्रादुर्भाव अधिक असते. जनावरांना लाळ खुरकूतपासून बचाव करण्यासाठी शासनाने लसीकरण मोहीम सुरू केली आहे. त्यानुसार प्रत्येक पशूसंवर्धन दवाखान्यातून लसीकरण सुरू करण्यात येत आहे.

**- रणजित जाधवर, पशूसंवर्धन अधिकारी, दक्षिण सोलापूर.**



**लाळ खुरकूत आजाराची लक्षणे**

जनावरांच्या तोंड, जीभ, हिरडा किंवा ओठांवर पाण्याचे फोड येणे, तोंडातून जास्त प्रमाणात लाळ गळणे, खुरांमध्ये फोड येणे, पाय सुजणे, चालताना लंगडणे, पायाच्या मुळाशी जखमा होणे, चारा न खाणे, दूधात अचानक घट होणे, अशी अनेक लक्षणे लाळ खुरकूत रोगाची आहेत.

# सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या पर्यावरण पूरक गणेश मूर्ती शिबिरास प्रतिसाद

## ऑर्किड स्कूल मधील दीडशे विद्यार्थ्यांनी घडवल्या पर्यावरण पूरक गणेश मूर्त्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळ आणि नागेश करजगी ऑर्किड स्कूल यांच्या संयुक्त विद्यमानाने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत दीडशे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत अप्रतिम गणेशाच्या पर्यावरण पूरक मुर्त्या बनवल्या.



सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाच्या या प्रशिक्षण शिबिरामध्ये दीडशे विद्यार्थ्यांनी सुबक आणि पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण घेतले. गणेश मूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण घेतलेल्या मुलांनी यापुढील काळात पर्यावरण पूरक गणेश मूर्ती घरी बनवूनच स्थापना करण्याचा संकल्प देखील यावेळी घेतली.

पर्यावरण पूरक साहित्य वापरून सुबक गणेश मूर्ती बनवण्याचं प्रशिक्षण कॅस्पर अकॅडमीच्या अर्चना बरडे, शितल बाबर, विनायक घाडगे, शैलेश तुडगुडे यांनी दिले. हे प्रशिक्षण पहिली ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना देण्यात आले. निरागस हात बुद्धीची देवता गणेश मूर्ती घडवताना बघून पालक आणि शिक्षक भरवून गेले. पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनवणाऱ्या चिम ुकल्यांनी पर्यावरण पूरक गणेशाच्या मूर्तीचेच यावर्षी घरात आगमन करा असं आग्रहाचे निवेदन सोलापूरकरांना केली आहे.

पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनवण्याच्या या कार्यशाळेस ऑर्किड स्कूलचे चेअरमन कुमार करजगी , सेक्रेटरी वर्षा विभूते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, मुख्याध्यापिका रूपाली हजारे, म ीना पारखे, यांची प्रमुख उपस्थिती होती. सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाचे उत्सव अध्यक्ष सोमनाथ मेंडके, विजय पुकाळे, हेमा चिंचोळकर, गौरव जक्कापुरे, आकाश हरकूड आदींसह उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### पिलीव येथे शिवनेरी दहिहंडी उत्साहात शिवराज पुकळे युवाशक्तीचे आयोजन

**पिलीव दि २३ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील शिवराज पुकळे आयोजित शिवनेरी दहिहंडी मानाचा दहिहंडी उत्सव उत्साहात संपन्न झाला. सात वर्षापासून ही परंपरा शिवराज पुकळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. प्रत्येक वर्षी या दहिहंडीतुन सामाजिक संदेश दिला जातो. गेल्या वर्षी महिलांच्या हस्ते दहिहंडीचे उद्घाटन झाले. यावर्षी ऑपरेशन सिंदुरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सेनेतील जवान धायगुडे व जवान गलांडे यांच्या हस्ते परिवारासह उद्घाटन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्राची लोककला लावण्यांसह विविध सदाबहार गाण्यावर नृत्य झाले. गोविंदा पथकाने दहिहंडी फोडण्याचा मान मिळवला. यावेळी व्हिडिओ कॉलद्वारे माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, माजी आमदार रामभाऊ सातपुते, सोनियाताई जयकुमार गोरे, विनायक मासाळ, जगन्नाथ जानकर, सदानंद पांढरे, ॲड.अजय घाटे, शामतात्या मदने, आरीफभाई पठाण, बाबा पुकळे, आण्णासाहेब सुळ, नितीन कपने, अजित बोरकर, महादेव पवार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. राम गलांडे, किशोर काळे, यश चोरमले, गणेश देशमुख, खंडु माने, साहील मुलाणी, गणा मदने, बबलु सुतार, रितेश बोडरे व शिवराज पुकळे युवाशक्तीच्या सदस्याने योगदान दिले. शिवराज पुकळे यांनी आभार मानले.



### रस्ता दुरूस्तीच्या मागणीसाठी धरणे आंदोलन

**मोहोळ, दि.२३ ऑगस्ट-**

मोहोळ शहरातील सर्व वार्डातील प्रत्येक रस्ते खराब झाले आहेत ते तात्काळ दुरुस्त करण्यात यावेत या मागणीसाठी मोहोळ शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या वतीने मोहोळ नगरपरिषदेसमोर धरणे आंदोलन करण्यात आले. शहरातील वातावरण चिखलमय झाले आहे. विद्यार्थी, नागरिक, लहान मुले, वृद्ध, महिला यांचे अतोनात हाल होत आहेत. तरीही नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. नगरपालिकेच्या आडमुठपणामुळे शहरात तीव्र संताप आहे. याबाबत लक्ष वेधण्यासाठी मोहोळ शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीतर्फे धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्षा यशोदा कांबळे, दलित स्वयंसेवक संघाचे जिल्हाध्यक्ष फकीरा जाधव, बाळासाहेब जाधव, अंजली मोहिते, सुनिता धोत्रे, लक्ष्मी चव्हाण आदीसह ग्रामस्थ आंदोलनात सहभागी झाले होते.



### मोडनिंब येथे बैलपोळा उत्साहात साजरा

**मोडनिंब, दि.२३ ऑगस्ट-**

मोडनिंब (ता. माढा) येथे बैलपोळा पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच शेतकऱ्यांनी आपल्या सर्जा-राजाच्या सजावटीला सुरुवात केली होती. बैलांना आंघोळ घालून अंगावर रंगीत झुंली, शिंगांना चंदेरी, हिरवे, पिवळे, तांबडे व गुलाबी कागद, घुंगरं, चौरी, गळ्यात घाटी व पेंडी अशा विविध सजावटींनी सजवण्यात आले. कपाळावर टिळा लावून, फुगे व फुलांच्या हारांनी सजवलेले बैल पाहण्यासाठी गावकऱ्यांची गर्दी झाली होती. ग्रामदैवत श्री वेताळ देवस्थान येथे पूजेनंतर बैलांची पारंपरिक मिरवणूक काढण्यात आली. बँड, हलगी पथक, लेझीम, ढोल-ताशांच्या गजरात लहानथोर मंडळींनी जल्लोष केला. फटाक्यांच्या आतषबाजीत गावातील वेशीला नारळ वाढवून बैलपोळ्याची सांगता करण्यात आली. यानंतर श्री महालिंगेश्वराचे दर्शन घेऊन मिरवणूक जय भवानी चौक व गावातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. मिरवणुकीनंतर कुटुंबातील महिलांनी घरी बैलांची पूजा केली. किरण तोडकरी व कुटुंबीयांच्या वतीने पुरणपोळीचा नैवेद्य सर्जा-राजाला अर्पण करण्यात आला. शेतकरी बांधवांच्या आनंद, भरभराटी आणि धनधान्य वृद्धीच्या शुभेच्छांनी साजरा झालेला बैलपोळा मोडनिंबकरांसाठी अविस्मरणीय ठरला.

### शेतात जनावरे चारणा-यास सर्पदंश

**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

शेतात जनावरे चारणा-या व्यक्तीला सापाने दंश केला. हा प्रकार शनिवारी दुपारी २.३० च्या सुमारास मोहोळ तालुक्यातील वडवळ शिवारात घडला. रावसाहेब कुंडलिक काळे (वय ५३, रा. वडवळ ता मोहोळ) असे सर्पदंश झालेल्याचे नाव आहे. रावसाहेब हे शनिवारी दुपारच्या सुमारास शेतात जनावरे चारण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांच्या उजव्या पायाला सापाने दंश केला. मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून सायंकाळी ५.१० वाजता ते स्वत: शासकीय रुगणालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त सरबत वाटप

**टेंभुर्णी, दि.२३ ऑगस्ट-**

टेंभुर्णी येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आझाद युवा फाउंडेशनच्या वतीने सरबत वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.



आझाद युवा फाउंडेशनच्या वतीने नेहमीच महापुरुषांच्या जयंती निमित्त सामाजिक बांधिलकी जपत सरबत वाटपाचा उपक्रम राबविण्यात येत असतो. यावेळी टेंभुर्णी पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण पवार,उत्तझ बँकेचे चेअरमन औदूंबर(भाऊसाहेब) देशमुख, डॉ.राहुल पाटील, माजी सरपंच प्रमोद कुटे, मातंग एकता आंदोलन चे नेते रामभाऊ वाघमारे, उद्योजक राजाभाऊ ढेकणे, आझाद युवा फाउंडेशनचे अध्यक्ष अजिज शेख, उपाध्यक्ष समीर जहागिरदार, डॉ.शहाजहान काझी, इम्तियाज सय्यद, इम्रान बागवान आदी मान्यवर उपस्थित होते.

# वाघाचा सलग तिसऱ्या दिवशीही हल्ला

## उपळे दुमाला येथील रेडकाचा मृत्यू



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २३ ऑगस्ट-**

मोहोळ तालुक्यातून बार्शी तालुक्यात प्रवेश करीत वाघाने सलग तिसऱ्या दिवशी वैराग भागातील उपळे दुमाला येथे रेडकावर हल्ला करीत त्याला ठार केले. त्यामुळे वैराग भागातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन विभागाकडून शेतकऱ्यांना सावधगिरी बाळगण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

शुक्रवारी पहाटे पिंपरी (सा ) येथील माधव धेंडे या शेतकऱ्याच्या रेडकाला ठार करून परतीच्या दिशेने निघालेल्या वाघाने नांदणी - हळदुगे - उपळे दुमाला - झाडी बोरगाव शिवारात प्रवास करत उपळे दुमाला येथे शनिवारी पहाटेच्या सुमारास शेतकरी आण्णासाहेब तांबारे यांच्या रेडकाला उसाच्या फडात नेऊन फाडले आहे. बोरगाव (झाडी) येथील शेतकरी गोरोबा कृष्णा चव्हाण व अनिल मोहन भोंग यांच्या शेतातील द्राक्ष बागेत पण वाघाच्या पायाचे ठसे आढळले आहेत .एकंदरीत त्याच्या प्रवासावरून तो पांगरी - येडशी अभयारण्याकडे परत निघाल्याचा अंदाज वन विभागाने वर्तवला आहे. पिंपरीत वाघाने केलेल्या हल्ल्यात मृत झालेल्या रेडकाचा तसेच मृत जनावराचा पंचनामा करून नुकसान भरपाईसाठी प्रस्ताव तयार करण्यात येत आहे . शनिवारी वाघाचे शेवटचे लोकेशन बोरगाव परिसरात आढळले आहे . सहाय्यक वनसंरक्षक अजित शिंदे व वनक्षेत्रपाल बार्शी श्रीमती अलका करे यांचे मार्गदर्शनाखाली वन परिमंडळ अधिकारी - धनंजय शिदोडकर , वनरक्षक सचिन पुरी, बालाजी धुमाळ, परमेश्वर वाघमारे, वाहन चालक सिद्धेश्वर जाधव हे गस्त घालून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

# दिल्लीच्या गणोशोत्सवात झळकणार जिल्ह्यातील कलाकार

- करकंबचे दुधाणे, सोलापूरचे कुलकर्णी करणार साथसंगत



**तभा वृत्तसेवा.**
**करकंब, दि.२३ ऑगस्ट-**

दिल्ली येथे सार्वजनिक गणेशोसव मंडळातर्फे महाराष्ट्र मंडळाच्या सहकार्याने गुरुग्राम येथे दिनांक २७ ऑगस्ट रोजी भारतरत्न स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी यांच्या अभंगवाणी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. त्यांना सोलापूर जिल्ह्यातील कलाकारांची साथसंगत लाभणार असून हार्मोनियम संतोष कुलकर्णी, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे करकंब, तबला स्वराज कुलकर्णी सोलापूर, दिल्ली येथील निवेदक अतुल मोघे, टाळ मैत्रेय कुलकर्णी यांची साथसंगत लाभणार आहे.

> विराज जोशी यांना दिल्ली येथे अभंग गायनाला साथसंगत करण्याचं भाग्य लाभलं असून ही करकंबकरांसाठी नक्कीच अभिमानास्पद गोष्ट आहे.
> **- ज्ञानेश्वर दुधाणे. संचालक, नादब्रह्म कला फौंडेशन, करकंब.**



## चंद्रशेखर विद्यालयात विद्यार्थ्यांना गणवेश वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २३ ऑगस्ट-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील चंद्रशेखर विद्यालयातील गरीब व होतकरू विद्यार्थांना आरपीआयचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त शहर अध्यक्ष गणेश सावंत यांच्या वतीने गणवेश वाटप करण्यात आले.

आरपीआयचे माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्रदेश युवक उपाध्यक्ष के . डी .धाईंजे, जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भोसले, युवक तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, जिल्हा उपाध्यक्ष शामराव भोसले, जिल्हा संघटक तुकाराम बाबर, जिल्हा सचिव भारत आठवले, तालुका सरचिटणीस मारुती खांडेकर, तालुका उपाध्यक्ष बापू पोळके, संजय खरे, रमेश भोसले, माजी जि प सदस्य रामहरी नवगिरे, महादेव आठवले, प्रथमेश लोंढे, गुडम भालशंकर, नागेश काटे, पत्रकार बी टी शिवशरण, प्रा . पांडुरंग बनसोडे, पर्यवेक्षक शेन्डे, गुरव, लिपीक हणमंत मोरे उपस्थित होते. प्राचार्य पांडुरंग बनसोडे यांनी या शैक्षणिक वर्षात श्रीपूर मधील डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीने प्रथम दप्तर,वह्या, पुस्तके नंतर सायकल वाटप व आज गणवेश वाटप असे तीन मोठे कार्यक्रम घेवून सामाजिक बांधिलकी जपली आहे असे सांगितले. तसेच सोमनाथ भोसले, भारत आठवले यांनीही मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन घुगे सर व आभार काळे सर यांनी मानले.

# द्राक्ष निर्यातीच्या अडचणीबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२३ ऑगस्ट-**



सोलापूर जिल्ह्यात डोमेस्टिक व आंतरराष्ट्रीय मार्केटसाठी आवश्यक सर्व प्रकारच्या द्राक्षांचे तसेच बेदाण्यांचे सुमारे दहा लाख मे. टन उत्पादन घेतले जाते. जिल्ह्यातून यंदा ९ हजार ३४५ मॅट्रिक टन निर्यात झाली आहे. १.२० मॅट्रिक टन बेदाणा निर्मिती झाली आहे. परंतू द्राक्ष निर्यातीसाठी विविध अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्याबाबत उपाययोजना करण्याची मागणी सोलापूर सीडस पेस्टीसाईडस ॲन्ड फर्टिलायझर्स डिलर्स असोसिएशनने केली आहे.

याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना नुकतेच देण्यात आले. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष गुंडप्पा पंचे, सचिव बालाजी चौगुले, उपाध्यक्ष दयानंद झुरळे, खजिनदार संजय कट्टे, दक्षिण सोलापूर अध्यक्ष हणमंत कस्तुरे, मारूती कुंभार, बाळासाहेब कस्तुरे, अप्पासाहेब कस्तुरे आदी उपस्थित होते. द्राक्ष व बेदाणा निर्यात करताना येणाऱ्या अडचणी : द्राक्ष निर्यातीकरता टेस्टिंग खर्च शासनाने करून रिपोर्टची प्रत शेतकऱ्यास द्यावी, निर्यातीस चालना देण्यासाठी जिल्ह्यात आयसीडी करा, निर्यात कंपन्यांना पेंकिंग मटेरियलसाठी अनुदान सुरु करावे, द्राक्ष उत्पादक शेतकऱ्याचे पैसे बुडवणाऱ्यावर कारवाई करावी, द्राक्ष निर्यातीसाठी एक लाख ५० हजार रुपये प्रति कंटेनर अनुदान मिळावे, कोल्ड स्टोरेज करिता शेती बिल दराप्रमाणे वीज बिल आकारावे, युरोपमध्ये द्राक्ष निर्यातीसाठी पूर्वीप्रमाणेच १८०० युरो प्रती कंटेनर वाहतूक भाडे आकारावे, अफगाणिस्तान, इराण, पाकिस्तान, चीन मधून आयात होणाऱ्या बेदानाचा तीनशे रुपये प्रति किलो बेस रेट ठरवावा, शत्रुराष्ट्राचा बेदाणा आयात केला त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, सरकारने बेदाण्याचा शालेय पोषण आहारात समावेश करावा.

## फॅबटेकच्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर यांना शिक्षकरत्न पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२३ ऑगस्ट -**

सांगोल्यातील फॅब्रटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्चच्या उपप्राचार्या डॉ.विद्याराणी क्षीरसागर यांना स्त्री प्रतिष्ठा राज्यस्तरीय शिक्षणरत्न पुरस्कार २०२५ जाहीर झाला असल्याची माहिती प्रतिष्ठा फौंडेशनचे अध्यक्ष तानाजीराजे जाधव यांनी दिली. डॉ.विद्याराणी क्षीरसागर यांना राज्यस्तरीय शिक्षणरत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल फॅब्रटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ.संजय आदाटे,



व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा.प्राजक्ता रूपनर, प्राचार्य डॉ.रविंद्र शेंडगे, पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य तानाजी बुरूंगले, फार्मसीचे कॉलेजचे प्राचार्य डॉ.संजय बैस, स्कूलचे प्राचार्य सिकंदर पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर यांनी अभिनंदन केले.

## झोपेतील व्यक्तीचा उपचारापूर्वी मृत्यू

**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील कुमठे येथील सिध्दार्थ नगरात राहणारे रत्नाकर विष्णु लालसरे (वय ४४) यांचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. ते शुक्रवारी रात्री झोपी गेले होते.

सिध्दार्थ नगरातील राहत्या घरात रत्नाकर हे शुक्रवारी रात्री नेहमीप्रमाणे झोपी गेले होते. सकाळी सहाच्या सुमारास घरातील लोकांनी त्यांना उठविण्याचा प्रयत्न केला. परंतु ते प्रतिसाद देत नसल्याने त्यांना बेशुध्द अवस्थेत भाऊ शिवाजी लालसरे यांनी उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## देवडीत पाच शेतीपंपाच्या साहित्यांची चोरी; ६० हजारांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२३ ऑगस्ट-**

एकाचवेळी पाच शेतकऱ्यांच्या विद्युत मोटारींच्या तांब्याची तार असलेली केबल, बोअरवेलमधील मोटर व इतर साहित्य मिळून एकूण ६० हजार रुपये किमतीचे साहित्य चोरीला गेल्याची घटना बुधवार दि. २० रोजी सकाळी ९ वाजता मोहोळ तालुक्यातील देवडी येथे उघडकीस आली आहे.

याबाबत तानाजी मुरलीधर थोरात (रा. देवडी, ता. मोहोळ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोहोळ पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलिसांच्या माहितीनुसार, तानाजी थोरात नेहमी प्रमाणे सकाळी वीजपंप चालू करण्यासाठी शेतात गेले असता त्यांना वीज पंपाच्या लाईट कनेक्शन पेटीचा दरवाजा उघडा दिसला. कनेक्शन पेटीच्या दरवाजा पासून विजेच्या मोटारीना गेलेल्या तांब्याच्या तारांच्या केबल अज्ञात व्यक्तीने कट करून पळवल्याचे निदर्शनास आले. आजूबाजूच्या शेतकऱ्यांना विचारले असता त्यांच्या देखील विजेच्या व इतर साहित्याची चोरी झाल्याचे समजले. त्यांनी याबाबत पोलिसांकडे धाव घेऊन फिर्याद दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली असता, त्यांना देवडी गावातील महेश दगडू अभिवंत, परमेश्वर दामू अभिवंत, महेश आबा थोरात, तात्या मधुकर पाटेकर या शेतकऱ्यांनी त्यांच्या विहिरीवर लावलेल्या वीजपंपाच्या मोटारींना लावण्यात आलेल्या तांब्याची तार असलेल्या केबल्स व इतर साहित्य चोरीला गेल्याचे उघडकीस आले. या चोरीत पाच शेतकऱ्यांच्या वीज पंपाच्या साहित्याचे नुकसान झाले असून यामध्ये तब्बल ९८० फूट केबल व इतर साहित्य असे मिळून साठ हजार रुपये किंमतीच्या शेती उपयोगी साहित्याची चोरी झाल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. शेतातील विद्युत मोटारी, वायर आदी शेतकरी उपयोगी साहित्य चोरीच्या घटनांमुळे देवडी परिसरातील शेतकऱ्यांसमोर नवं संकट उभे राहिले असून शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिस ांनी चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# तक्रार निवारण दिनादिवशीच आले जिल्हा पोलीस अधीक्षक

- वैराग पोलीस ठाण्यात नागरिकांच्या तक्रारीवर झाली चर्चा



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि २३ ऑगस्ट-**

तक्रार निवारण दिना दिवशीच जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी वैराग पोलीस ठाण्याला शनिवारी दुपारी अचानक भेट दिली . नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या तसेच डीजे मुक्त गणेशोत्सव संदर्भातील पोलीस पाटलाकडून गावोगावच्या अडचणी जाणून घेतल्या.

गेल्या दोन दिवसापूर्वी बार्शी पोलिसांनी अवैधरित्या गांजाची वाहतूक करणाऱ्या ट्रकला पकडून मोठी कारवाई केली .शनिवारी अचानक दुपारी चार वाजता जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी वैराग पोलिस ठाण्याला भेट दिली .यावेळी वैराग पोलीस ठाण्याच्या वतीने आयोजित तक्रार निवारण दिनानिमित्त वैराग भागातून गौडगाव , उपळे दुमाला , जवळगाव , झाडी आदि ठिकाणच्या नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या व त्या सोडवण्याचे आश्वासन दिले. यावेळी कौटुंबिक वाद , शेतीच्या रस्त्याचे वाद ,मारहाणीचे प्रकार ,महिला तथा मुलीं पळून गेल्याच्या तक्रारी आदी उपस्थित नागरिकांनी तक्रारी मांडल्या. तक्रार निवारण दिनानिमित्त अकरा तक्रारी दाखल झाल्या मात्र यापूर्वीच्या व तक्रार निवारण दिनाच्या मिळून २९ तक्रारींचा निपटारा करण्यात आला आहे. राळेरास येथे जनाबाई जाधव प्रशाले मध्ये पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते वृक्षारोपण देखील करण्यात आले .

यावेळी बार्शीचे उपविभागीय पोलिस अधिकारी अशोक सायकर , वैरागचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे , सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वजीत जगदाळे ,पोलीस उप निरीक्षक राजेंद्र भापकर ,प्रतापसिंह जाधव व पोलीस कर्मचारी , पोलीस पाटील उपस्थित होते.



# अकलूजच्या मल्लिकार्जुन मंदिरात ४० दांपत्याकडून रुद्राभिषेक

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२३ ऑगस्ट-**

पवित्र श्रावण मासानिमित येथील श्री मल्लिकार्जुन महादेवास ४० दांपत्याकडून रूद्र अभिषेक, बिल्वार्चन आणि दीपोत्सव कार्यक्रम करण्यात आला.

यावेळी श्री १०८ राजगुरू सिध्दलिंग शिवाचार्य महाराज (शिखर-शिंगणापूर) व श्री १०८ ज्ञानभास्कर महादेव शिवाचार्य महाराज (वाई) यांच्या दिव्यसानिध्य लाभले. महाराजांची पद्यपूजा श्री व सौ सुनील जठार व श्री व सौ विजयराव टोंगळे यांनी केली. श्री वाईकर महाराजांनी समाजाने एकत्र राहून प्रगती करावी हे उदाहरणांमधून दाखवून दिले तर श्री शिंगणापूरकर महाराजांनी रुद्र पठण व रुद्र पूजेचे महत्व पटवून दिले व नित्य लिंगपूजा रुद्र पठण करावे असे सांगितले. या कार्यक्रमामध्ये ४० दांपत्यांनी रुद्र अभिषेकामध्ये सहभाग नोंदवला १०८ नामावली व बिल्वारचंन झाले. श्री मल्लिकार्जुन महादेवास श्री योगेश व सौ पूनम गुळवे दाम्पत्य व श्री सचिन व सौ ज्योती कथले यांनी रुद्र अभिषेक केला. महाआरती होवून कार्यक्रमाची सांगता झाली. आलेल्या सर्व शिवभक्तानी महाप्रसादाचा लाभ घेतला. सदर कार्यक्रमात महात्मा बसवेश्वर बहुउद्देशीय संस्था व वीरशैव लिंगायत समाज, अकलूज यांनी सहभागी घेतला. कार्यक्रमासाठी महात्मा बसवेश्वर बहुउद्देशीय संस्था,अकलूज यांनी परिश्रम घेतले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ओंकार साखर कारखान्याला बिझनेस एक्सलन्स पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. २३ ऑगस्ट**

ओंकार साखर कारखाना प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक ओमराजे बोत्रे पाटील यांना मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे व परीवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते 'बिझनेस एक्सलन्स अ‍ॅवॉर्ड २०२५' प्रदान करण्यात आला.

भारत माध्यम समूहाच्या वतीने आयोजित केलेल्या 'महाराष्ट्र कॉनक्लेव्ह १' च्या निमित्ताने आयोजित सोहळ्यात ओंकार साखर कारखाना प्रायव्हेट लिमिटेडला नवभारत माध्यम समुहाचा 'बिझनेस एक्सलन्स अवॉर्ड २०२५' चा पुरस्कार मुंबई येथील हॉटेल ताज प्रेसिडेंट या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सोहळा संपन्न झाला.





## महत्त्वाचे



### पुस्तक वाचनातून साहित्यरत्न अण्णाभाऊंचे विचार घ्या

**अ‍ॅड. बादल यादव : ५५० कादंबरीचे केले वाटप**

**सुस्ते, दि.२३ ऑगस्ट-**

अण्णाभाऊ साठे यांचा विचार तळागाळापर्यंत पोहण्याची गरज आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कर्कश आवाजाची डॉल्बी लावून अण्णाभाऊ साठे यांना डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा त्यांचे साहित्य वाचून त्यांना डोक्यात घेण्यासाठी जवळपास ५५० कादंबरीचे वाटप केले असल्याचे अ‍ॅड. बादल यादव यांनी सांगितले आहे. ग्रामीण भागातील वैचारिक नागरिकांना न्यायाधीश वकील, डॉक्टर, शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार, आमदार, तसेच राजकीय सामाजिक महिला भगिनींना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे लिखित फकीरा कादंबरी यांचे ५५० संच घरोघरी वाटप करण्यात आले. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य कादंबरी वाटप करण्याचा संकल्प करण्यात आला. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची फकीरा कादंबरी वाचून लोकांना लढण्याची ताकद व प्रेरणा मिळते गावासाठी समाजासाठी फकीरा यांनी बंड केले होते. या कादंबरीच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे यांचा लढाऊ विचार समाजामध्ये पोहोचवण्याचा हा एक छोटासा प्रयत्न ड बादल यादव यांनी केला आहे.



### वाखरीत प्रा.स्वाती कराड-चाटे यांच्या वाढदिनी धान्यवाटपासह वृक्षारोपण

**पंढरपूर, दि. २३ ऑगस्ट-**

तालुक्यातील वाखरी येथील माईर्स एमआयटी ग्रुपच्या विश्वस्त , महासचिव, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ आणि विश्वशांती गुरुकुलच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड-चाटे यांच्या वाढदिवसानिमित्त वाखरीत महामृत्युंजय मंत्राचे पठण, धान्यवाटप व वृक्षारोपण करण्यात आले. गोपाळपूर येथील मातोश्री वृद्धाश्रमात अन्नधान्य सामुग्री देण्यात आली. वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक शिवाजी गवळी, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ, हेडमिस्ट्रेस शिबानी बॅनर्जी यांच्यासह शाळेचे व ज्युनिअर कॉलेजचे सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन पर्यावरण संवर्धन व समाजप्रबोधन या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या भाषणांत प्रा. स्वाती कराड-चाटे यांचे सामाजिक, शैक्षणिक योगदान व प्रेरणादायी कार्य अधोरेखित केले. कार्यक्रमाचा समारोप सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत करण्यात आला.



### ओम स्कूलमध्ये बाह्य आरोग्य शिबिर

**सोलापूर, दि. २३ ऑगस्ट -**

ओम इंग्लीश मिडीयम स्कूल येथे मजरेवाडी नागरी आरोग्य केंद्रा अंतर्गत, सोलापूर बाह्य आरोग्य शिबीर राबविण्यात आले. या शिबिरास विद्यार्थी पालक शिक्षक तसेच हत्तुरे नगरवासियांनी शिबीरास भेट देवून आरोग्य तपासणी करण्यात आली. याठिकाणी अनजुमन शेख, बालरोग तज्ञ डॉ विद्यानंद पाटील, स्त्रीरोगतज्ञ डॉ.वैशाली गुरव, दंतरोगतज्ञ डॉ. प्रकाश तोलानी, डोळ्याचे तज्ञ डॉ किरण कीर्तने, जनरल फिजिशियन डॉ आनंददास विद्या निलोफोर शेख, नीता मोरे, रेखा आंधकलकर, वंदना कांबळे, शबाना शेख, ज्योती गावडे, कीर्ती गोला भीमाशंकर भावग, मदिन हसनापुरे, जावेद शेख,तसेच आशा यांच्या उपस्थित कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास संस्थापिका रेखा मळेवाडी, ओंकार मळेवाडी, यांनी सहकार्य केले. सल्लागार काशीनाथ मळळेवाडी तसेच शिक्षक दिपाली बोरेगांवकर, सुनिता बिराजदार, पल्लवी पाटील, अनुराधा कुलकर्णी, अंबिका कुलकर्णी, माधवी गोरनाळी, सारिका लांबतुरे, नोबतुर सुलोचना इटकर सुषमा भंडारे, रोहीणी माने, पूजा करजगीकर, विकास प्रधान , महेश हिरामणी, जयश्री घोडके, राजश्री यांचे सहकार्य लाभले.

## वनविभागाच्या हद्दीत मुरूम, दगडाचे बेकायदेशीर उत्खणन

**अधिकाऱ्यांचा प्रताप : वाहने पकडूनही कारवाई विना परस्पर सोडून दिली**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२३ ऑगस्ट-**

मेंढापूर (ता. पंढरपूर) येथील वन परिक्षेत्र हद्दीतील गट नं. १४७,४८, ४९, २५८, ५९, ३८४ व इतर गटामधून बेकायदेशीर मुरूम व दगडाचे उत्खनन करून खुलेआम वाहतूक सुरू होती. सामाजिक कार्यकर्त्यांनी तक्रार करताच यामधील १२ वाहने वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी पकडली. त्यामधील दहा वाहने जाग्यावरच तडजोड करून सोडून देण्यात आली. तर दोन वाहने पंढरपूर येथील वनक्षेत्र कार्यालयात आणूनही कारवाई न करताच सोडून दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून पंढरपूर वनपरिक्षेत्र विभागात बेकायदेशीरपणे वृक्षारोपण, मुरूम, दगडाचे उत्खनन होत असल्याच्या तक्रारी सुरू आहेत. वन विभागाकडून सुरू असलेली कामे ही टेंडर प्रक्रिया न राबविता आपल्या मर्जितील लोकांना देऊन अधिकाऱ्यांकडून निधी हडपण्याचा प्रकार सुरू असल्याच्या तक्रारी आर.आर.पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष दादासाहेब चव्हाण यांनी वनमंत्र्यांकडे केली होती. त्या प्रकरणाची चौकशी होते न होते तोच बेकायदेशीर मुरूम व दगड उत्खननाचा प्रकार समोर आला आहे. मुरूम व दगड उत्खनन करतानाची वाहने पकडण्यात आल्यानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करणे गरजेचे होते. मात्र वन विभागाचे अधिकारी एस. बी. चाटे, कल्पना पांढरे, बी. एस. भुई यांनी कारवाई केली नाही. महसूल, पोलीस प्रशासनालाही याची माहिती दिली नाही. पकडलेली दहा वाहने जागेवरती सोडली तर दोन वाहने पंढरपूर येथील वन विभागाच्या कार्यालयात आणून सोडून दिली आहेत. याबाबतचे फोटो, सीसीटीव्ही फुटेज आपल्याकडे उपलब्ध असल्याचा आरोप दादासाहेब चव्हाण यांनी केला आहे. या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई न झाल्यास २५ ऑगस्टपासून पंढरपूर प्रांत कार्यालयासमोर वन विभागाच्या अधिकाऱ्यांविरोधात बेमुदत उपोषण व हलगीनाद आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. यामुळे अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



पंढरपूर : तालुक्यातील मेंढापूर वनविभागाच्या हद्दीतून मुरूम, दगडाचे उतखनन झाल्याचे दिसत आहे.

> याबाबत आपली वनाअधिकाऱ्यांशी चर्चा झाली आहे. दोषींवर कडक कारवाई करण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्यानुसार चौकशी करून कुणालाही न वाचवता कारवाई करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले आहे.
> **- बाबासाहेब देशमुख,** आमदार, सांगोला विधानसभा

> याबाबत आमच्याकडं तक्रारी आल्या आहेत. संबंधितांची चौकशी करून कारवाई करण्याच्या लेखी सूचना दिल्या आहेत.
> **- कुलराज सिंग,** उप वनसंरक्षक सोलापूर

## आमदार पाटील यांनी केली पूर परिस्थितीची पाहणी

**तहसीलदार सचिन लंगोटे यांच्या समवेत आमदार पाटील यांनी नदीकाठच्या गावचा केला पाहणी दौरा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२३ ऑगस्ट -**

तालुक्यातील पिराची कुरोली, वाडीकुरोली, शेळवे, खेडभाळवणी, कौठळी,व्होळे, खेडभोसे, देवडे, पटवर्धन कुरोली, आव्हे, पेहे, सांगवी, बादलकोट, उंबरे, करोळे, कान्हापुरी या भागांमध्ये माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत आबा पाटील यांनी पूर परिस्थितीची पाहणी केली. यावेळी पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगोटे हे उपस्थित होते. प्रत्येक गावातील नुकसानीचे पंचनामे तत्काळ करण्यात यावे अशा सूचना आमदार अभिजीत पाटील यांनी दिल्या. यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी देवडे येथील पुराच्या पाण्यामुळे घर संसार उघड्यावर पडलेल्या नागरिकांना अत्यावश्यक वस्तूंचे किट देण्यात आलं.



## येत्या २९ ऑगस्टला कासेगावची ग्रामसभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ ऑगस्ट-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील ग्रामसभा दि. २९ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आयोजित करण्यात आली आहे.

गावातील सर्व नागरिकांनी वेळेवर ग्रामसभेत उपस्थित राहावे असे आवाहन ग्रामपंचायततर्फे करण्यात आले आहे. ग्रामसभेमध्ये कोणाला सूचना किंवा अर्ज द्यायचे असल्यास त्यांनी आपले अर्ज सूचना लेखी स्वरूपात २६ ऑगस्ट पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात जमा करावेत असेही आवाहन करण्यात आले आहे.

## पंढरपुरात मानकऱ्यांना प्रसाद वाटपाने गोकुळष्टमी उत्सवाची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.२३ ऑगस्ट-**



गोकुळष्टमी उत्सवाची दि.२२ ऑगस्ट रोजी सांगता करण्यात आली असून, श्री विठ्ठल सभामंडप येथे गोपीगीत झाल्यानंतर उत्सवाच्या दिंडींची मंदिरामध्ये प्रदक्षिणा होऊन श्री संत नामदेव पायरी येथे अभंग झाला व वारकरी फडकरी महाराज मंडळी यांच्या सहभागाने दिंडीची नगर प्रदक्षिणा झाली. तद्नंतर सभामंडप येथे गुलाल बुक्क्याचे भजन होऊन आरती करण्यात आली व उपस्थित मानाचे फडकरी विणेकरी व इतर महाराज मंडळींना खडीसाखर व नारळ प्रसाद देण्यात आला व उत्सवाची सांगता झाली. यावेळी मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे, प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, विभाग प्रमुख संजय कोकीळ व अतुल बक्षी, सहा. विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी व पांडूरंग दशपुत्रे तसेच इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता. तसेच श्री विठ्ठलास सोने मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हि-याचा कंगन जोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, शिरपेच, मत्स्य जोड, तोडे जोड, सुर्यकळ्यांचा हार, तुळशीची माळ, तांदळ्या हार, सोन्याचे पैजण जोड, नवरत्नाचा हार, नक्षी टोपाचे चक्र इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले होते.

## राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचाऱ्यांचे आमदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २३ ऑगस्ट-**



राष्ट्रीय आरोग्य अभियानातील दहा वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत समावेशन करणे संदर्भात शासन निर्णय होऊन जवळजवळ दीड वर्ष होऊनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याबबत तसेच इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य एकत्रीकरण समिती कडून राज्यव्यापी काम बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

मंगळवेढा तालुक्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानातील विविध पदावर काम करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांचेमर्फत विविध मागण्यांसाठी आमदार समाधान आवताडे यांना निवेदन देण्यात आले. यामध्ये दहा वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे समकक्ष पदावर तात्काळ समायोजन,मानधन वाढ, लॉयल्टी बोनस, अपघाती विमा, बदली धोरण आदि मागण्यांचा समावेश आहे. यावेळी आमदार समाधान आवताडे यांनी मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून मा. मुख्यमंत्री यांना पत्र देऊन व्यक्तिशः पाठपुरावा करून राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांना लवकरच न्याय मिळेल असे आश्वासन दिले. यावेळी राष्ट्रीय आरोग्य अभियानातील डॉ. अनिल चौगुले, डॉ. शिरीष कुलकर्णी, डॉ. निखिल जोशी डॉ. प्रवीण माने, डॉ. ऋतुजा गायकवाड, डॉ. स्नेहा गंदगे, प्रल्हाद नाशिककर ,अविनाश पट्टणशेट्टी ,रेश्मा सरडे ,सुनिता खरात ,सारिका कोळेकर ,उमा हुलवान ,संगीता बिराजदार ,राणी बुरांडे ,गौरी कांबळे ,धनश्री कुलकर्णी ,विजयालक्ष्मी बिरादार ,मनीषा शिरसाट आदि अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## पंढरपूर येथे चक्क गोमाता करतेय श्रीमद् भागवतकथा श्रवण

**येथील गुंडा महाराज मठात दिवसातून एकदा तरी कथा श्रवणासाठी गोमाता येतेच**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ ऑगस्ट -**

हिंदू धर्मामध्ये गोमाता अर्थात गाईला अनन्यसाधारण महत्व आहे. गोमातेची पूजा करुन दिवाळी सणाला सुरुवात होते. हिंदू धर्मातील देवता मानलेली गोमाता अर्थात गाय चक्क भागवत, रामायण कथेचे श्रवण करते आहे. त्यामुळे चार वेद , अठरा पुराण आणि सहा शास्त्र शिकण्याचा अधिकार हा केवळ मानवाचा नसून प्राण्यांनाही अधिकार परमेश्वराने दिला आहे असे म्हटले तर वावगे ठरणारे नाही. कारण याचा प्रत्यय अध्यात्मनगरी पंढरपूर येथे सध्या येत असून येथील गांधी रोड वरील श्री गुंडां महाराज मठात श्रीमद् भागवत कथा ऐकण्यासाठी चक्क एक गोमाता दररोज येत आहे. ही बातमी वाचुन, ऐकुन कोणाचाही विश्वास बसणार नाही, मात्र हे वास्तव आहे.

गायीच्या महाभारत, रामायण कथा श्रवणाचा प्रत्यय गुंडा महाराज मठाचे मठाधिपती तसेच श्रवणासाठी दररोज येणाऱ्या भाविकांना देखील येत आहे. आषाढी यात्रेच्या सांगतेनंतर चार्तुमासास सुरुवात झाली. कार्तिकी यात्रे नंतर या चार्तुमासाची सांगता होत आहे. यंदाचा चार्तुमास सुरु होवून साधारणपणे एक ते दीड महिना होत आला आहे. येथील गुंडा महाराज मठात चार्तुमासामुळे विविध धार्मिक उपक्रम सध्या सुरू आहेत. यामध्ये दररोज सकाळी वेदांताचा वृत्तीप्रभाकर रहस्य पाठ सुरू असतो. तेव्हा ही गाय सकाळी सहाच्या सुमारास मठाच्या प्रवेशव्दाराजवळ मठ उघडण्याच्या प्रतिक्षेत थांबलेली असते. मठ उघडल्या नंतर शांत चित्ताने ती आत मध्ये येवून पाठचे श्रवण करते. तर सायंकाळी अध्यात्म रामायण सुरू असतानाही पुन्हा मठात येवून ती बसते. विशेष म्हणजे ही गाय दररोज न चुकता मठामध्ये येते आहे. ही गोमाता नुसतीच मठा येवून चक्कर मारत नाही तर ती मठा मध्ये ३ ते ४ तास एकाच जागेवर बसून असते. ती कुणालाही त्रास देत नाही. मठात आल्यानंतर मठामध्ये सर्वत्र शांतपणे तिचा वावर असतो. मठातील पोथी ठेवलेल्या आसनापाशी जावून ती थोडावेळ थांबते. विशेष म्हणजे रामायण, महाभाराताची कथा संपल्यानंतर पुंडलिक वरदे हरी विठ्ठल असा गजर झाल्यावरच आपल्या जागेवरुन ती उठते. कधी मायेने मठाचे मठाधिपती असलेल्या चक्रीनाथ महाराज सिद्धरस यांना प्रेमाने चाटते. महाराज देखील त्या गायीला प्रेमाने थोपटतात. हे अद्भूत दृश्य पाहून प्रत्येक भाविक केवळ आश्चर्यचकीतच होत नाही तर चाट देखील पडतो. दिवसातून कधी वेळ मिळेल तेव्हा ती येते किंवा ऐकेका दिवशी तर प्रत्येक पाठाच्या वेळी तिचे मठात येणे असल्याचे सिध्दरस महाराज सांगतात.



> स्वाभाविकतेने शुध्द असलेला हा जीव आहे. त्यादृष्टीने जर चिंतन केले तर ईश्वाराची जी सेवा गेल्या २४६ वर्षापासून आपल्या मठा मध्ये सुरु आहे. त्याचे हे काहीतरी फल आहे असे आपण मानतो. आमची जी सेवा आहे ती त्या पांडुरंगा पर्यंत पोहचते आहे असे काहीतरी आपल्याला चिंतन करावे लागेल. या आधी आमच्या आजोबांच्या काळात गेल्या पन्नास वर्षापूर्वी सन १९६६ च्या अगोदर एक गाय अशी मठा मध्ये येवून साधारणपणे दोन,तीन तास ती मठा मध्येच बसत असे आणि नंतर ती जात असे सांगणारे काही लोक आता शिल्लक आहेत त्यांच्याकडून आवर्जुन हे सांगितले जाते. आपण ते काही पाहिले नाही कारण साधारणपणे पन्नास,साठ वर्षापूर्वीची ती गोष्ट आहे. त्यावेळी आपला जन्म देखील झालेला नव्हता.
> **- चक्रीनाथ महाराज सिध्दरस (मठाधिपती)**

यंदाच्या वर्षी गुंडा महाराज मठात २४६ वा चातुर्मास संपन्न होत आहे. हा चातुर्मास सुरु झाल्या पासून ही गोमाता नित्य मठात येत असल्याचे महाराजां बरोबरच दैनंदिन मठात कथा श्रवणासाठी येत असलेले अनेक भाविक देखील आवर्जुन सांगतात. दरम्यान या गायीचे मठात दररोज न चुकता येण्या विषयी चक्रीनाथमहाराज सिध्दरस यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, पृथ्वीच्या संबंधाने शास्त्राने गायीचा विचार मांडलेला आहे. आपण श्रीमद भागवत, रामायण आदी ग्रंथामधुन हे श्रवण करतो. की पृथ्वीला कष्ट झाले म्हणून पृथ्वी ब्रम्हदेवापाशी आणि नारायण परमात्म्यापाशी गेली. ती गेली कशी तर गाईचे रुपधारण धारण करुन ती गेली असा विचार आला. पृथ्वी गाईचे रुप का धारण करते तर शास्त्रामध्ये असा विचार आला की गाय पृथ्वीचे आधीदैविकरुप आहे म्हणजे दिव्यरुप आहे. त्यामुळे दिव्यरुपाचा आश्रय ती करते आणि देवापाशी जाते. त्यामुळे गाय आपल्या मठा मध्ये येते म्हणजे काय आहे पृथ्वीही आपली माता आहे. त्यामुळे माताच आपल्या ठिकाणी येते आहे. तीच आपल्यावर कृपा करते आहे. तिचा थेट संबंध ईश्वराशी असल्यामुळे गाईच्या कानामध्ये जे जे जाते आहे ते सर्व ईश्वरापर्यंत पोहचते आहे असा आपल्याला विचार करावा लागेल असे देखील ते आवर्जुन सांगतात.